# श्री साईबाबा संस्थान, शिरडी



# व्यवस्थापन मंडळाच्या गेल्या वर्षभरातील कार्याचा संक्षित आढावा

— ❖ ❖ ❖ —

**दि. २५ सप्टेंबर १९९४ रोजी मा. धर्मादाय आयुक्त यांनी नेमलेल्या श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखालील व्यवस्थापन मंडळास सप्टेंबर १९९७ मध्ये तीन वर्ष पूर्ण झाली आहेत.**

**व्यवस्थापन मंडळाने पहिल्या दोन वर्षात केलेल्या कार्याचा आढावा आम्ही गेल्या वर्षीच्या दसरा विशेषांकात** ('श्री साईलीला' सप्टेंबर-ऑक्टोबर ९६) **साईभक्त वाचकांना सादर केला होता व त्यावर अनेक वाचाकांनी पत्र पाठवून संतोष व्यक्त केला होता. प्रस्तुत दसरा विशेषाकांत आम्ही व्यवस्थापन मंडळाने ऑक्टोबर ९६ ते सप्टेंबर ९७ या वर्षात केलेल्या कार्याचा आढावा सादर करीत आहोत.**

— ❖ ❖ ❖ —

श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या वरील नमूद केलेल्या कालावधीमध्ये एकूण १४ सभा झाल्या. श्री साईबाबांच्या प्रार्थनेने या सभांचा प्रारंभ झाला व खेळीमेळीच्या वातावरणात, सदस्यांच्या मनमोकळ्या सहभागाने व सहकार्याने या सभा पार पडल्या. सर्व निर्णय सर्वांच्या सहमतीने व एकमताने घेण्यात आले. त्यांचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे-

## द्वारकामाईतील धूनीचा जीर्णोद्धार :

द्वारकामाई मशिदीत श्री साईबाबांनी प्रज्वलित केलेल्या अखंड धूनीचे साईभक्तांच्या श्रद्धामनात विशेष स्थान आहे. हे लक्षात घेऊन व्यवस्थापन मंडळाने धूनीचा जीर्णोद्धार प्रकल्प हाती घेतला आहे. त्यानुसार धूनीच्या तळाला व भोवतालच्या चारी बाजूच्या भिंतींना नव्या उष्णता प्रतिकारक (हीट रेजिस्टन्ट) वीटा बसविण्यात येणार आहेत. तसेच मशिदीतील गरम हवा - धूर बाहेर जाऊन मशिदीत शुद्ध - स्वच्छ हवा खेळती राहावी यासाठी नवीन वायूनिर्गमन व्यवस्था (एक्झॉस्ट फॅन) तसेच सध्याची चिमणी जुनी - खराब झाल्यामुळे त्या जागी नवीन चिमणीही बसविण्यात यावयाची आहे.

## समाधी भोवतालीचे सुशोभिकर :

श्री साईबाबा समाधी भोवतालीच्या कट्ट्यावरील व समोरील अष्टखांबी मंडपातील सर्व परिसरात नवीन संगमरवर बसविण्यात आला आहे. तसेच समाधी व पादुकांच्या भोवती रंगीत वेलबुट्टी असलेली संगमरवराची सुशोभित पट्टी बसविण्यात आली आहे. अशा रितीने समाधी व समोरील छोट्या अष्टखांबी मंडपाचा परिसर स्वच्छ - सुशोभित व प्रसन्न करण्यात आला आहे.

## दीक्षितवाड्याचा जीर्णोद्धार :

शिरडीतील दीक्षित वाड्याला साईभक्तांच्या दृष्टीने ऐतिहासिक महत्व आहे हे लक्षात घेऊन ती जुनी - बाबांच्या स्पर्शाने पावन झालेली वास्तू आहे तशीच ठेवून तो वाडा भक्कम करण्याच्या दृष्टीने मंडळाने त्या वाड्याच्या जीर्णोद्धाराचे कार्य येत्या काही महिन्यातच पूर्ण करण्याचे ठरविले आहे.

बाबांच्या वास्तव्याने पावन झालेल्या चावडीची जुनी वास्तू

कोणत्याही प्रकारचा बदल न करता आधुनिक तंत्राने व्यवस्थापन मंडळाने भक्कम केलेली पाहून या पद्धतीनेच सर्व जुन्या वास्तुंचा जीर्णोद्धार करून त्यांचे यथायोग्य जतन करावे अशा अनेक भक्तांच्या सूचना आल्या व त्यानुसार ऐतिहासिक दीक्षित वाड्याचे जीर्णोद्धार कार्य हाती घेण्यात येत आहे.

## प्रसाधनसोईसाठी 'सुलभ प्रसाधन प्रकल्प' :

शिरडीमध्ये श्री बाबांच्या दर्शनापुरते अल्पकाळ वास्तव्य करणाऱ्या भक्तांना स्वतंत्र खोली वा हॉलची गरज नसते, पण सोबतचे सामान ठेवण्याची व विशेषत: स्वच्छतेसाठी प्रसाधनगृहांची गरज फार मोठी असते. ही गोष्ट लक्षात घेऊन अशा भक्तांसाठी लॉकर्सच्या सोयींसह १२० संडास व १२० स्नानगृहांचा 'सुलभ प्रसाधन प्रकल्प' व्यवस्थापन मंडळाने हाती घेतला. या प्रकल्पाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होत आले आहे.

तळमजल्यावरील संडास व स्नानगृहांचे बांधकाम पूर्ण झाले असून भक्तांना वापरण्यासाठी या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील काम अखेरच्या टप्प्यात असून विलंबाने का होईना पण डिसेंबर ९७ अखेर पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

## समाधी मंदिर परिसराचा पुनर्विकास :

श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचा पुनर्विकास योजनाबद्ध पद्धतीने, भक्तांच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व सेवा सुविधांनी युक्त अशा रितीने पूर्ण करण्यासाठी, त्याकरिता सुयोग्य असा आराखडा निवडण्याच्या दृष्टीने गेल्या वर्षी संस्थानतर्फे राष्ट्रीय पातळीवर वास्तुशास्त्रज्ञांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या स्पर्धेत दिल्ली येथील आर्किटेक्ट श्री माथूर आणि कापरे यांनी सादर केलेल्या आराखड्यावजा योजनेला प्रथम क्रमांक मिळून रु. दीड लाखांचे प्रथम पारितोषिक देण्यात आले होते. या संबंधीचा सविस्तर अहवाल गेल्या वर्षीच्या दसरा विशेषांकात (श्री साईलीला सप्टेंबर - ऑक्टोबर ९६) देण्यात आला होता.

प्रथम क्रमांकाचा सर्वात सुयोग्य असा हा आराखडा मूर्त स्वरूपात आणण्याच्या दृष्टीने आवश्यक ते बांधकाम, अनुभवी व विश्वासार्ह कंत्राटदारावर सोपविण्याच्या दृष्टीने अशा कंत्राटदारांची प्राथमिक निवड यादी तयार करण्यासाठी विहीत मुद्यांवर माहिती सादर करणारे अर्ज, वृत्तपत्रात जाहिरात देऊन बांधकाम कंत्राटदारांकडून मागविण्यात आले होते. आलेल्या सर्व अर्जांची छाननी करून निवड यादीवर समावेश होण्यास पात्र आढळून आलेल्या कंत्राटदारांकडून आता या पुनर्विकास योजने अंतर्गत बांधकामाच्या निविदा (टेंडर्स) मागविण्यात येत आहेत. आलेल्या निविदांवर विचार करून योग्य कंत्राटदाराची लवकरच निवड करण्यात येईल व हे बांधकाम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात येईल. प्रत्यक्ष बांधकामास नोव्हेंबर ९७ मध्ये सुरुवात होऊन ते वर्षभरात पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. बांधकाम चालू असताना श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची कमीतकमी गैरसोय होईल हे कटाक्षाने पाहिले जाईल. किंबहुना बांधकाम पूर्ण करताना या विशेष अटीचे पालन करण्याच्या स्पष्ट सूचना बांधकाम कंत्राटदाराला निश्चितपणे देण्यात येणार आहेत.

## साईनाथ हॉस्पिटल विस्तारीकरण :

श्री साईबाबा संस्थानचे शिरडी येथील 'साईनाथ हॉस्पिटल' गरजू रुग्णांचा आधारस्तंभ आहे. 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' हा बाबांचा संदेश, त्यांच्या अनेक लीलांमधील रुग्णसेवेतून व्यक्त होतो. साईबाबांचे रुग्णसेवेचे महान सेवाकार्य संस्थान 'साईनाथ हॉस्पिटल'द्वारे पुढे चालवित आहे.

रुग्णांची वाढती प्रचंड संख्या व चिकित्सेच्या - उपचाराच्या विविध आणि वाढत्या गरजांच्या सोईसाठी सध्याच्या हॉस्पिटलची इमारत लहान पडत असून नव्या प्रशस्त इमारतीची आवश्यकता आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन व्यवस्थापन मंडळाने हॉस्पिटल विस्तारिकरणाचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार शिरडी - कोपरगाव - नाशिक - पुणे आणि मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टर मंडळींची एक समिती गठित करून त्या सर्वांच्या सल्ल्याने विस्तारीकरणाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. असा अहवाल तयार होताच त्वरेने हॉस्पिटल विस्तारीकरणाचे पुढील कार्य सुरू करण्याचा व्यवस्थापन मंडळाचा मानस आहे.

## नवा निर्णय :
## सामाजिक - शैक्षणिक संस्थांना अनुदान

श्री साईबाबा संस्थानकडे देणगी रुपाने येणारा पैसा देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या विविध प्रांतातील, विविध जाती-धर्माच्या साईभक्तांकडून येतो. हे लक्षात घेऊन हा सर्व पैसा समाजाच्या विकासार्थ कार्य करणाऱ्या, विविध सामाजिक - शैक्षणिक, वैद्यकीय सेवा-संस्थांना अनुदान रुपाने देण्याचा **एक नवा इतिहास निर्माण करणारा निर्णय संस्थानच्या**

**श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखालील, व्यवस्थापन मंडळाने घेऊन संस्थानला अधिकाधिक समाजसेवासन्मुख केलेले आहे.**

या निर्णयाची अंमलबजावणी, नि:पक्षपणे व्हावी यासाठी व्यवस्थापन मंडळातर्फे काही मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यात आली आहेत. अनुदानाचे वाटप कोणाच्या तरी आवडी-निवडीनुसार वा लहरीन्वये, स्वैरपणे होऊ नये यासाठी दक्षता म्हणून संस्थानने मार्गदर्शक तत्त्वांना धरून एक नियमावली तयार करून महाराष्ट्र शासनाच्या धर्मादाय आयुक्तांकडून त्यास खास मंजुरी घेण्यात आलेली आहे.

संस्थानतर्फे देण्यात येणारे अनुदान फक्त नोंदणीकृत संस्थांना, न्यासांनाच दिले जाईल अशी संस्था सार्वजनिक असली पाहिजे. संस्थानतर्फे देण्यात येणारे अनुदान हे फक्त **भांडवली प्रकारच्या स्थायी खर्चासाठी दिले जाईल.** (उदा.: संस्थेची इमारत (खोल्या) ॲम्ब्यूलन्स, यंत्र सामुग्री, उपकरणे आदी), **आवर्ती खर्चासाठी दिले जात नाही.** विशेषत: मूक-बधिर, अंध, मतिमंद मुलांना शैक्षणिक गरजांसाठी व वैद्यकीय सेवासाठी नेत्रोपचार, कर्करोग उपचार प्रकल्पांना मदतीसाठी प्राधान्य देण्यात येते.

वरील तत्त्वांनुसार व्यवस्थापन मंडळाने संस्थानकडे आलेल्या अर्जांची काटेकोरपणे छाननी करून १९९६-९७ (मार्च अखेर) या आर्थिक वर्षात पुढील ११ सामाजिक संस्थांना ५१ लाखा २५ हजार रक्कमेचे तर १९९७-९८ (सप्टेंबर अखेर) विविध १५ संस्थांना ८३ लाख ८२ हजार रक्कमेचे असे एकूण १ कोटी ३५ लाख ७ हजार एवढ्या रक्कमेचे अनुदान मंजूर केलेले आहे.

संस्थानच्या व्यवस्थापन मंडळाने तयार केलेली नियमावली व अनुदान प्राप्त सामाजिक संस्थांची नावे पुढीलप्रमाणे-

### आर्थिक अनुदान देणे कामी नियमावली-वजा - मार्गदर्शक तत्त्वे :-

०१) संस्थानतर्फे विविध संस्थांकडून आर्थिक अनुदानासाठी मागण्या येतात. त्यांना अनुदान देण्याबाबत सर्वसाधारण धोरण व मार्गदर्शक तत्वे ठरवून त्यानुसारच अशा मागण्यांचा विचार करावा.

०२) दरवर्षी अनुदान देण्यासाठी आर्थिक तरतूद करताना खालील सूत्र वापरावे. संस्थानच्या गेल्या तीन वर्षांच्या शिल्लक (सरप्लस) रक्कमांच्या सरासरी रक्कमेच्या १/३ इतक्या मर्यादेपर्यंत अंदाजपत्रकीय तरतूद असावी.

०३) अनुदान हे **फक्त नोंदणीकृत संस्थांनाच** अथवा सार्वजनिक न्यासांनाच देण्यात यावे. याकरिता त्यांच्याकडून मागवावयाची माहिती आदि कार्यपद्धती सुस्पष्ट असावी.

०४) अनुदान हे **मुख्यत्वे अनावर्ती खर्चासाठीच** (नॉन रिकरिंग एक्स्पेंडीचर) देण्यात यावे, जेणे करून आवर्ती खर्चाचा बोजा दरवर्षी संस्थानवर पडणार नाही. काही अपवादात्मक प्रकरणात आवर्ती खर्चापोटी अनुदान द्यावयाचे ठरल्यास ते सतत अगर दरवर्षी देण्यात येईल असा गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्यावी.

०५) ज्या करिता अनुदान द्यावयाचे अशा सर्वसाधारण विशिष्ट बाबी— अनुदान फक्त खालील प्रयोजनासाठीच देण्यात यावे.

(अ) श्री साईबाबांचे जीवनकार्य, तत्त्वज्ञान व शिकवणूक यांचा प्रसार व्हावा यासाठी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये / वाचनालये यांना संस्थान - प्रकाशित ग्रंथांचे संच वितरीत करणे. तसेच बाबांचे अध्यात्मिक शिकवणुकीचा प्रसार व्हावा म्हणून कीर्तन महाविद्यालये / विद्यालये / प्रशिक्षण संस्था / वर्ग चालविणाऱ्या संस्थांना विशिष्ट अनावर्ती प्रयोजनासाठी.

(ब) आदिवासी क्षेत्रे, अवर्षण - प्रवण (डी.पी.ए.पी.) क्षेत्रे आणि पश्चिम समुद्र किनारपट्टीजवळील पोहोचण्यास दुरापास्त (inaccessible) असे पश्चिम घाट (Western Ghats) क्षेत्र अशा तीन प्रकारच्या सामाजिक - आर्थिक दृष्ट्या मागास क्षेत्रातील शैक्षणिक संस्थांना इमारत खोल्या, शैक्षणिक साहित्य / उपकरणे / विकत घेण्यासाठी.

(क) वैद्यकीय क्षेत्रात कॅन्सर, नेत्ररोग, किडनी यासारख्या व्याधींवर उपचार करणाऱ्या रुग्णालयांना (उदा. सोयी/सुविधा संस्थानचे रुग्णालय उपलब्ध नाहीत) इमारत बांधणे / विस्तार करणे, वैद्यकीय यंत्रसामुग्री वा उपकरणे खरेदी करणे, आदिवासी भागात वैद्यकीय सोयी पोहोचविण्यासाठी रुग्णवाहिका / फिरता दवाखाना चालविणे, रक्तपेढी यासारख्या प्रयोजनासाठी.

(ड) अंध, मुक, बधीर, अपंग, मतीमंद यासारख्या शारिरीक वा मानसिक व्यंगा असलेल्या व्यक्तींना शैक्षणिक / व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या तसेच व्यसन मुक्ती होण्यासाठी ठोस उपचार करणाऱ्या संस्थांना इमारत, खोल्या, यंत्रसामुग्री, उपकरणे, कार्यशाळा उभारण्यासाठी / खरेदी करण्यासाठी.

(इ) परित्यक्ता वा विधवा स्त्रीयांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे याकरिता व्यावसायिक प्रशिक्षण देण्याकरिता यंत्रसामुग्री उपकरणे खरेदीसाठी.

(फ) तांत्रिक / व्यावसायिक शिक्षणासाठी (इंजिनिअरिंग, मेडिकल, फार्मसी, केमिकल टेक्नालॉजी इ.) ज्या गरीब, हुशार, होतकरू विद्यार्थ्यांनी केंद्र वा राज्य शासनाने गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रमाणित केलेल्या दराने शैक्षणिक व हॉस्टेल फी भरणे, पुस्तके खरेदी याकरिता मात्र त्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ५०,००० चे वर नसावे आणि असे विद्यार्थी दरवर्षी नियमीत होणाऱ्या परिक्षेत उत्तीर्ण होऊन प्रगती करीत आहेत याची खात्री करून घेण्यात यावी.

०६) शिरडी व शिरडी परिसरासाठी खास जादा बाबी—

शिरडी व शिरडी परिसराती २० कि.मी.च्या परीघात येणाऱ्या गावात खालील खास जादा प्रयोजनांसाठीही नीधी/आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात यावी.

(अ) पाण्याची सुविधा, उदा. पिण्याच्या पाण्याची टाकी उभारणे, हातपंप व वीजपंप बसविणे आणि 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या तत्वप्रणालीनुसार गांव पातळीवर पाणी साठवणी करीता बंधारे बांधणे यासाठी.

(ब) प्राथमिक व विना अनुदानित शासनमान्य माध्यमिक शाळांना शैक्षणिक साहित्य पुरविण्यासाठी वा खरेदी करण्यासाठी.

(क) प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचे आरोग्य-प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी कालांतराने, नियमित, वैद्यकीय तपासणी व त्यांना औषध वाटप करणे.

०७) संस्थानतर्फे मदत रोख रकमेने वा वस्तूरुपाने द्यावी. **सर्वसाधारणपणे** एकाच संस्थेला रुपये १० लाखांपेक्षा जास्त मदत देऊ नये.


## संस्थानतर्फे अनुदान देण्यात आलेल्या सेवा संस्था पुढीलप्रमाणे

| संस्थेचे नाव | मंजूर रक्कम |
|---|---|
| कै. मोहन ठुसे नेत्र रुग्णालय, नारायणगाव | ०५,००,००० |
| राष्ट्रीय अंधकल्याण संघ, नाशिक | ०२,००,००० |
| जनकल्याण रक्तपेढी, नाशिक | ०५,००,००० |
| कम्युनिटी कॅन्सर रुग्णालय, मिरज | १५,००,००० |
| अस्तित्व, डोंबिवली | ०५,००,००० |
| वनवासी कल्याण केंद्र, मुंबई | ०२,००,००० |
| राष्ट्रीय अंध कल्याण संघ, नाशिक | ०२,५०,००० |
| लायन्स मुकबधीर व अपंग विद्यालय, कोपरगाव | ०५,००,००० |
| श्रीमती माईलेले श्रवण विद्यालय, नाशिक | ०४,००,००० |
| छत्रपती शंभुराजे माध्यमिक विद्यालय, पिंपळवाडी | ७५,००० |
| पुणे विद्यार्थी गृह, तळेगाव | ०५,००,००० |
| टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई | १०,००,००० |
| संजिवनी प्री कँडेट ट्रेनिंग सेंटर, कोपरगाव | ०३,००,००० |
| मुक्तांगण मित्र, पुणे | १०,००,००० |
| श्री साईश्रद्धा मुकबधीर विद्यालय, शिरडी | ६७,००० |
| श्री साईनाथ महाराज आदिवासी आश्रमशाळा चांदेकसारे | ०५,००,००० |
| मुकबधीर विद्यालय, श्रीरामपूर | ०३,५०,००० |
| पुणे अंधजन मंडळ, पुणे | ०५,००,००० |
| एस. एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन, पुणे | १०,००,००० |
| अध्यापक शिक्षण मंडळ, धुळे | ०५,००,००० |
| शिवशंकर विद्यालय, खंदे | २५,००० |
| कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई | ०५,००,००० |
| पंढरीनाथ जिजाबा आंबरे पाटील कन्या विद्यालय, संगमनेर | ०५,००,००० |
| आदिवासी सेवा समिती, नाशिक | ०५,००,००० |
| सिद्धेश्वर विद्यावर्धिनी संस्था, मांडवगण | ०१,४०,००० |
| प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी | १५,००,००० |

अमृतकलश


# 'श्री साईसगुणोपासना' पोथीची जन्मकथा

## (श्री साईलीला १९२३ सालच्या अंकातून)




वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री जागेश्वर भीष्म नागपूर जिल्ह्यातील बोरी या गावी वास्तव्य करीत असत व शेतीवाडी करून आपला निर्वाह चालवीत. त्यांच्या पत्नी निवर्तल्यावर त्यांचे चित्त अस्थिर झाले. त्यांच्या इष्टमित्रांनी पुनर्विवाह करण्याचा त्यांना सल्ला दिला, पण त्यांना तो रुचला नाही. शके १८३०, श्रावण महिन्याच्या पौर्णिमेस रात्रौ त्यांना एक स्वप्न पडले. एक काळ्या वर्णाचा पुरुष त्यांना दिसला. त्याच्या अंगास केशरी रंगाची उटी लागली होती, कपाळास त्रिपुंड्र होते व पादुकांचीही गंधपुष्पाने पूजा झाली होती. त्याने भीष्मांच्या हाती एक वर्तमानपत्र दिले. भीष्मांनी त्याला विचारले, तू कोण व तुझे नाव काय ? तेव्हा त्याने संभाषण न करता त्या वर्तमानपत्राकडे बोट दाखविले. भीष्मांनी वर्तमानपत्राकडे नजर टाकताच त्यांना सच्चिदानंद ही ठळक अक्षरे दिसली. तितक्यात त्या पुरुषाने ''वाच'' अशी भीष्मांना आज्ञा केली. तेव्हा पुनः त्या वर्तमानपत्राकडे पाहू लागला. ''मंत्र व शिकावा'' असे एके जागी लिहिले होते. हे काय, याचा अर्थ वगैरे प्रश्न करण्याचा भीष्म विचार करतात तो तो पुरुष नाही व वर्तमानपत्रेही नाही. ते विस्मित झाले. इतक्यात त्यांच्या मित्राने दार ठोठावले व त्याबरोबर त्यांना जाग आली. ताबडतोब हे स्वप्न त्यांनी आपल्या रोजनीशीत लिहून ठेवले. पण या स्वप्नाचे कोडे काही केल्या त्यांना उमजेना. काही दिवसांनी तेथे एक गाणपत्य साधु आले. त्यांना हे स्वप्न सांगितल्यावर सदानंद स्वामी तुमचे गुरू आहेत.'' असे म्हणून त्यांना ''वशीकावा'' हा मंत्र दिला.

काही दिवसांनी भीष्म उमरावतीस गेले असता दादासाहेब खापर्ड्यांनी ''शिर्डीस चलता काय ?'' असा त्यांना प्रश्न केला. भीष्मांनी रुकार दिला व खापर्ड्यांच्यासमवेत शिर्डीस गेले. शिर्डीस पोचताच भीष्मांनी साईबाबांचे दर्शन घेतले व त्यांना नमस्कार केला. बाबांनी हात जोडले व 'जय सच्चिदानंद' असे तोंडाने म्हणाले तेव्हा भीष्म घोटाळ्यात पडले. स्वप्नात दिसलेले सच्चिदानंद व हे एक की दोन ? एक म्हणावे, तर स्वप्नातील साधु वैष्णव होते व साईबाबा तर यवन दिसतात. दोन म्हणावे, तर बाबांनी आपल्याला पाहिल्याबरोबर सच्चिदानंदाचे नाव का घेतले ? अशा विचारात ते पडले. तेथे सर्व हिंदू ब्राह्मणसुद्धा बाबांचे चरणोदक घेत असत, पण भीष्मांनी ते घेतले नाही. बाबा तंबाखूची चिलीम पीत असत. भीष्म बाबांच्या जवळ बसले असले तरी बाबांनी त्यांना सुरुवातीस चिलीम ओढण्यास दिली नाही. पण एक दिवस बाबांच्या गोष्टी चालल्या असता एका सेवकाने चिलीम भरली व बाबांच्या हाती दिली. बाबांनी ती नुसती तोंडास लावली व जवळ बसलेल्या भीष्मांना देऊन 'पी' असे म्हणाले. त्यांच्या आज्ञेप्रमाणे भीष्म चिलीम प्याले व बाबांच्या हाती परत दिली. बाबांनी ती घेतली व तोंडाने ''आपण सगळीकडे फिरतो, गड्या. मुंबई, पुणे, सातारा, नागपूर ही सगळी शहरे रामाने भरली आहेत.'' असे बोलून ते भीष्मांना एकदम म्हणाले, ''तू लाडू एकटा एकटाच खातोस, आम्हास एकही देत नाहीस. आता तरी तू मला पाच लाडू दे !'' बाबा प्रत्येक भक्ताकडे दक्षिणा मागत व त्याचा विनियोग ते परोपकाराकडे करीत, हे सर्व साईभक्तांस विदित आहेच.



साईभक्त कृष्णशास्त्री भीष्म

बाबांच्या ह्या वाक्यांनी भीष्मांच्या मनावर निराळाच परिणाम झाला. स्वप्नात दिसलेले सच्चिदानंद वेगळे व साईनाथ वेगळे ही भावना तात्काळ मावळली (तीर्थ वाटणाऱ्यांकडून त्यांनी बुध्या तीर्थ मागून घेतले ) व बाबांच्या पायावर डोके ठेवले. त्यावेळेस बाबांचा आपला वरदहस्त त्यांच्या मस्तकावर दोन मिनिटे ठेविला. तेव्हा त्यांच्या मनाची स्थिति देवनाथांच्या खालील पदांत वर्णिलेल्याप्रमाणे ''मेरा मैं जानू'' अशी झाली.

**गुरुकृपे का अंजन पाया मेरा मैं जानू।**
**आपरून नयन में छाया मेरा मैं जानू।।ध्रु.।।**
**उलट मार्ग की राह बतायी मेरा मैं जानूं।**
**बुरे करम की रेख मिटाई मेरा मैं जानूं।।१।।**

**चांदसुरज बिन परा उजाला मेरा मैं जानूं।**
**पिलाया अजरामर का प्याला मेरा मैं जानूं।।२।।**

**जहां तहां मैं आप अकेला मेरा मैं जानूं।**
**आप ही गुरू और आप ही चेला मेरा जानूं।।३।।**

**गोविंदनाथ ने यही बतलाया मेरा मैं जानूं।**
**देवनाथ अपने में मिलाया मेरा मैं जानूं।।४।।**

नंतर भीष्म बिऱ्हाडी गेले. पण ह्या परस्थळी आपण लाडू कसे करणार याची त्यांना चिंता लागली. केले तरी दुसऱ्याच्या मदतीने आणि बाबा ते ओळखणारच. शिवाय पाचच लाडू का मागितले ? नुसते लाडूच का मागितले नाही ? असा मनाशी विचार करीत त्यांनी दिवस घालविला. रात्री त्याच चिंतनात त्यांना झोप लागली. पण लवकरच ती उघडली व एक श्लोक करण्याची त्यांना स्फूर्ती झाली. लागलीच श्लोक तयार झाला. सकाळी त्याच्यापुढचे श्लोक करीत बसले असता काकासाहेब दीक्षितांनी बाबांकडे जाताना वाटेत तो श्लोक पाहिला. काही वेळाने स्नान करून भीष्मही बाबांच्या दर्शनास गेले. गेल्याबरोबर बाबांनी भीष्मांना लाडवांची आठवण करून दिली. भीष्म काही बोलले नाहीत, तरी दीक्षित म्हणाले, लाडू तयार होऊन राहिले आहेत. हे ऐकताच महाराज स्वस्थ बसले. दुसऱ्या दिवशी भीष्मांनी पाच श्लोक तयार केले व नंतर डोके बरेच चालविले, परंतु पाचापेक्षा अधिक श्लोक त्यांना स्फुरले नाहीत. बाबांच्या हातात पाच श्लोकांचा कागद दिल्यावर त्यांनी तो पाहून भीष्मांस वाचावयास आज्ञा केली. ते श्लोक वाचीत असता पुनः बाबांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. त्यावेळेस त्यांच्या मनाची जी स्थिती झाली ती अवर्णनीय होती. त्यानंतर प्रत्येक कविता तयार करावी व बाबांना दाखवावी आणि त्यांच्या आज्ञेने वाचून दाखवावी, असा क्रम सुरू झाला व 'श्री साईनाथ-सगुणोपासना' नावाची पुस्तिका तयार होऊन साईचरणी अर्पण केली.

श्री साईनाथ-सगुणोपासनेची पुस्तके १९२२ पर्यंत नामदार गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे स्वखर्चाने छापवीत असत. 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या संस्थानाची स्थापना झाल्यानंतर संस्थानच्या कार्यकारी मंडळाने भीष्मांच्या संमतीने पुस्तिकेची नवीन आवृत्ती प्रकाशित केली.

अशी आहे श्री सगुणोपासनेच्या जन्माची सुरस कथा.

## करू या जयजयकार

सकल जनांचा, या विश्वाचा,
श्री साई अवतार, करू या जयजयकार, साईचा,
करू या जयजयकार ।।

ओठावरती श्रीसाईचे, नाम सदोदित वसो
येता जाता कामही करिता, विसर साईचा नसो
कृपावंत श्रीसाईभजता, लाभे सौख्य अपार ।।१।।

पाण्यावरती दिवे लांवुनी, अशक्य ते करविले
कडुनिंबाच्या कटुपणाला, मधुर तसे केले अशक्य
तेही शक्य करवितो, साई तारण हार ।।२।।

लीन होऊनी, साईचरणी, उधळू गंध फुले
अखंड त्याचे नामचि घेता, फुलतिल सौख्य मळे
साईबाबा कृपाप्रसादें, सुखवूया संसार करूया
जयजयकार, साईचा, करूया जयजयकार ।।३।।

■ म. पां. भावे

# श्री साईबाबांच्या देहत्यागाचा परम अर्थ

प्राचार्य सी. वाय. कुलकर्णी
चेंबूर, मुंबई.



❖❖❖

**श्री साईबाबांनी विजयादशमी, दसऱ्याच्या सुमुहूर्तावर आपला नश्वर देह ठेवला. कच्छ-मत्स्या पासून ते राम-कृष्णापर्यंत प्रत्येक अवतारात अंगिकृतकार्य समाप्ती होताच त्या त्या अवताराने आपला देह ठेवलेला आहे. तोच निसर्ग नियम श्रीसाईनी पाळलेला आहे. साईंच्या देहत्यागाचा परम अर्थ सांगताहेत प्राचार्य कुलकर्णी. देह नश्वर असून आत्मा अमरआहे. हेच महावाक्य साईनी आपल्या मरणलीलेद्वारे दाखवून दिले आहे. जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी । असे साईंचे अभयवचन आहे. हे वचन वरील महावाक्याचेच दर्शनच आहे.**

❖❖❖

संपूर्ण विश्वात पसरलेल्या अगणित भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या साईबाबांनी दि. १५ ऑक्टोंबर, १९१८ रोजी विजयदशमी ह्या सिमोल्लंघनाच्या दिवशी मानवी देहरूपी सीमेचे उल्लंघन केले, आणि ते आपल्या मुळ निराकार परब्रम्ह स्वरूपात विलीन झाले. साईबाबांनी देहत्याग केला. तरीदेखील त्यांची अवतार समाप्ती मात्र झाली नाही कारण साई म्हणजे साक्षात ईश्वर. ईश्वर म्हणजे परब्रम्ह, परब्रम्ह म्हणजे संपूर्ण ब्रम्हांडाला व्यापून टाकणारी चैतन्य शक्ती जी लयातीत आहे, सदैव कार्यरत आहे. साईबाबा ह्या निर्गुण चैतन्य शक्तीचा सगुण अविष्कार असल्यामुळे मानवी देहाचा त्याग केल्यानंतर देखील त्यांचे अवतार कार्य अव्याहतपणे सुरू आहे, आणि ते काळाच्या ओघात अधिकाधिक व्यापक स्वरूप धारण करीत आहे. फरक ऐवढाच आहे की, देहधारी असे पर्यंत साईबाबांचे अवतारकार्य देहाच्या माध्यमातून होत असे. परंतु देह त्यागानंतर मात्र त्यांचे अवतार कार्य निराकार परब्रम्ह स्वरूपात सुरूच राहीले आहे. साईबाबा भक्तांना म्हणायचे की, तुम्हाला-समोर दिसतो आहे तेवढाच देह म्हणजे साईबाबा नव्हेत. ह्याचा अर्थ असा होतो की, भक्तांना दिसू शकणाऱ्या मानवी देहापूरतेच साईबाबा मर्यादित नव्हते तर ते मानवी देहा पलीकडचे होते. साईबाबांच्या ''नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य,'' नित्य ह्या प्रचित अनुभवे ''आणि'' जरी हे शरीर गेलो मी टाकून, तरी मी धावेन भक्तांसाठी''. ही दोन वचने माझ्या वरील विधानांस निश्चितच पूरक आहेत.

साईबाबांच्या देह त्यागासंदर्भात काही भक्तांच्या मनात अशी जिज्ञासा निर्माण होण्याची शक्यता आहे की, साईबाबा जर अनादी आणि अनंत होते, व्युत्पत्ती आणि लय, जन्म आणि मृत्यू हे सृष्टीचे नियम त्यांना बंधनकारक नव्हते. तर मग त्यांनी देहत्याग का केला ? साईबाबांच्या ह्या जिज्ञासू भक्तांना माझे स्पष्टीकरण असे आहे की, साईबाबा आपल्या भक्तांच्या निदर्शनास आणू इच्छित होते की, भक्तांनो सृष्टीचे नियम मला बंधनकारक नसले तरी देखील सृष्टीमध्ये समतोल राखण्यासाठी, सृष्टीच्या सर्व कार्याचे व्यवस्थित नियमन होण्यासाठी मला देखील तिचे नियम पाळायलाच हवेत आणि तुम्ही देखील ह्या नियमांचा अजिबात विरोध किंवा प्रतिकार न

करता स्विकार करायलाच हवा.

साईबाबांनी देहत्याग करण्यासाठी वृद्धत्वाचा निमित्त म्हणून वापर केला. निमित्त हा शब्द मी अशाकरिता योजिला आहे की, साईबाबा त्यांच्या योग सामर्थ्याने किंवा दिव्य दैवी सिद्धींच्या सहाय्याने आपला देह वृद्धत्वाच्या विपरीत परिणामपासून कितीही कालापर्यंत सुरक्षित ठेऊ शकले असते. आपल्या व्याधीग्रस्त भक्तांना केवळ एका कृपाकटाक्षाने किंवा हस्तस्पर्शाने असाध्य व्याधींतून मुक्त करून आयुरारोग्य देणारे साईबाबा स्वत:ला झालेली सामान्य व्याधी निश्चितच बरी करू शकले असते. परंतु तसे काहीही न करता साईबाबांनी वृद्धत्व व व्याधीचे निमित्त करून देह समर्पण केले. कारण ते आपल्या भक्तांच्या मनावर संस्कार करू इच्छित होते की, दिव्य दैवी सिद्धींचा उपयोग करून मी माझे काही देह भोग, काही देह यातना टाळू शकतो. परंतु माझे सर्व देह भोग मी टाळणे योग्य नाही कारण प्रकृतीच्या निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन करणे ही एक विकृतीच ठरेल. मला ह्या देहाचे भोग भोगलेच पाहिजेत. ज्या प्रमाणे माझी ह्या देह भोगांतून सुटका नाही. त्याचप्रमाणे तुमची देखील देह भोगांतून सुटका नाही. तुम्ही देखील तुमचे सर्व देह भोग ह्या जन्मातच देहाबरोबर संपवून टाकले पाहीजेत. सर्वसामान्य व्यक्ती प्रमाणेच वृद्धत्व व व्याधी ह्या कारणांनी देहत्यांग करून साईबाबा आपल्या भक्तांना सांगू इच्छित की, मी तुमच्यातलाच एक आहे. मी व माझ्या भक्तांमध्ये संपूर्ण एकरूपता आहे. एकात्मता आहे. समानता आहे समरसता आहे.

आपल्या भक्तांवर सदैव प्रेमामृताचा वर्षाव करणाऱ्या साईबाबांच्या मनात देहत्याग करते वेळी देखील भक्तांचा विचार होता. आपल्या भोवती उपस्थित काही भक्त अत्यंत हळवे आहेत. साहजिकच अशा भक्तांच्या उपस्थितीत देहत्याग केला तर त्यांच्यावर प्रचंड मानसिक आघात होईल व ह्या आघातातून सावरणे त्यांना फार कठीण जाईल ह्याची साईबाबांना जाणीव होती. म्हणूनच आपली देहत्यागाची घटका समीप आल्यावर साईबाबांनी भक्तांना घरी जाऊन भोजन करण्याची आज्ञा केली. आपला देहत्यागाचा समय समीप आलेला आहे. ह्याचा अंदाज काही भक्तांना आलेला आहे. आणि त्यामुळे ते भक्त अतिशय निराश व दु:खी झालेले आहेत. ह्याची साईबाबांना कल्पना होती. म्हणूनच ते अशा भक्तांना धीर सोडू नका. दु:खी होऊ नका '' असे समजावून त्यांचे मनोधैर्य वाढविण्याचा प्रयत्न करीत होते.

## अविचलपणे देहत्याग

अंतीम क्षणापर्यंत साईबाबा सावध होते. त्यांची मनस्थिती अतिशय शांत होती. स्थिर होती. आपण देहत्याग करीत आहोत. म्हणजे काही तरी विशेष करीत आहोत. ह्या भावनेचा लवलेश देखील त्यांच्या मनात नव्हता. साईबाबांचे चित्त अंतिम क्षणापर्यंत अविचल होते. ह्याचा पुरावा म्हणजे त्यांनी नेहमीप्रमाणे भक्तांकडून आपली पूजा व पूजेनंतरचे सर्व धार्मिक विधी पार पाडून घेतले होते. इतकेच नव्हे तर त्यांनी नित्य नियमाप्रमाणे त्यांचे अनन्य भक्त तात्याकोते पाटील यांना उदरनिर्वाहासाठी चार रूपये देखील दिले होते. साईबाबांची देह त्यागासमयीची ही मनस्थिती, त्यांचे वागणे भक्तांना अंतर्मुख बनविते आणि बरेच काही शिकवून जाते.

आपला देहत्याग काही क्षणांवरच आलेला आहे त्याची जाणीव होताच साईबाबांनी कफनीच्या खिशातून प्रथम पाच रूपये व नंतर चार रूपये असे एकूण नऊ रूपये त्यांच्या समीत बसलेल्या लक्ष्मीबाई या आपल्या अनन्य भक्त असलेल्या महिलेस दान दिले. अंतिम समयी दान देण्याची प्रथा आहे. या अत्यंत चांगल्या प्रथेचे स्वत: पालन करून भक्तांनी देखील या प्रथेचे पालन करावे असा संदेश अप्रत्यक्षपणे साईबाबांनी दिला आहे. साईबाबांच्या अंतिम दानासंदर्भात काही प्रश्न उपस्थित रहाण्यासारखे आहे ते प्रश्न आहेत साईबाबांनी त्याच्या भोवती अनेक निष्ठावान पुरूष भक्त बसले असून देखील लक्ष्मीबाई या स्त्रीलाच दान का दिले ? साई बाबांनी नऊ रूपयेच दान का दिले ? नऊ रूपये ही दानाची रक्कम एकदम न देता ५ रूपये आणि ४ रूपये अशी विभागून का दिली ? वरवर पहाता हे प्रश्न निरर्थक किंवा नगण्य वाटणे शक्य आहे. परंतु साईबाबांच्या प्रत्येक कृतीमध्ये निश्चितच अतिशय चांगला गुढ अर्थ असायचाच या शाश्वत सत्याचा स्विकार केल्यास वरील प्रश्न महत्त्वाचे आणि अर्थपूर्ण ठरतात. साईबाबांच्या अंतिम दानाशी संबंधित (ज्याला महा दान असे संबोधण्यास हरकत नसावी.) वरील प्रश्नांवर विचार चिंतन मनन व चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण असे झाल्यास साईबाबांच्या अंतिम दानामागील अन्वयअर्थाचे रहस्य उलगडेल व भक्तांना योग्य मार्गदर्शन मिळेल.

मी देखील माझ्या मर्यादीत वैचारिक कुवतीचा व अत्यंत ज्ञानाचा उपयोग करून साईबाबांच्या अंतिम दानासंदर्भात उपस्थित होवू शकणाऱ्या वरील प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा अनेक वेळा प्रामाणिक प्रयत्न करीत असतो. माझ्या दृष्टीने सुदैवाची गोष्ट म्हणजे केवळ साईबाबांच्या प्रेरणेने व कृपेने साईबाबांच्या अंतिम दानाशी संबंधित वरती उपस्थित केलेल्या प्रश्नांची माझ्या समजूतीप्रमाणे समाधानकारक उत्तरे मला मिळालेली आहेत. कदाचित हा माझा संभ्रम देखील असण्याची शक्यता आहे. ज्ञानीसाई भक्तांनी योग्य मार्गदर्शन करावे म्हणून त्यांच्या विचारार्थ मी साई बाबांच्या अंतिम ज्ञानाच्या संबंधीत वरील प्रश्नांच्या माझ्या उत्तरांचे स्पष्टीकरण देत आहे.

## लक्ष्मीबाईस 'माता' म्हणून दान

साईबाबांनी त्यांच्या आसपास पुरूष भक्त असतांना देखील लक्ष्मीबाई या महिला भक्तास दान दिले कारण स्त्री ही जन्मदाता मातेचे प्रतिक असते. काही भक्तांच्या मते साईबाबा

अयोनीज असल्यामुळे मातेच्या गर्भाशयात त्यांची उत्पत्ती झाली नसेलही ते स्वयंभू असण्याची शक्यता आहे. परंतु प्रत्येक मानवाची उत्पत्ती ही मातेच्या गर्भातच होत असते. माता तिच्या उदरातील गर्भाशयात नऊ महिने भ्रूण रूपात आपले संगोपन करीत असते. मातेच्या उदरातच नऊ महिने आपण आकार घेत असतो. आणि जन्म घेतल्यानंतर अनेक वर्ष मातेचा आधार घेऊनच या जगात आपले अस्तीत्व टिकवीत असतो. माता आपलयावर सतत उत्कट प्रेमाचा वर्षाव करीत असते. आपल्यासाठी सर्वस्वाचा त्याग करीत असते. सहाजिकच प्रत्येक व्यक्ती मातेची अत्यंत ऋणी असते. यास्तव जीवनाच्या अंतसमयी, जीवनाचा शुभारंभ ज्या मातेचा उदरात झालेला असतो. तिचे स्मरण करणे. तिला वंदन करणे तिला आदरांजली अर्पण करणे प्रत्येक व्यक्तीचे अत्यंत पवित्र कर्तव्य तर आहेच परंतु हा अत्यंत पवित्र असा संस्कार देखील आहे. आपल्या भक्तांना पवित्र कर्तव्याचे, पवित्र संस्काराचे स्मरण करून देण्यासाठी साईबाबांनी मुद्दाम लक्ष्मीबाई या महिलेस जाणीवपूर्वक नऊ रूपये अंतिम दान दिले असावे.

साईबाबांनी भक्तांना केलेल्या उपदेशामध्ये ईश्वर भक्तीला अनन्य साधारण महत्व आहे. ईश्वर भक्ती ही श्रवण, किर्तन, स्मरण चरण सेवा, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्म निवेदन अशा नऊ पद्धतीने केली जाते. साईबाबांनी देहत्याग करण्यापूर्वी नऊ रूपये दान देवून आपल्या भक्तांना भक्तीच्या नवविधा लक्षणांचे पालन करण्याचा संदेश दिला. साईबाबांनी दसऱ्याच्या दिवशी म्हणजे विजयादशमीला देहत्याग केला. दुर्गा मातेचा नऊ दिवस चालणारा नवरात्र सोहळा पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी साईबाबांनी देहत्याग केला तेव्हा नऊ रूपये दान करून साईबाबांनी नवरात्र पूजन केले असे म्हणता येईल. आकाशास्थित ग्रह गोलांवर त्यांचे वर्चस्व होते. मंगळ, बुध, गुरू, शुक्र, रवि, शनि, चंद्र, हर्षल, व नेपच्युन या नव ग्रहांच्या स्थितीचे, त्यांच्या भ्रमणांचे मानवाच्या जीवनांवर प्रतिकूल व अनुकूल परिणाम होत असतात. साईबाबांनी भक्तांना त्यांच्या जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांपासून मुक्त केल्याची अनेक उदाहरणे आहेत. केवळ भक्तांच्या उद्धारासाठी नवग्रहांच्या सत्तेवर अंकूश ठेवल्यामुळे देहत्याग करण्याच्या, त्यांची शांती करण्याच्या उद्देशाने, माझ्या भक्तांवर तुम्ही अवकृपा करू नका असे त्यांना साकडे घालण्यासाठी तसेच भक्तांनी देखील नवग्रहाचे वर्चस्व स्विकारावे असे त्यांना संदेश देण्यासाठी साईबाबांनी अंतिम समई नऊ रूपये दान दिले असे म्हणता येईल.

## नवरात्र व नवनाथ

साईबाबांचे काही भक्त त्यांना प्रभूरामचंद्राचा अवतार मानीत असत. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर नक्षत्रांच्या स्थितीचे निश्चितच दूरगामी परिणाम होत असतात. विशेषत: पृथ्वीवरील अनेक घडामोडींमध्ये नक्षत्रांचा फारच मोठा सहभाग असतो. नक्षत्रे एकूण सत्तावीस असून त्यांची नांवे अश्विनी, भरणी, कृतिका, रोहिणी, मृग, आद्रा, पूनर्वसू, पुष्प, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, मुळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, पु.भाद्रपदा, उ.भाद्रपदा, रेवती अशी आहेत. सत्तावीस ह्या आकड्यातील दोन व सात ह्या आकड्यांचीबेरीज देखील नऊ होते. म्हणून साईबाबांनी नऊ रूपये दान दिले ह्या त्यांच्या कृतीचा अर्थ असा देखील लावता येणे शक्य आहे की माझ्या भक्तांच्या जीवनावर तुमची वक्र नजर पडू देऊ नका. त्यांच्या जीवनावर तुमचे विपरित परिणाम होऊ देऊ नका, सृष्टीच्या नियामांप्रमाणे तुमचे कार्य सुरळीतपणे सुरू असू द्या, माझे भक्त निश्चितच तुमचे वर्चस्व मानतील. साईबाबा नेहमीच अतर्क्य, अनाकलनीय चमत्कार करीत असत. चमत्कार करणे फक्त सिद्ध पुरूषालाच शक्य असते. साईबाबा तर महासिद्ध होते. साईबाबांकडे आठ महासिद्धी व दहा उपसिद्धी मिळून एकूण अठरा सिद्धी होत्या. साईबाबांकडे असलेल्या अठरा सिद्धींच्या एक व आठ ह्या आकड्यांची बेरीज नऊ होते. साईबाबांनी नऊ रूपये दान करूनआपल्या भक्तांना असा दिलासा दिला आहे की माझ्या सर्व सिद्धी मी तुमच्या कल्याणासाठी येथेच सोडून जात आहे. **''नवसास माझी पावेल समाधी, धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी''** आणि **''जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस, मागे जे जे त्यास ते ते लाभे''** ही वचने साईबाबांच्या सर्व सिद्धी त्यांच्या देहत्यागानंतर देखील कार्यरत आहेत हेच दर्शवीतात.

साईबाबा आपल्या भक्तांना ''अल्ला भला करेगा'' असा आशीर्वाद देत असत. तसेच ते स्वत:ला अल्लाचा बंदा सेवक समजत असत. मुसलमान धर्मामध्ये नवव्या महिन्यातील नवव्या दिवसाची रात्र फार महत्त्वाची रात्र समजली जाते. ह्याच दिवशी म. पैगंबरांच्या दोन मुलांची अधर्मी व्यक्तींनी कत्तल केली व ते दोघे अल्लाला प्यारे झाले म्हणजेच अल्लाच्या चरणी रूजू झाले. साईबाबांनी नऊ रूपये दान देऊन अप्रत्यक्षपणे आपल्या मुसलमान भक्तांना कत्तलीच्या रात्री मृत्यूने घातलेल्या थैमानाचे स्मरण करून दिले. आणि त्यांना असे सुचविले की त्याप्रमाणे नवव्या रात्री पैगंबरांची मुले अल्लाच्या चरणी रूजू झाली त्याचप्रमाणे मी देखील आता अल्लाच्या चरणी रूजू होत आहे. भारतीय प्राचीन संख्याशास्त्रानुसार मोठ्यात मोठी संख्या ही परार्थ आहे. परार्थ म्हणणे एकावर अठरा शून्य. ह्या अठरा शुन्यांच्या एक आणि आठ ह्या दोन आकड्यांची बेरीज नऊ येते. साहजिकच साईबाबांनी नऊ रूपये दान करून आपल्या भक्तांना असे सुचविले आहे की तुमचे प्रेम, तुमचा त्याग, तुमची भूतदया परार्थ ह्या अती विशाल संख्येप्रमाणेच विशाल होऊ द्या.

## पंचमहाभूते व पांच उपचार

साईबाबांनी लक्ष्मीबाईला नऊ रूपयांपैकी प्रथम पाच रूपये देऊन आपल्या भक्तांना अतिशय महत्वाचे संदेश व संकेत दिले आहेत. साईबाबांचे पंचमहाभूतांवर वर्चस्व होते. अनेक प्रसंगी त्यांनी आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी पंचमहाभूतांना विविध आज्ञा करून, त्यांच्यावर नियंत्रण ठेवले होते. साहजिकच पंचमहाभूतांनी वेळोवेळी आपले आज्ञापालन केल्यामुळे आप, तेज, वायू, पृथ्वी व आकाश ह्या पंचमहाभूतांबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, त्यांच्या बद्दल आपल्या मनात असलेली आदराची भावना व्यक्त करण्यासाठी साईबाबांनी ह्या पंचमहाभूतांना पाच रूपये दान केले असावेत. साईबाबांची आपण षोडशोपचारे म्हणजेच त्यांना सोळा उपचार अर्पण करून पूजा करावी अशी प्रत्येक भक्ताची मनोकामना असते. परंतु नेहमीच बाबांची षोडशोपचारे पुजा करणे भक्तांना शक्य होतेच असे नाही. सहजीकच श्रद्धाळू साईभक्त ह्यामुळे व्यथीत होतात. साईबाबांनी पाच रूपये दान करून आपल्या भक्तांना सांगितले आहे की भक्तांनो माझी षोडशोपचारे पूजा करणे शक्य झाले नाही तर हिरमुसले होऊ नका, मनाला लावून घेऊ नका, बेचैन होऊ नका, तुम्ही माझी षोडशोपचारे पूजा न करता, गंध, पुष्प, धूप, दिप, नैवैद्य हे पाच उपचार अर्पण करून पंचोपचार पूजा केलीत तरी देखील तुम्हांला षोडशोपचारे पूजा केल्याचेचे श्रेय मिळेल. मला षोडशोपचारे पूजा करून घेतल्याचे समाधान मिळेल.

मुसलमान धर्माची पाच प्रमुख तत्वे आहेत ही तत्वे आहेत. अल्ला हाच ईश्वर असून महंमद हा त्याचा प्रेशित आहे, दररोज पाच वेळा अल्लाला नमा आदा करणे, रमजान महिन्यांत रोजा राखणे, उत्पन्नाच्या अडीच टक्के भाग दान करणे आणि आयुष्यात शक्यतो एकदा हाज यात्रेला जाणे. साईबाबांनी पाच रूपये दान करून आपल्या मुसलमान भक्तांना इस्लाम धर्माच्या ह्या पाच प्रमुख तत्त्वांची आठवण करून दिली. व ह्या तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचा संदेश दिला. साईबाबांच्या द्वारकामाईत दररोज ब्रम्हयज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ, व मनुष्ययज्ञ चालत असे. आपल्या देहत्यागानंतर देखील भक्तांनी हे पाच यज्ञ द्वारकामाईत सुरू ठेवावेत असे साईबाबांनी पाच रूपये दान करून सूचविले आहे.

साईबाबांनी पांच रूपयांनंतर चार रूपये दान करून आपल्या भक्तांना अशी कल्पना दिली की ह्या पुढे माझे अस्तित्व केवळ द्वारकामाईत किंवा शिरडीमध्येच असणार नाही तर ते चारही दिशांमध्ये असेल. चार रूपये दान करून साईबाबांनी भक्तांना असे सुचविल्याची शक्यता आहे की मी धारण केलेल्या ह्या मानवी देहाच्या कुमारावस्था, तारूण्य प्रौढत्व व वार्धक्य ह्या चार अवस्था पूर्ण झाल्यामुळे मी आता देहत्यागकरण्यास पात्र झालेला आहे, सज्ज झालेला आहे. तुम्ही देखील ह्या सल्ल्याचा स्वीकार करून योग्य त्या वेळी मृत्यूचा स्विकार करण्यास सज्ज व्हा.

साईबाबांनी चार रूपये दान करून आपल्या भक्तांना त्यांनी पण चार्तुवण्याचा त्याग करावा, माणसा माणसांमध्ये भेदभाव निर्माण करणाऱ्या वर्णव्यवस्थेचा व ह्या वर्णव्यवस्थेनेच अस्तित्वात आणलेल्या जाती व्यवस्थेचा त्याग करावा आणि आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे असल्याची अनुभूती घ्यावी असा सल्लाच दिलेला आहे. सामवेद, अथर्ववेद, यजुर्वेद, ऋग्वेद हे चार वेद म्हणजे हिंदू धर्माचा मूलाधार समजण्यास हरकत नाही. साईबाबांनी चार रूपये दान करून आपल्या भक्तांना **ईशारा** दिला आहे की त्यांनी ह्या चार वेदांकडे अजिबात दूर्लक्ष करू नये. ह्या चारं वेदांचा सखोल अभ्यास करावा वेदांमध्ये पारंगत व्हावे आणि वेद विद्येचा वापर मारवाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी करून घ्यावा. प्राचीन भारताच्या सामाजिक व्यवस्थेमध्ये ब्रम्हचर्यश्रम, गृहास्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम अशी चतुर्थाश्रम व्यवस्था होती. परंतु काळाच्या ओघातही चतुर्थाश्रम व्यवस्था नष्ट झाली. सहाजिकच ह्या मुळे भारतीयांच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनावर विपरीत परिणाम झाले आहेत, गंभीर स्वरूपाच्या सामाजिक, कौटुंबिक व वैयक्तिक स्वरूपाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आपल्या भक्तांनी ह्या चतुर्थाश्रम पद्धतीचे आधुनिक जीवनाशी सुसंगत अशा स्वरूपात, पद्धतीत आणि प्रमाणात आज देखील पालन करावे अशी आपली इच्छा साईबाबांनी चार रूपये दान करून व्यक्त केली असण्याची शक्यता आहे. हिंदू धर्मानुसार सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग अशी चार युगे आहेत. साईबाबांनी चार रूपये दान करून स्पष्ट केले की त्यांचे वास्तव्य ह्या चारही युगांत होते, ते चारही युगांचे एकमेव साक्षीदार आहेत. हिंदू धर्माचे अनुयायी चारधाम यात्रा अतिशय पवित्र व शुभफलदायी मानतात. आपल्या आयुष्यात एकदातरी चारधाम यात्रा घडावी अशी प्रत्येक धार्मिक व श्रद्धाळू व्यक्तीची इच्छा असते. साईबाबांनी चारधाम यात्रा करणाऱ्या मनोदय असलेल्या आपल्या भक्तांना जाणिव करून दिली आहे की तुम्ही बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री व जम्नोत्री ह्या चारधाम यात्रेस जाण्याची आवश्यकता नाही कारण शिरडीची वारीच तुमची चारधाम यात्रा आहे.

मुसलमान धर्मानुसार पैगंबर, अबू बकर, उमर व हरून अल रशिद असे चार खलीफे होऊन गेले आहेत. मुसलमान धर्मियांच्या मनात अत्यंत आदराचे, श्रद्धेचे स्थान प्राप्त केलेल्या ह्या खलीफांना साईबाबांनी चार रूपये दान करून अभिवादन केले असणार महमंद पैगंबरांनी स्थापन केलेल्या इस्लाम धर्माचे सर्वप्रथम केवळ चार अनुयायी होते. आणि ते म्हणजे पैगंबरांची पत्नी, जावई, एक मित्र व एक जोडीदार. साईबाबांनी चार रूपये

दान करून इस्लाम धर्माच्या ह्या आद्य अनुयायांचे स्मरण त्यांच्या मुसलमान भक्तांना करून दिले असेल व कितीही खडतर, प्रतिकूल परिस्थितीती निर्माण झाली तरी देखील त्या चार अनुयायांप्रमाणे तुमची इस्लाम धर्मावरील निष्ठा अविचल राहू द्या असे आपल्या मुसलमान भक्तांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला असेल.

साईबाबांनी नऊ रूपये दानाची विभागणी करण्यासाठी मुद्दामच पाच आणि चार असे दोन आकडे निवडले याचा आणखी एक भक्कम पुरावा म्हणजे अध्यायात पाच व चार ह्या आकड्यांना अनन्यसाधारण महत्व आहे. मानवाचा स्थूल देह हा पंचमहाभूतांचा किंवा पंचतत्वांचा मिळून बनलेला असतो. मानवाच्या स्थूल देहात म्हणजेच डोळ्यांनी दिसू शकणाऱ्या शरीरात नाक, कान, जीभ, त्वचा, व डोळे ही पाच ज्ञानेंद्रिये असतात. तर हृदय, उदर, हात, पाय, व गुद ही पाच कर्मद्रिये असतात. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध ह्या पांच मात्रांच्या माध्यमातून मानवाच्या स्थूल देहांचे कार्य सुरू असते. मानवाच्या सुक्ष्म देहात म्हणजेच डोळ्यांनी न दिसणाऱ्या परंतु अंतर्चक्षूने जाऊ शकणाऱ्या देहात अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश व आनंदमय कोश असे पाच कोश असतात. जीव जन्माला आल्यावर त्याचें संगोपन करणारी प्राणशक्ती पाच वायुंमध्ये विभागली गेली असून हे पाच वायू आहेत प्राण, अपान, उदान, व्यान व समान मानवाच्या सुक्ष्म देहात अंत:करण चुतुष्टय असते आणि ह्या अंतकरण चतुष्ट्यात मन, बुद्धी, चित्त, व अहम अशी चार अंतर इंद्रिये आहेत. आत्मानुभव हा स्वत:सिद्ध, स्वत:प्रमाण, स्वयंप्रकाश, स्वयंपूर्ण स्वसंवेद्य ह्या पाच लक्षणांनी परिपूर्ण असतो. परमार्थ साधनेच्या पायऱ्या पाच असून त्या जिज्ञासा, चित्तशुद्धी, आत्मचिंतन आकाशी तद्रुपता व अनन्यता अशा आहेत. भगवंताच्या असलेपणाच्या खुणा, प्रकाश, नाद, सुगंध, रस व दर्शन अशा पाच आहेत. आत्म्याची अस्भूला, अगूण, अन्हस्व, अदीर्घ, अलोहीत, अस्नेह, असंग, अरस, अगंध, अचक्षूष्क, अश्रोग, अवाक, अमन व अप्राण अशी चौदा लक्षणे असून चौदा आकड्यांतील एक व चार आकड्यांची बेरीज पाच होते. विद्यादेखील चार वेद, सहा वेदांग, मिमांसा, न्याय, इतिहास व पुराण अशा एकूण चौदा असल्यामुळे त्यांच्या एक व चार आकड्यांची बेरीज पाचच येते.

देहाचे स्थूल, सुक्ष्म, कारण व महाकारण असे चार प्रकार असुन ह्या चार स्थानांतून वैखरी, मध्यमा, पश्यंती व परा ह्या पद्धतीने नामस्मरण करता येते. पुरूषार्थ देखील चार असून त्यांची नांवे धर्म, अर्थ काम व मोक्ष अशी आहेत. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द अशी चार ज्ञानसाधने आहेत. मानवाचा जीव भावना, कल्पना, विचार व लक्ष ह्या चार माध्यमांतून आत्मानुभवामध्ये सहभागी होत असतो.

ज्ञानेश्वरांनी परमार्थाचे चार प्रकार सांगितले असून ते ज्ञानयोग, भक्तीयोग कर्मयोग, व राजयोग असे आहेत. मुमुक्षाला मुक्त करण्याचे मार्ग चार असून ते श्रद्धा, भक्ती, त्याग व योग हे आहेत. मुक्तींचे प्रकार देखील चार असून ते सलोकता समीपता, स्वरूपता व सायुज्यता हे आहेत. जीवनमुक्ताचा व्यवहार हा बाल, उन्मत्त, पिशाच किंवा शांत ह्या चार वृत्तींपैकीच एक वृत्तीने घडत असतो व सामान्य साधकांच्या हातून सहजगत्या होणारे दोष; आत्मप्रौढी, दुसऱ्याला दुसऱ्याला तुच्छ लेखणे, दुसऱ्याची निंदा करणे व दुसऱ्याला ज्ञानाच्या गोष्टी सांगणे. साईबाबांनी अंतीम दान करतांना अध्यात्म शास्त्रातील अत्यंत महत्वाच्या आकड्यांचा उपयोग करून आपल्या भक्तांचे ध्यान अध्यात्म शास्त्राकडे वळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. किंवा भक्तांना तुम्ही अध्यात्मशास्त्रामध्ये विशेष लक्ष घालून अंतिम पायरी पुढे म्हणजेच आत्मसाक्षात्कार अनुभवा पर्यंत जाण्याचा प्रयत्न करायला हवा साईबाबांनी सुचीत केले आहे.

साईबाबांनी नऊ रूपये दान केल्यानंतर लगेचच ते त्यांच्या समीप बसलेल्या अनन्यभक्त शामा देशपांडे यांना म्हणाले की "शामा, मला आता बरे वाटत नाही, मला आता बुटींच्या वाड्यात घेऊन चला." साईबाबांचे "मला आता बुटी वाड्यात घेऊन चला" हे वाक्य अतिशय अर्थपूर्ण होते. अंतिमसमयी हे वाक्य उच्चारून साईबाबांनी आपल्या भक्तांना अप्रत्यक्षपणे आज्ञापित केले होते की माझे समाधी मंदिर बुटींच्या वाड्यातच बांधले जावे. साईबाबांनी वरील उद्‌गार काढले आणि क्षणार्धात जवळच बसलेल्या बयाजी कोते पाटील ह्या आपल्या भक्ताच्या खांद्यावर मान टाकली. साई बाबांच्या प्रकृतीकडे सतत लक्ष देऊन असलेल्या भागोजी शिंदे ह्या भक्ताने साईबाबांची ही अवस्था पाहून जवळच असलेल्या नानासाहेब चांदोरकरांना हाक मारली. नानासाहेब त्वरित गंगोदक घेऊन धावत आले आणि त्यांनी साईबाबांच्या मुखात गंगोदक घातले. परंतु तो पर्यंत साईबाबांनी देहत्याग केला होता. साईबाबांनी देहत्याग केलेला आहे हे समजताच द्वारकामाईत उपस्थित असलेल्या भक्तांनी दु:ख वेगाने त्यांना "देवा" अशी हाक मारूनआक्रोश सुरू केला.

साईबाबांनी देहत्याग केल्यामुळे आज देहरूपात साईबाबा आपल्यात नाहीत. मात्र निराकार परब्रम्हस्वरूपात साईबाबा कायमचेच आपल्यामध्ये आहेत आणि ह्या शाश्वंत सत्वाची प्रचीती विविध प्रकारे साईभक्तांना नेहमीच येत असते. यास्वत साईभक्तांनी अशी भावना आपल्या मनात सतत जागृत ठेवायला हवी की साईबाबा सदैव त्यांच्या उद्धार करण्यास समर्थ आहेत आणि कार्यरत आहेत. आपल्या आचार-विचारांवर प्रत्येक कृतीवर साईबाबांचे सुक्ष्म लक्ष आहे आणि म्हणूनच साईबाबांनी उपदेशिलेल्या उदात्त जींवनमुल्यांचे पालन प्रत्येक भक्ताने काटेकोरपणे करायलाच हवे.

# साधुसंत येती घरा ।
# तोचि दिवाळी दसरा ।।

हरिश्चंद्र म्हात्रे



दिपावली हा सण भारतीय लोकांत सर्वात मोठा व लोकप्रिय सण मानला जातो. हा सण **'दिवाळी'** किंवा **'दिपावली'** या नावानी संबोधला जातो. हा सण हिंदू शास्त्राप्रमाणे एकूण पाच दिवस साजरा केला जातो. पौराणिक कथांचा आधार घेऊन प्रत्येक दिवसाला त्या त्या दिवसाचे महात्म्य प्रतिपादीत केले आहे. हा सण आश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध द्वितीयाभाऊबीज या दिवसांपर्यंत साजरा केला जातो.

या काळात शेतकऱ्याने केलेल्या कष्टाचे चीज झालेले असते. शेतात पीक येऊन शेतकऱ्यांचे घर धनधान्याने समृद्ध झालेले असते. त्याचा आनंद शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत असतो. बोनस मिळत असल्यामुळे या काळात कामगार वर्ग आनंदीत असतो. या सणात घरातल्या प्रत्येक माणसाला नवीन वस्तूचा लाभ होत असल्यामुळे प्रत्येक जण आनंदात असतो. शाळेला सुट्टी असल्यामुळे विद्यार्थीवर्ग आनंदात असतो. या सणात घालावयास नवीन कपडे मिळत असतात. खमंग, रुचकर, स्वादिष्ट व गोड पदार्थ खावयास मिळतात. जिकडे-तिकडे दिव्यांची रोषणाई व घरासमोर निरनिराळ्या प्रकारची आरास केलेली असते. जिकडे-तिकडे रंगीबेरंगी नक्षीदार व आकर्षक आकाश कंदील लावलेले दिसतात. घरांसमोर घातलेले सडासंमार्जन व रंगीबेरंगी रंगात काढलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या आकर्षक रांगोळ्या या अनेक कारणांमुळे सगळीकडे आनंदाचे साम्राज्य पसरलेले असते.

दीपावली हा सण आश्विन वद्य त्रयोदशी (धनतेरस) या

दिवसापासून कार्तिक शुद्ध द्वितीया (भाऊबीज) या दिवसापर्यंत हा सण शास्त्राप्रमाणे साजरा केला जातो. दीपावली या सणाची सुरुवात धनत्रयोदशी या दिवसांपासून सुरू होते. धनत्रयोदशी संबंधी कथा पुराणात खालीलप्रमाणे सांगितली जाते.

## धनत्रयोदशी

एकदा यमराजाने आपल्या दूतांना खालील प्रमाणे प्रश्न विचारले, ''तुम्ही एखाद्याचे प्राण हरण करताना तुम्हाला कधी दया आली होती का? त्यावर दूतांनी घडलेली कथा यमराजाला सांगितली. इंद्रप्रस्थामध्ये 'हंस' नावाचा राजा राज्य करीत होता. तो राजा एकदा मृगयेकरिता जंगलात गेला असताना तहान, भूक व श्रम यांनी अतिशय व्याकूळ झाला. तो सरोवराचा शोध करीत करीत 'हैम' नावाच्या राजाकडे गेला. हैम राजाने हंस राजाचा उत्तम प्रकारे आदरसत्कार केला. त्या दिवशी 'हैम राजाला पुत्र संततीयादिवशी हैम षष्ठीदैवी स्त्री रुपाने प्रकट झाली व राजास म्हणाली, ह्या मुलाचे लग्न झाल्यानंतर चारच दिवसांनी हा मुलगा सर्पदंशाने मरण पावेल. हे वाक्य षष्ठादेवीच्या तोंडून ऐकल्यानंतर हैम राजाला तसेच हंस राजाला अतिशय वाईट वाटले. पुढे हैम राजाने एका सरोवराच्यामध्ये लाकडी खांबावर घर बांधले व मुलास राहण्यास सांगितले. मुलगा मोठा झाल्यावर राजाने त्याचे मोठ्या थाटामाटाने लग्न केले. विधी लिखित कधीही व कुणालाही चुकत नसते. या न्यायाने लग्न झाल्यानंतर चारच दिवसांनी सर्पदंशाने राजपुत्र मरण पावला. त्या तरुणाचे प्राण हरण करते समयी आम्हाला अतिशय दुःख झाले. असा प्रसंग कुणावरही न येवो असा वर आपण देत असाल, तर लोकांवर फार मोठे उपकार होतील. हे दूतांचे भाषण ऐकून यम राजा प्रसन्न झाला व वर दिला की, आश्विन वद्य धनत्रयोदशी पासून जो पाच दिवस दिवे लावील, त्याला अपमृत्यू कधीही येणार नाही. त्या वेळेपासून धनत्रयोदशीच्या दिवशी दिवे लावण्याची प्रथा सुरू झाली.

## नरकचतुर्दशी

हा दीपावली सणातील पहिला अभ्यंगस्नानाचा दिवस. या दिवशी पहाटे अंगाला उटणे व सुवासिक तेल लावून स्नान केले जाते. बऱ्याच ठिकाणी व बहुतेक खेडेगावात अंगाला चिराटे (एक अतिशय कडू फळ) लावण्याची पद्धत आहे. अभ्यंगस्नान झाल्यानंतर जिकडे-तिकडे फटाक्यांची आतषबाजी केली जाते. नरकचतुर्दशीच्या महात्म्याचे वर्णन हरिविजय ग्रंथात केले असून त्यासंबंधी कथा खालीलप्रमाणे :-

द्वापारयुगात 'नरकासुर' नावाचा राक्षस होऊन गेला. तो फार पराक्रमी होता. त्यांनी पृथ्वीवरील बहुतेक राजांना आपल्या स्वसामर्थ्याने त्रस्त करून सोडले होते. त्यांनी आपल्या सामर्थ्याने अनेक राज्यातील कुमारिकांचे हरण केले होते. अशाप्रकारे त्याने एकूण १६१०० कुमारिकांना आपल्या तुरुंगात डांबून ठेवले होते. वरील बंदीस्त तरुणींना तुरुंगातील जीवन असह्य होऊ लागले. तुरुंगात होत असलेल्या यातनांमुळे त्या सर्व तरुणी नरकासुराला शाप देत होत्या व त्याचे अपयश चिंतित होत्या. नरकासुराने जिकडे-तिकडे हाहाकार माजविला होता. लोकांचे जीवन उद्ध्वस्त करीत होता. नरकासुराच्या भितीमुळे पुजा-अर्चा, जप-तप, यज्ञादिक कर्मे बंद पडू लागली. नरकासुराच्या पापाची घडी भरत आलीहोती. भगवान श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे की, दुष्टांचा संहार व सुष्टांचे रक्षण करण्यासाठी मी अवतार धारण करतो.

नरकासुराच्या दुष्ट कर्मांची यादी भगवान श्रीकृष्णाच्या कानावर गेली. जनतेच्या कल्याणासाठी नरकासुराचा बंदोबस्त करण्याचा निश्चय त्यांनी केला. नरकासुराबरोबर युद्ध करण्यासाठी भगवान श्रीकृष्ण निघाला. त्यावेळी सत्यभामा तेथे हजर होती. सत्यभामेने युद्धभूमिवर लढाई बघण्याची इच्छा भगवान श्रीकृष्णाजवळ प्रकट केली. पुढील भविष्य जाणून त्यानी सत्यभामेला बरोबर घेतली. नरकासुराच्या राज्यात आल्यानंतर भगवान श्रीकृष्ण व नरकासुर यांचे घनघोर युद्ध सुरू झाले. प्रत्यक्ष युद्धभूमिवर युद्ध पहात असल्यामुळे सत्यभामेच्या शरीराला आपोआप स्फुरण चढले. नरकासुराबरोबर युद्ध करण्याची तिला इच्छा झाली. आपली इच्छा तिने भगवान श्रीकृष्णाकडे प्रदर्शित केली. पुढील भविष्य माहित असल्यामुळे भगवान श्रीकृष्णाने धनुष्यबाण सत्यभामेच्या हातात दिला. धनुष्यबाण हातात मिळताच एखाद्या निष्णात धर्नुधाराप्रमाणे सत्यभामा बाण सोडू लागली. नरकासुराने सत्यभामेवर बाणांचा वर्षाव सुरू केला. त्यानी सोडलेल्या सर्व बाणांचे खंडन सत्यभामेने मोठ्या चातुर्याने केले. सत्यभामेचे युद्धकौशल्य पाहून भगवान श्रीकृष्णाला अतिशय आनंद झाला. नरकासुराला असा शाप होता की, स्त्रीबरोबर युद्ध केल्यास त्याला तात्काळ मृत्यू येईल. ही शापवाणी भगवान श्रीकृष्णाला माहित असल्यामुळे त्यानी सुदर्शन चक्र नरकासुरावर सोडून त्याचा शिरच्छेद केला. तो दिवस म्हणजे आश्विन वद्य चतुर्दशी ! तीन प्रहर रात्रीस चंद्र उदयी नरकासुराचा वध केला. मरते समयी नरकासुराने भगवान श्रीकृष्णाकडे वर मागितला, देवा, तुझ्यासमोर तसेच

तुझ्या हातून माझा मृत्यू होत आहे. म्हणून मला सद्‌गती प्राप्त होवो. आजचा दिवस माझ्या नावाने ओळखला जावो. तसेच आजच्या दिवशी पहाटे चंद्रउदयापूर्वी जो स्नान करील, तो सुखी होवो. त्यावेळेपासून आश्विन वद्य चतुर्दशीला 'नरकचतुर्दशी' असे नाव पडले व चंद्रउदयापूर्वी मंगलस्नान करण्याची प्रथा सुरू झाली. भगवान श्रीकृष्णाने तथास्तु म्हटले व परत द्वारकेला सूर्यउदयापूर्वी सत्यभामेसह परत आले.

भगवान श्रीकृष्ण द्रष्टे होते. नरकासुराने बंदीवान केलेल्या तरुणींची समाजाकडून अवहेलना होईल. जनता त्यांच्याकडे तिरस्कार नजरेने बघेल. त्यांना कुणीही आसरा देणार नाही. त्या तरुणींचा कुणीही स्वीकार करणार नाही. त्यापैकी बहुतेक सर्वच तरुणींना अपमानीत जीवन जगावे लागेल. समाजाकडून होणारी अवहेलना सहन न झाल्यास त्यापैकी कितीतरी तरुणींना आत्मबलिदान केल्याशिवाय पर्याय उरणार नाही. या सर्व गोष्टींचा भगवान श्रीकृष्णाने सखोल विचार केला. एक क्रांतीचे पाऊल म्हणून त्यांनी नरकासुराच्या बंदीखान्यात असलेल्या १६१०० तरुणींबरोबर विवाह करून त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

नरकासुराचा वध करून भगवान श्रीकृष्णाने जगाला महान संदेश दिला तो असा नरक म्हणजे घाण. घाण हाच भयंकर असुर म्हणजे राक्षस आहे. घाणीमुळे अनेक प्रकारच्या रोगांना आमंत्रण दिले जाते. घाण कुजल्यामुळे तिच्यातून दुर्गंधी सुटते. शरीराला अपायकारक असे निरनिराळ्या प्रकारचे वायु घाणीतून बाहेर पडतात. घाणीपासून अनेक प्रकारचे जंतू व डास यांची उत्पत्ती होते. विषमज्वरासारखा ताप ज्या डासांमुळे शरीराला होतो, असे डास घाणीतूनच निर्माण होतात. घाण म्हणजे प्रत्यक्ष रोगांना आमंत्रण देणे होय. म्हणून प्रत्येकाने आपले घर, आजूबाजूची जागा, रस्ते, गटारे, विभाग गाव व शहर घाणीपासून स्वच्छ ठेवल्यास मानवाला दुर्गंधीपासून तसेच काही रोगांपासून मुक्तता मिळेल. मानवी आरोग्य चांगले राहील. घाण साफ करणे, घाण होऊ न देणे म्हणजेच खऱ्या अर्थाने 'नरकासुराचा' वध करणे होय.

बळी नावाचा दैत्यकुळातील राजा प्रसिद्ध व दानशूर होता. त्याचा दरारा व नावलौकिक तिन्ही लोकात होता. बळिराजा दैत्यकुळातील असूनसुद्धा नीतीने राज्य करीत होता. भगवान विष्णू वामनाचे रूप घेवून बळिराजाकडे दान मागण्यास आला. त्यांनी बळिराजाजवळ तीन पाऊले जमीन दान म्हणून मागितली. बळिराजाने दानाचा संकल्प सोडण्यासाठी हातात झारी घेतली. बळिराजाचा गुरु शुक्राचार्य यांनी भगवान विष्णूचे कपट ओळखले. त्यांनी बळिराजास दान देण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु बळिराजा आपल्या निश्चयापासून ढळला नाही. आपण बळिराजाला दानाचा संकल्प सोडण्यापासून परावृत्त करू शकत नाही व पुढील घडणारी अनर्थ घटना घडू नये म्हणून तसेच आपल्या आवडत्या शिष्याच्या कल्याणासाठी गुरू शुक्राचार्य यांनी योग्य सामर्थ्याने सुक्ष्म रूप धारण करून झारीच्या तोंडावर बसून राहिले. त्यामुळे झारीतून पाणी पडण्याचे बंद झाले. झारीतून पाणी पडण्याचे बंद झाल्याचे पाहून बळिराजाने हातात बाण घेतला व झारीच्या तोंडात घातला. बाणाच्या टोकामुळे शुक्राचार्यांचा एक डोळा फुटला व ते कायमचे एका डोळ्याने आंधळे झाले. बळिराजाने दानाचा संकल्प सोडला. वामनरूपी विष्णूने एक पावलाने पृथ्वी व दुसऱ्या पावलाने ब्रह्मांड ग्रासले. वामनाने बळिराजास तिसरा पाय कोठे ठेवू असे विचारताच त्यानी आपले मस्तक पुढे केले. वामनाने बळिराजाच्या डोक्यावर पाय देवून त्याला पाताळात लोटले. बळिला पाताळाचे राज्य देवून त्याच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी भगवंत बळिराजाचा द्वारपाल बनला.

बळिराजाची निष्ठा व उदारपण पाहून वामनरूपी विष्णू प्रसन्न झाले व वर मागण्यास सांगितला. त्यावेळेस बळिराजाने तीन दिवस अहोरात्र पृथ्वीवर माझे राज्य असावे असा वर मागितला. शिवाय या दिवसात जे लोक आपल्या घरी दिवे लावतील, त्यांच्या घरी नेहमी लक्ष्मी वास करो असाही वरदान मागून घेतले. वामनरूपी विष्णू तथास्तू म्हणून निघून गेले.

## लक्ष्मीपूजन

आश्विन वद्य अमावस्येस लक्ष्मीपूजन केले जाते. त्यासंबंधी कथा खालीलप्रमाणे :

बळिराजाने आपल्या पराक्रमाने सर्व देवास कैदेत ठेवले होते. बळिराजाच्या कैदेतुन सर्व देवांची तसेच लक्ष्मीची सुटका करण्यासाठी विष्णू भगवंताने वामनरूपी अवतार घेऊन बळिराजापासून तीन पाऊले दान म्हणून मागीतली. बळिराजा राक्षस कुलातील असूनही दानशूर होता. त्याने तात्काळ तीन पाऊले दानाचा संकल्प सोडला. वामनरूपी विष्णुच्या एका पावलाने संपूर्ण पृथ्वी ग्रासली, दुसऱ्या पावलाने संपूर्ण ब्रह्मांड ग्रासले व तिसरा पाय आपल्या स्वतःच्या डोक्यावर ठेवण्यास सांगितले. मस्तकावर तिसरा पाय ठेवताच बळिराजा पाताळात गेला. नंतर वामनरूपी विष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांची सुटका बळिराजाच्या कैदेतून केली. तो दिवस म्हणजे अश्विन वद्य अमावस्या ! लक्ष्मीची सुटका झाल्याचे पाहून सर्वांना अतिशय आनंद झाला. सर्वांनी भगवंताकडे वर मागितला. लक्ष्मीचा वास प्रत्येकाच्या घरी असावा. देव, यक्ष, किन्नर, गंधर्व व मानव यांनी जगाच्या कल्याणासाठी केलेली प्रार्थना ऐकून भगवान वामनरुपी विष्णू प्रसन्न झाले. त्यांनी तात्काळ वर दिला की, आजच्या दिवसी जो लक्ष्मीची पूजा करील, त्याच्या घरी

लक्ष्मीचा कगायम वास राहिल. त्यावेळेपासून लक्ष्मीपूजनास सुरुवात झाली. विशेषतः व्यापारी वर्ग मोठ्या थाटात लक्ष्मीपूजन करतात. लक्ष्मीपूजन झाल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी मोठ्या प्रमाणात केली जाते.

लक्ष+मी = लक्ष्मी - मी म्हणजे अहंकर. अहंकार म्हणजे गर्व। म्हणून संतश्रेष्ठ नामदेव महाराज भगवंताजवळ मागणे मागतात. अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझीया विष्णू दासा भाविकांसी ॥ कारण अहंकार सर्वात वाईट. तसेच मानव प्राण्याचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे अहंकार होय. या अहंकारामुळेच अतिरथी-महारथी-मी, मी म्हणणाऱ्यांचा नाश झाला आहे, होत आहे, पुढेही होईल. बहुतांशी मानवाला वाटत असते, मी हे केले, मी ते केले, मी असा आहे, मी तसा आहे. माझ्यामुळेच सर्व प्रकारचे काम होते. वगैरे वगैरे... परंतु आपले लक्ष भगवंताच्या ठिकाणी केंद्रित केले पाहिजे. भगवंताच्या नामाचा छंद लागला पाहिजे. जर भगवंताची कृपा झाली तर मानवाला कुठल्याही प्रकारची न्यूनता पडत नाही कारण लक्ष्मी ही विष्णू भगवंताची अर्धांगिणी असून भगवंताच्या पायाची दासी आहे. जेथे भगवंत तेथे लक्ष्मीला रहावेच लागते. मी पणाचा अहंकार सोडून देणे व भगवंताच्या नामावर लक्ष केंद्रीत करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने लक्ष्मीपूजन करणे होय.

## बलिप्रतिपदा/पाडवा

हिंदू शास्त्राप्रमाणे साडेतीन मुहूर्त मानले गेले आहेत. गुढीपाडवा, अक्षयतृतीया, विजयादशमी, हे तीन मुहुर्त मानले गेले आहेत. बलिप्रतिपदा हा अर्धा मुहुर्त मानला गेला आहे. त्यासंबंधी कथा खालील प्रमाणे-

विष्णू भगवंताने वामन अवतार घेऊन बलिराजास पाताळात घातले. त्यावेळी बलिराजाच्या विनंतीवरून त्याला वामनरुपी विष्णू भगवंताने वर दिला की, ''कार्तिक शुद्ध प्रतिपदेच्या'' दिवशी तुझ्या नावाने लोक आनंदी आनंद साजरा करतील. अनेक शुभ कामांची सुरुवात करतील. त्या दिवशी करतील, व त्या दिवसाला 'बलिप्रतिपदा''असे संबोधतील. हा दिवश शुभ म्हणून गणाल जाईल.

या दिवशी लोक नवीन घरांचे मुहुर्त करतात. नवीन दुकाने व इतर नवीन व्यवसाय यांचा मुहुर्त करतात. बलिप्रतिपदा हा दिवस सर्वच ठिकाणी निरनिराळ्या प्रकारांनी साजरा करण्यात येतो. या दिवशी विक्रम संवत सुरु होत असल्यामुळे व्यापारी लोक नवीन वर्षारंभ समजतात व आपल्या हिशेबाचा आढावा काढतात. तसेच नवीन किर्द व खतावणी सुरू करतात.

बलिराजा दैत्यकुळीचा असून तो नीतीने राज्य करीत होता. त्याच्या राज्यात लोक सुखी होते. तो एक आदर्श राजा होता. म्हणून आजही लोक म्हणतात, **इडा पिडा टळो व बळीचे राज्य येवो.**

## भाऊबीज/यमद्वितीया

कार्तिक शुद्ध द्वितीयेला **भाऊबीज** किंवा **यमद्वितीया** असे म्हणतात. भाऊबीज हा दीपावली सणाचा शेवटचा दिवस. या संबधी कथा खालील प्रमाणे-

यमराजाने आपली बहिण यमुना हिच्या घरी कार्तिक शुद्ध द्वितीयेच्या दिवशी जाऊन तिला वस्त्रे, दागिने दिले व त्या दिवशी तिच्या घरी भोजन केले. म्हणून या दिवसाला 'यमद्वितीया' असे म्हणतात. त्यावेळेपासून भाऊबीजेची प्रथा सूरू झाली.

भाऊबीजेच्या दिवशी भाऊ बहिणीच्या घरी जातो. बहिण भावाला ओवाळते. बहिण भावाच्या कपाळी कुंकूम टिळा लावते. भाऊ बहिणीला यथाशक्ती ओवाळणी घालतो. नंतर भाऊ बहिणीकडे भोजन करून आनंदाने बहिणीचा निरोप घेतो.

ज्योतिष शास्त्रात द्वितीयेच्या चंद्राला विशेष महत्त्व दिले जाते. शुद्ध द्वितीयेचा चंद्र पाहिल्यास 'आयुष्यवृद्धी' होते असे ज्योतिषशास्त्राचे मत आहे. शुद्ध द्वितीयेच्या चंद्राचे महात्म्य भगवान शंकराला माहित होते. हलाहल नावाच्या विषापासून शरीर थंड होण्यासाठी भगवान शंकरानी शुद्ध द्वितीयेचा चंद्र आपल्या मस्तकावर धारण केला होता. मुस्लिम धर्मात सुद्धा द्वितीयेचा चंद्र मानला जातो. त्यांच्यात शुद्ध द्वितीयेच्या चंद्राला 'दूज का चाँद' असे म्हणतात.

भाऊबीजेच्या दिवशी भाऊ बहिणीला भेटायला जात असतो. भाऊबीजेच्या दिवशी बहिणीचे डोळे रस्त्याकडे लागलेले असतात. भावाला बहिणीच्या भेटीची उत्कंठा लागलेली असते. हे जरी खरे असले तरी आजकाल भाऊ-बहिणीच्या प्रेमास सर्व ठिकाणी भरती येण्याऐवजी आहोटीच लागत चालली आहे. जर भावाकडे सुख-समृद्धी असली, तरच बहिणीचे प्रेम आपल्या भावावर असते. व बहिणीकडे सुख-समृद्धी असली, तर भाऊ आपल्या बहिणीवर प्रेम करतो. खरे आंतरिक निस्वार्थी हृदयातून प्रेम करणारे भाऊ-बहिणी क्वचित आढळतील. रक्षा बंधनाच्या दिवशी बहिणीने भावाला राखी बांधणे. भाऊबिजेच्या दिवशी बहिणीने भावाला ओवाळणे व भावाने बहिणीला ओवाळणी घालणे, हे प्रेमाचे एक प्रतिक झाले ! शुद्ध द्वितीयेच्या चंद्राप्रमाणे दिवसेंदिवस भाऊबहिणीचे आंतरिक प्रेम वृद्धिंगत होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने **'भाऊबीज'** साजरी करणे होय.

(१) शास्त्राप्रमाणे साजरी केली ती **''शास्त्रीय दिवाळी''** ! (२) शास्त्राप्रमाणे येणारी दिवाळी साजरी करण्यासाठी पैशांची आवश्यकता असते. जर जवळ पैसा नसेल तर हा सण साजराच करता येत नाही व त्यामुळे अर्थहीन मनुष्याला दीपावली सणाचा आनंदही लुटता येत नाही. म्हणून तिला

''भौतिक दिवाळी'' असेही म्हणतात. (३) ''आध्यात्मिक दिवाळी'' ही दीपावली साधु-संत साजरी करतात. परंतु संतांना अभिप्रेत असलेला दीपावलीचा सण कोणता ? हे आपणास पहावयाचे आहे.

**आनंदाची दिपावली घरी बोलवा वनमाळी।**
**घालतो मी रांगोळी। गोविंद गोविंद॥**

आपल्या घरी भगवंताचा वास झाला म्हणजे खऱ्या अर्थाने आनंदाचे वातावरण तयार होते. तो क्षण म्हणजेच दीपावली सणासारखा महान सण होय. परंतु भगवंत कोणाच्या रुपाने वास करील याचा भरवसा नाही. कारण साधुसंत घरी येतील तोच खरा दसरा-दिवाळीचा सण.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात :

**साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा॥**

संतश्रेष्ठ सेना महाराज आपल्या एका अभंगात म्हणतात. साधुसंत घरी आल्यावर व त्यांचे चरण पाहिल्यावर शीण रहात नाही. सर्व प्रकारच्या दु:खाची निवृत्ती होते, व तो दिवस दीपावली सणासारखा आनंदाचा दिवस असतो.

**अवघा निसरसला शीण। संतचरण देखता॥**
**आजी दिवाळी दसरा। सेना म्हणे आले घरा॥**
**दसरा दिवाळी तोचि आम्हा सण।**
**सखे संतजन भेटतील॥**

साधुसंत म्हणजे चालते बोलते भगवंताचे प्रचारकच (देवदूतच) आहेत. संतांमुळेच देवाची पूजाअर्चा होते. देवाची उपासना करण्याची साधने संतांनीच मानवाला दिली आहेत. संतांमुळेच निराकार भगवंत सगुण रुपात आला. संतांनीच देवालाअस्तित्व प्राप्त करून दिले. एरव्ही देवाला कोणी विचारले नसते. संतांचा अधिकार इतका मोठा आहे की, भगवंताला सुद्धा संतांपुढे तिष्ठत उभे रहावे लागते. भगवंताला संतांच्या शब्दाबाहेर जाता येत नाही. म्हणून भगवंताच्या प्राप्तीसाठी संतांचे चरण धरले पाहिजे.

**हरि प्राप्तीसी उपाय। धरावे संताचे पाय॥**

संतांना शरण गेल्यास व त्यांनी दाखविलेल्या मार्गाने मार्गक्रमण केल्यास नित्य-आनंद प्राप्त होतो व हृदयात चैतन्याचा अखंड नंदादीप तेवू लागतो.

दीपाचे महात्म्य खूप मोठे आहे. दुसऱ्याला प्रकाश देण्यासाठी दीपाची आवश्यकता आहे. दीपासंबंधी व योगासंबंधी माऊली ज्ञानेश्वरीत म्हणतात :

**दीपाचेनि प्रकाशे। गृहींचे व्यापार जैसे॥**
**देही कर्मजात तैसे। योगयुक्ता॥**

घरामध्ये दिवा लावलेला असतो. त्या दिव्याच्या प्रकाशात घरातले व्यवहार सुरू असतात. कोणी स्वयंपाक करतो, कोणी जेवतो, कोणी लिहितो, कोणी वाचतो. अशाप्रकारचे अनेक व्यवहार दिव्याच्या प्रकाशात होत असतात. दिवा अलिप्त असतो, शांत असतो, साक्षीभूत असतो. किंबहुना आपण साक्षीभूत आहोत याचेही भान त्याला नसते. योगी पुरुषांचे, ज्ञानी पुरुषांचे व्यवहार असेच चालू असतात.

ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीत म्हणतात :

**मी अविवेकाची काजळी।**
**फेडूनि विवेक दीप उजळी।**
**तै योगिया पाहे दिवाळी। निरंतर॥**

अशी साधकाची अवस्था होत होत **सदा सण साचा आम्हा नित्य दिवाळी।** अशा अवस्थेतून **विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिपावाली।** या अवस्थेपर्यंत साधक जात असतो व संतांनी दाखवून दिलेल्या मार्गानी व स्वत: घेतलेल्या अनुभवानी आनंदाची दिपावली अखंडपणे साजरी करीत असतो.

या विश्वातील प्रत्येक मानवाला अखंडपणे दिपावली साजरी करता यावी. साधुसंतांच्या म्हणण्यानुसार **एकमेका साह्य करूं। अवघे धरू सुपंथ॥** अशा प्रकारची प्रत्येकाची धारणा व्हावी. प्रत्येकाच्या हृदयात सद्‌बुद्धीचा, सद्‌विचारांचा, सत्कर्माचा व परोपकाराचा अखंड ज्ञानदीप लागावा हीच दिपावलीच्या सणानिमित्त ईश्वरचरणी प्रार्थना.

## भाग्योदय

तुझ्या दर्शनाने झाला भाग्योदय साई
तुझे सांग कैसे व्हावे कुणी उतराई॥धृ॥
जरि केले तुझियासाठी कातड्यांचे जोडे
तरि नाही सुटायाचे ऋणाचे या कोडे
मनिमानसी तुझ्याविण दुजा कुणी नाही॥१॥
प्रकाशुनि चंद्र सूर्य नभी दिनरजनी
फुलवुनिया चैतन्या विश्वाच्या जीवनी
भावभक्तिचे तव रूप फुलवा भक्तीसाई॥२॥
भावबोल वेचुन गुंफिन कनक गीतमाळ
वाकवीन तुशिया चरणी लीन हे कपाळ
करिन पाच प्राणांची मी सुरेल सनई॥३॥

■ गंगाधर महाम्बरे

# श्री साई : अवतार आणि कार्य

विद्याधर ताठे
कार्यकारी संपादक, 'श्री साईलीला'



**श्री साईबाबा हा ईश्वराचाच युगानुकुल नवा अवतार असून विज्ञानाने एक होत असलेल्या नव्या जगाला, नव्या मानव धर्माची शिकवण देण्याचे महान कार्य त्यांनी केलेले आहे. साईबाबांच्या भक्तीने प्रांत-भाषा-जात-वर्ण-पंथ संप्रदाय एवढेच नव्हे तर देशाच्या सीमा पार करून अवघ्या मानवजातीला भारावून टाकलेले आहे. देशविदेशातील साईमंदिरातून समाजसेवेच अनेक उपक्रम पार पाडले जात आहे. एवढ्या मोठ्या संख्येने भक्तांना सेवासन्मुख करणारी अलिकडच्या काळातील श्रीसाई ही एकमेव विभूती आहे.**

महाराष्ट्रला साधुसंतांची वैभवशाली परंपरा लाभली आहे. संत ज्ञानोबा ते संत तुकोबाच नव्हे तर थेट आधुनिक संत विनोबा भावे यांच्या पर्यंतची ही परंपरा असंख्य संतांनी समृद्ध आहे. 'ज्ञानोबा-विनोबा' हा मध्यमपदलोपी समास असून त्यामध्ये या महाभूमीत होऊन गेलेल्या सर्व जाती-जमातींच्या - सर्व पंथांच्या सर्व मतांच्या साधुसंतांचा समावेश आहे. वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची सत्वधारा मानली जात असली तरी या भूमीमध्ये नांथ संप्रदायी, समर्थ संप्रदायी, दत्त संप्रदायी, महानुभव संप्रदायी आदी अनेक संत सुखेनेव नांदले आहेत. त्यांच्या कार्याने ही भूमी सस्यशामल झालेली आहे. या भूमीने संत ज्ञानदेव-तुकारामा एवढेच संत गजानन महाराज (शेगांव), **श्री साईबाबा (शिर्डी)** व श्री अक्कलकोट स्वामी यांनाही वंदनीय मानलेले आहे. या प्रत्येक संतांचे आपले स्वत:चे असे वैशिष्ट्य आहे पण ते केवळ वरवरचे - बहिरंग म्हणता येईल. अंतरंगदृष्ट्या ही सारी संत मंडळी एकच आहेत असे अभ्यासांती - अनुभवांती आढळते. काळ - परिस्थिती व प्रदेश सापेक्ष त्यांच्यामध्ये भेद-भिन्नता स्पष्ट आहे. पण त्या सर्वांचे ध्येय - मानवजातीचे कल्याण हेच आहे.

**साधु दिसती वेगळाले ।**
**परि अंतरी मिळालेले ॥**

हे समर्थ वचन सर्व साधुसंतांचे सम्यक - यथार्थ - साक्षेपी असे दर्शन आहे असे मला वाटते.

### श्री साईबाबांचे वेगळेपण

शिर्डीचे साईबाबा या संतमालिकेतीलच एक मानले जात असले तरी त्यांची जीवनपद्धती - त्यांचे कार्य - त्यांची उपदेश पद्धती अत्यंत वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे. खर तर त्यांचे एकूण अद्‌भूत जीवन आणि अतर्क्य लिला पाहता त्यांना साधुसंत म्हणण्यापेक्षा ते ईश्वरी अवतारच आहेत अशी सर्व साईभक्तांची ठाम श्रद्धा आहे. काही साईभक्त त्यांना दत्तावतार मानतात तर काही भक्त त्यांना श्रीकृष्णाचा अवतार मानतात. उदाहरणार्थ ही आरतीतील भजने पहा -

**ऐसा येई बा । साई दिगंबरा ।**
**अक्षयरूप अवतारा । सवही व्यापक तूं ।**

**श्रुतिसारा । अनुसया त्रिकुमारा ॥ध्रु॥**

**तुझ्या ज्या पदा पाहता गोपबाली ।**
**सदा रंगली चित्स्वरूपी मिळाली ।**
**करी रासक्रीडा सवें कृष्णनाथा ।**
**नमस्कार साष्टांग श्रीसाईनाथा ॥**

खुद्द साईबाबा मात्र स्वत:स 'अनल हक्क' (इश्वरी अवतार) न समजता, 'यादे हक्क' खुदाका 'बंदा' समजत होते.

श्री साईबाबांचे खरे नांव काय होते ? त्याचे मूळ गांव कोणते ? त्यांचे आई-वडिल कोण ? ते हिंदू होते की मुसलमान होते. हे सारे प्रश्न अनुत्तरीत असून त्याविषयी कोणतीही अधिकृत व साधार माहिती उपलब्ध नाही. बाबांनी आपल्या जवळच्या कोणत्याही भक्तास याबद्दल काहीही सांगितलेले नाही. त्यांची भाषा व पाथर्डी भागातील त्यांचा होणारा विशेष संवाद यावरून बाबा पाथर्डी भागातील असावेत, मोगलाईतील असावेत असा अंदाज केला जातो. श्री साईबाबांची एका न्यायालयापुढे साक्ष झाली तेव्हा त्यांनी 'मला लोक साईबाबा म्हणतात' असे सांगितले होते. खर तर ते एका वऱ्हाडाबरोबर प्रथम शिर्डीस आले तेव्हा खंडोबा मंदिराचे पुजारी म्हाळसापती यांनी 'आवो साई' असे म्हणून त्यांचे स्वागत केले होते व पुढे हेच नांव सर्वत्र झाले. आपले मुळगाव बाबांनी पुढे कोणालाच सांगितले नाही. नदीचे मूळ व ऋषीचे कूळ शोधू नये असे म्हणतात हेच खरे.

श्री साईबाबांचे इतर संताहून वेगळेपण म्हणजे ज्ञानेश्वर-तुकारामांसारखे त्यांनी ना ओवी लेखन केले आहे, ना अभंग रचना केली आहे. ना त्यांनी प्रवचने केली, ना कीर्तनाद्वारे प्रबोधन केले. एवढेच नव्हे तर ते फारसे शिर्डी सोडून कोठेही गेले नाहीत आणि असे असूनही श्री साईबाबांच्या भक्तीचा सुगंध केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर अवघ्या भारतवर्षात दरवळत आहे. विविध विदेशातून मोठ्या संखेने साईभक्त शिर्डीस येत आहेत व साईबाबांच्या मंदिरांनी अनेक देशात साईभक्तीची गंगा प्रवाहीत केलेली आहे. नेपाळ, अमेरिका, इंग्लंड या देशांमध्ये साईबाबांची भव्यदिव्य मंदिरे उभी करण्यात आली असून त्याद्वारे अनेक प्रकारचे सामाजिक सेवेचे प्रकल्प राबविले जात आहेत. श्री साईबाबांच्या भक्तीने प्रेरीत झालेल्या या सेवा प्रकल्पाने केलेले सामाजिक योगदान लक्षात घेता श्री साईबाबांच्या प्रेरणेचे विलक्षण अद्‌भुतपण आपणांस थक्क करते. क्वचितच अन्य कोण्या साधुसंतांचे व अवतारी पुरूषाच्या भक्ती प्रेरणेने असे देशविदेशातील लोकमानस सेवा सन्मुख झाले असेल.

## साईलीला हाच साई उपदेश

श्री साईबाबांचा जसा उपदेशग्रंथ नाही तसे त्यांचे जीवन चरित्रही उपलब्ध नाही. बाबांच्या अद्‌भूत लिला हेच त्यांचे जीवन; या लिला हाच त्यांचा जीवनसंदेश व उपदेश होय. साईभक्त श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांनी बाबांच्या समग्र लिलांवर 'श्री साई सच्चरित' नावाचा ५३ अध्यायांचा ओवीबद्ध ग्रंथ लिहीला असून श्रीसाई भक्तांचे दृष्टीने हा ग्रंथ म्हणजे साईभक्तांची - गीता कुराण आहे.

श्री अण्णासाहेब दाभोळकर यांना साईबाबांनी 'हेमाडपंत' असे टोपणनाव दिले होते. हे हेमाडपंत साईबाबांच्या उपदेशपद्धती बद्दल आपल्या 'श्रीसाईसच्चरित' ग्रंथात म्हणतात-

**असे पुढे साईनाथ । विचारल्याचेचि उत्तर देत ।**
**स्वये आपण कोणासमवेत । कधीही बोलत नसत ॥**

स्वत: ते कोणाशीही बोलत नसत; आणि जे बोलत असत ते अगदी मोजके - नेमके. लांबलचक व्याख्यान तर ते कधीच देत नसत. उद्‌बोधक - मनोरंजक कथा सांगून ते भक्तांना अप्रत्यक्ष उपदेश करीत. बऱ्याच वेळा त्यांचे बोलणे फक्त संबोधित माणसासच समजत असे बाकीच्यांना ते असंबद्ध व अनाकलनीय वाटत असे. बाबांच्या एकूण उपदेशाचा सारांश थोडक्यात असा असे **(१) कोणाचीही निंदा करू नये (२) वादावादी टाळावी (३) कोणाचाही द्वेष-मत्सर करू नये (४) सत्य बोलावे तसेच बोलल्याप्रमाणे वागावे (५) कमी बोलावे तसेच गोड बोलावे. वायफळ बडबडीत वेळ घालवू नये त्याऐवजी नामस्मरण करावे. स्वत: साईबाबा 'अल्ला-मालिक' म्हणून अखंड नामस्मरण करीत होते.** त्याविषयी हेमाडपंत म्हणतात -

**नामस्मरणी मोठी प्रीती । अल्ला मालिक अखंड करती ।**
**नामसप्ताह करवूनि घेती । दिवस राती सन्मुख ॥**

(अध्याय ४ ओवी ८२)

(६) श्रवण, किर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन या नवविध भक्ती पैकी नामस्मरणावर साईबाबांचा विशेष भर होता. महाराष्ट्रातील वारकरी पंथातील ज्ञानेश्वर, तुकाराम यांनीही नामभक्तीचाच प्रचार केला व त्यांच्या पंथास 'नामधारकांचा पंथ' म्हणूनच ओळखले जाते हे लक्षात घेता बाबांनी नामस्मरण भक्तीचा पुरस्कार करून महाराष्ट्राची सत्वधारा अधिक समृद्ध केली असे दिसते. नवस-सायास, शूद्र देवता पूजन, बळीबकरे आदी

कुप्रथांचे ज्ञानदेव, तुकारामादी संतांनी उच्चाटन केले. श्री साईबाबांनीही डोळस भक्तीलाच प्रोत्साहन दिले. भक्तांच्या मनातील भोळसट अंधश्रद्धाचे उच्चाटन करून त्यांनी 'सबका मालिक एक' म्हणत भक्तीला विश्वव्यापकतेची दृष्टी दिली.

### बाबांचा सर्वधर्मसमभाव

श्री साईबाबा हे स्वभावत:च सर्वधर्मसमभावी होते. कदाचित 'सर्वधर्मसमभाव' या कालसापेक्ष धर्मप्रचारार्थच त्यांचा अवतार झाला असावा असे वाटते. त्यांनी मशिदीला 'द्वारकामाई' असे नांव दिले ही गोष्ट त्यांच्या सर्वधर्मसमभावपणाची; त्यांना अपेक्षित परस्पर बंधूभाव, सामाजिक सद्भाव यांची ढळढळीत साक्ष आहे. त्यांना ना हिंदू धर्माचा प्रचार करायचा होता; ना इस्लाम धर्माचा प्रसार करायचा होता. त्यांना दोन्ही धर्मातील उत्तम तत्वांचा समन्वय साधून कालसापेक्ष मानव धर्माचा - विश्वबंधुत्वाचा पुरस्कार करायचा होता. त्यांनी ज्या उत्साहाने भक्तांना रामनवमी उत्सव करण्यास संमती दिली, त्याचप्रमाणे रामनवमीच्या रात्री मुसलमान पद्धतीने संदल काढण्यास परवानगी दिली. मशिदीत त्यांनी अखंड धूनी पेटवून अग्निहोत्र अंगिकारले. शिर्डीतील शनी, मारुती मंदिरांचा जिर्णोद्धार केला. पण हे सारे करताना त्यांनी समाजात तणाव-तंटा निर्माण होऊ दिला नाही. त्यांनी भक्तांमध्ये हिंदू, मुसलमान, पारशी असा किंवा ब्राम्हण-मराठा-शुद्र असा भेद केला नाही. सर्वधर्माच्या-सर्वपंथांच्या सर्व जातीच्या उच्चनीच सर्वांनाच साईदरबार सारखाच मुक्त होता व आहे. जात-धर्म-पंथ-वर्ण व श्रीमंत-गरीब हे निकष बाबांनी कधीच कोणला लावले नाहीत. श्रीसाईबाबांची ही समान दृष्टी हेच त्यांच्या मानव धर्माचे अधिष्ठान आहे. उच्च-नीच, जाती-वर्ण या भेदांना ज्ञानेश्वरतुकारामादी संतांनी आपल्या कार्याने मूठमाती देऊन सामाजिक क्रांतीच्या दिशेने पहिले पाऊल टाकले होते. श्रीसाईबाबांनी त्या कार्यावर सर्वधर्मसमभावाचा कळस चढविला. अनेक पुरोगामी विचारांना चळवळींना जन्म देणाऱ्या महाराष्ट्रात श्रीसाईबाबांनी २० व्या शतकात नव्या युगाला समर्पक अशा मानवधर्माचे प्रतिपादन व पुरस्कार करावा हा केवळ योगायोग नसून संतप्रणित महाराष्ट्र धमाचेच ते एक कालसापेक्ष विश्वव्यापक दर्शन आहे.

**शिरडीची साईची समाधी ।**
**तिची अखिल संतांची मांदी ॥**

(श्रीसाईसचरित अ.४ ओवी ६८)

---

# साई कसोटीच पाही

(अभंग)

वादळात आघातांनी चित्त ढळणार नाही
शुद्ध चित्त होण्यासाठी साई कसोटीच पाही ॥धृ॥

साई ओळखला आम्ही सारा तुझा माया खेळ
खेळतांना उमजले नाही त्यांस ताळमेळ
ऐन सुखाच्याच वेळी दु:ख दारी उभे राही ॥१॥

सुखामध्ये वाटेकरी दु:खामध्ये पाठमोरे
साई रंगविले तुच संसाराचे चित्र न्यारे
चित्र माझे फाटलेले आणि दु:ख मागे राही ॥२॥

साई आम्ही तुझे भक्त सत्कर्माचा आम्हां छंद
त्यात साठविला सारा तुझ्या भक्तीचा आनंद
जन्मोजन्मी लुटणार साई, हरणार नाही ॥३॥

■ **योगेश्वर अभ्यंकर**

# बाबांची आरती

ओवाळू आरती साईनाथांला, साईनाथाला
भक्ती संकटी पडता झेली वरचेवर त्याला ॥धृ॥

हृदयामाजी शिवलिंग साईबाबांच्या, साईबाबांच्या
वेष साधा, लीला महान आसती त्यांच्या ॥१॥

निंबाच्या त्या तरूतळीं गुरूचे स्थान, गुरूचे स्थान
द्वारकामाई, चावडी मध्यें देताती दान ॥२॥

उदीचा ह्या महिमा भारी, साईनाथांच्या
रोगराई पळुनी जाई, सानिद्धे त्यांच्या ॥३॥

श्रद्धा आणि सबुरी असती नाणी बाबांची, नाणी
बाबांची ज्यांच्या ठाई असती त्यांना उद्धरी साई ॥४॥

बाबा, बाबा जपता तारी साई भक्तांना, साई
भक्तांना
द्रष्टाताने ओढुनी आणी साई शिरडीला ॥५॥

जैसा भाव तैसा पावे साई भक्ताशी, साई भक्ताशी
भालचंद्र नतमस्तक झाला चरणाशी ॥६॥

■ **भालचंद्र चित्रे**

# शांति-क्षेत्र-शिरडी

शाम जुवळे

प्रगाढ शांतीचे अर्थात् प्रशान्तीचे वसतिस्थान दयाशील हृदय हे आहे. शुद्ध आणि पवित्र मन हे या पवित्र स्थळी प्रवेश मिळविण्यासाठी लागणारे प्रमाणपत्र होय. या पवित्र क्षेत्राचे क्षेत्रज्ञ म्हणजे **श्री साईबाबा** होत. मानवता धर्माचा आचार धारण करून बाबा सत्यविषयक प्रचाराचा सदुपदेश नित्य करीत राहिलेले आहेत. बाबा हे शाश्वत सत्य-नित्य अस्तित्वाचे अवतारी महापुरुष होत. प्रेमाचे स्वरूप धारण केलेले बाबा प्रशान्तीच्या स्वभावाचे भोक्ते आहेत; हे साईबाबांचे खास वैशिष्ट होय.

प्रशान्तीचे क्षेत्र हृदयाच्या अगदी खोलवर वसत असल्यामुळे येथे प्रवेश मिळालेल्या सद्‌भागी भक्तास साईबाबांचे अमृतबोल ऐकू येत असतात. भाग्यवान भक्तास परमार्थाची शिकवण बाबा येथे उपलब्ध करून देत असतात; भक्त परमार्थी बनला जातो आणि त्याचे जीवन सार्थकी लागत असते.

भाग्यवान भक्ताचे जीवन म्हणजे विशुद्ध जाणिवेची पवित्र प्रक्रिया होय. मनातील प्रेमयुक्त विचार म्हणजे 'सत्य' होय; प्रेमपूर्ण जाणीव म्हणजे 'प्रशान्ति' होय; सप्रेम कर्म म्हणजे धर्म होय आणि प्रेमळ आत्मियता म्हणजे अहिंसा होय. हे सद्‌गुण धारण करणारा नर म्हणजे प्रत्यक्ष नारायण होय.

प्रापंचिकाला प्रपंच करीत असता भक्तिमार्गावर वाटचाल करणे सर्वसाधारणपणे कठीण होत असते. दैनंदिन जीवन जगत असता असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागते. यामुळे प्रापंचिकाचा जीव मेटाकुटीस येत असतो. जीवन डोईजड होत असते. नैराश्यामुळे आशेचा किरण दिसेनासा होत असतो. अशा अत्यंत बिकट समयी सर्वसाधारण माणसास कोणीतरी मदतगार हवा असतो. जगात लाभाविना प्रेम करणारा मदतगार मिळणे आजकाल दुरापास्त झाले आहे. अशावेळी सांप्रत एकच आशेचा झगझगीत किरण दृष्टिस पडत असतो आणि तोच प्रकाशमय किरण म्हणजे **साईबाबा** होत.

कलियुग म्हणजे कलहयुग भासत आहे. जेथे पहावे तेथे भांडणतंटा, संघर्ष, जीवघेणी स्पर्धा वगैरेंसारख्या अयोग्य गोष्टी दृष्टिस पडत आहेत. मानवी जीवनाची मूल्यें माणूस गमावून बसलेला दिसत आहे. भवसागरात नैराश्याची भलीमोठी लाट उसळून वर आलेली दिसत आहे. मरण येत नाही म्हणून माणूस कसाबसा जीवन जगत आहे. आजच्या काळी जगात अभूतपूर्व गोंधळ माजलेला सर्वत्र दिसून येत आहे. मानवी जीवनाची ही शोकांतिका आहे. म्हणून आज माणसाला आत्यंतिक गरज आहे ती साईबाबांसारख्या महापुरुषाचीच होय.

मन:शांती गमावून बसलेल्या मानवास दिलासा देणारे प्रखर **शांति-क्षेत्र म्हणजे पवित्र शिरडी-स्थान होय.** येथे भेट देणाऱ्या व्यक्तीस जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारा दिलासा हमखास मिळतोच मिळतो. याच कारणास्तव साईबाबांचे शाश्वत अस्तित्व येथे वास करून राहिलेले आहे. साईबाबांच्या चैतन्य-ऊर्जेचा उच्चांक शिरडी येथील या शांतिक्षेत्राने गाठलेलाआज दिसून येत आहे. लाखों लोकांना या ऊर्जेमुळे नवजीवन प्राप्त झालेले आहे आणि अजुनही ते होत राहिले आहे. जगातील सर्वात थोर असाच हा चमत्कार होय.

# कृपा तुझी साईनाथा

(अभंग)

कृपा तुझी साईनाथा लाभावी संसारी
भाग्य उजळावे माझे बोले एकतारी ॥धृ॥

एकतारी रंगलेली साई भजनात
साईचाही पूजनात आणि
साई गायनात अभंगाचे
माझे गाणे साई, तापहारी ॥१॥

सूर लागलेला साई जन्मोजन्मी देवा
अमृताचा स्पर्श तुझा आनंदाचा ठेवा
त्याच्यासाठी स्वीकारली
साई रे फकिरी ॥२॥

साई नाम आवडीने गाता
होते धुंद जन्मोजन्मी जडलेला
भजनाचा छंद दर्शनाचे
वेड तुझे साई मी पुजारी ॥३॥

■ **योगेश्वर अभ्यंकर**

बोध कथा

# योगेक्षम वहाम्याहम्

ह. ल. रानडे
शनिवार पेठ, सातारा.

डोणगावच्या नारायणरावांच्या मुलाच्या जीवनात सुमारे पन्नास वर्षांपूवी घडलेली ही गोष्ट. नारायणराव भिक्षुकी करून पोट भरणारे गृहस्थ. त्यामुळे परिस्थिती सामान्यच. मनुष्य देवभक्त त्यामुळे वागण्यात अगदी साधा, सरळ, निगर्वी, दिलदार नि सदाहस्तमुख. त्यामुळे ते सर्वांचे आवडते भटजी होते. लहान मुले पण त्यांच्या घरी जाऊन त्यांना न भिता त्यांच्याशी बोलत व हक्काने त्यांच्याजवळ खडीसाखर मागत. नारायणराव पण त्यांना ती दिल्याशिवाय रहात नसत. आलेल्या माणसाचे नारायणराव अगदी प्रसन्न चित्ताने स्वागत करीत व त्यांच्या धार्मिक कामाची आस्थेवाईकपणे चौकशी करीत. गीता हा तर त्यांच्या अंत्यंत आवडीचा ग्रंथ. तो तर त्यांनी मुखोद्गत केला होताच पण त्याप्रमाणे ते जीवन पण जगत होते. त्यांच्याकडे येणाऱ्या माणसाला ते गीतेची महती आवर्जून सांगत व ती शिकण्याचा आग्रह पण करत.

एखाद्याचे धार्मिक काम नारायणरावांनी पत्करले का ते त्या घरी अगदी वेळेवर जात व यजमानाचे समाधान होईल अशा तऱ्हेनेच ते धार्मिक कार्य पार पाडत. घाईघाईने धार्मिक कार्य उरकणे त्यांना मुळीच मान्य नव्हते. शिवाय त्या कार्याबद्दल मिळावयाच्या संभावनेबाबत (दक्षिणा) पण ते अगदी उदासीन असत. कार्याबद्दल दक्षिणा काय द्यावयाची म्हणून त्यांना विचारल्यास ते म्हणत ते तुम्ही ठरवा. मी फक्त तुम्हाला त्या कार्यासाठी लागणाऱ्या सामानाची यादी देइन. तुम्हाला जी काय दक्षिणा म्हणून द्यावयाची असेल ती तुम्ही द्या. मी ती अगदी आनंदाने स्वीकारीन. याबाबत ते म्हणत 'संभावनेबाबत सौदा केलेला मला आवडत नाही. कारण धर्मकार्यामध्ये माणसे समजून उमजून दक्षिणा देतात. कोणी अगदी तसे काही कमी देत नाही. शिवाय कमी किंवा जास्त हे आपल्या मानण्यावरच नाही. का ?'' अशातऱ्हेची नारायणरावांची सदा तृप्त व समाधानी वृत्ति असल्यामुळे लोकही त्यांना अपेक्षेपेक्षा जास्तच दक्षिणा देत. त्यांची पत्नी पण पत्नीचे मनोगत ओळखून वागणारी, 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' या वृत्तीची असल्यामुळे नारायणरावांचा संसार म्हणजे डोणगावला एक आदर्श संसार मानला जाई.

'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या उक्तीप्रमाणे त्यांचा एकुलता एक मुलगा विष्णू हा पण चांगला निघाला. दिसायला तरतरीत, प्रकृतीने सुदृढ, शिवाय स्वभावाने पण अत्यंत सालस व समजूतदार. त्यालाही नारायणावांनी लहानपणापासून गीतेचे पाठ देण्यास सुरुवात केली होतीच. मधूनमधून ते त्यातील सोप्या सोप्या श्लोकांचा अर्थ पण त्याला समजावून सांगत व गीता चांगले वागायला कसे शिकविते हे स्पष्ट करीत. विष्णू पण मोठ्या आवडीने ऐकत असे. प्रथम प्रथम नारायणरावांना वाटते की विष्णूला फारसे न शिकवता भिक्षुकीधंद्यात पारंगत केले की बस्! पण पुढेपुढे त्यांच्या असे लक्षात आले की आता शिक्षणाच्या प्रसारामुळे लोकांची देवाधर्मावरील श्रद्धा बरीच आटत चालली आहे. त्यामुळे आपण विष्णूस शालेय शिक्षण न देता जर फक्त आपले व्यवसाय शिक्षण दिले तर त्याला पुढील आयुष्यात त्यावर चरितार्थ चालविणे अवघड जाईल म्हणून त्यांनी त्याचे शिक्षण गावातील शाळेच्या सातवीपर्यंतच न थांबवता त्याला शेजारच्या गावातील हायस्कूलमध्ये दाखल केले. फावल्या वेळात ते त्याला भिक्षुकी शिक्षणपण देत राहिले.

हायस्कूलमध्ये प्रथम प्रथम विष्णूला भटजी भटजी म्हणून शाळेतील इतर मुले चिडवू लागली. त्यामुळे एक दिवस विष्णू वडिलांना म्हणाला ''बाबा! मला मुले भटजीचा पोरगा, भटजीचा पोरगा म्हणून चिडवतात म्हणून मी उद्यापासून हायस्कूलमध्ये जाणार नाही.'' ते ऐकून नारायणरावांना धक्काच बसला. पण गडबडून न जाता ते मुलाला म्हणाले, ''अरे! तुला मुले का चिडवतात ते ठाऊक आहे ? तू चिडतोस म्हणून! तू चिडू नकोस बघू म्हणजे मग पहा ती तुला चिडवतात का ? आणि हे बघ विष्णू तुला मुले जे चिडवतात ते खोटे आहे कां ? तू माझ्याबरोबर भटजी येतोस की नाही! मग झालं तर! ती मुलं खरं आहे तेच बोलतात. अरे ते तुला चिडवणं नव्हे. शिवाय अशा अगदी क्षुल्लक कारणामुळे तू हायस्कूलमध्ये जाण्याचं जर बंद केलंस तर तुझं शिक्षण कसं काय पूर्ण होणार ? अरे! मोठेपणी तुला यापेक्षा कितीतरी मोठ्या प्रसंगांना सामोरे जावे लागणार आहे! मग तेव्हासुद्धा घाबरून भागुबाईसारखा घरीच बसणार का ? अरे! गीतेमध्ये श्रीकृष्णाने अर्जुनाला काय सांगितले ते तुला ठाऊक आहे ना! भित्रेपणा टाकून संकटांना धैर्याने सामोरा जा म्हणूनच ना! मग तू भिऊन शाळेत जाण्याचे कसं काय बंद करतोस ? तू जर शिकला नाहीस तर तुला नोकरी मिळणार नाही व तुझं नुसत्या भिक्षुकीवर भागणं शक्य नसल्याने तुला नोकरी करायला हवीच.''

विष्णू समंजस व बुद्धिवान असल्यामुळे त्याला वडिलांचे म्हणणे पटले व तो तक्रार न करता हायस्कूलमध्ये जाऊ लागला. न चिडण्याचा वडिलांचा मंत्र चांगलाच लागू पडला. तो चिडत

नाही असे पाहून विद्यार्थ्यांनी पण त्याला चिडवणे बंद केले. विष्णूची हायस्कूलमध्ये प्रगति पण चांगली होऊ लागली. तो मॅट्रीकपर्यंत सरळ प्रत्येक वर्षी चांगले मार्क मिळवून पास झाला.

विष्णूला कॉलेजचे शिक्षण देणे वडिलांना शक्य नसल्याने त्यांनी त्याच्यासाठी नोकरीची शोधाशोध सुरू केली. त्याने बांधकाम खात्यात कारकुनाच्या नोकरीसाठी अर्ज केला व त्याला चांगले मार्क असल्यामुळे त्यासाठीच्या परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली आणि ती परीक्षा पण तो चांगल्या तऱ्हेने पास झाल्यामुळे त्याला तेथे नोकरी पण मिळाली.

मुलाला नोकरी मिळाली म्हणून नारायणावांना खूप आनंद झाला. नोकरीस हजर होण्याच्या आदल्या दिवशी वडिलांनी त्याला केलेल्या उपदेशाची शिदोरी त्याला संबंध नोकरीत चांगलीच उपयोगी पडली. त्यामुळेच नोकरीच्या शेवटच्या टप्प्यात त्याच्यावर जरी गंडांतर आले तरी त्याने ते धैर्याने व निर्भयपणे सोसले. नारायणराव विष्णूला म्हणाले, ''विष्णू, तू उद्या नोकरीवर रुजू होणार. तुला ही जी नोकरी मिळाली आहे ती परमेश्वरी कृपाच आहे असे मी मानतो. तेव्हा दररोज नोकरीवर जाण्यापूर्वी तू भगवंताला नमस्कार करून माझ्या कामात तुम्ही मला मदत करा अशी त्याची प्रार्थना करूनच नोकरीवर जात जा तसेच तुला जे काम मिळेल ते तू आनंदाने स्वीकार. जे काम न कंटाळता अगदी मनापासून प्रामाणिकपणे व उत्साहाने कर म्हणजे ते तुला जड वाटणार नाही. आपल्या वाट्यास आलेले काम भगवंतानेच दिलेले आहे असे समजून व आपण ते कसे काय करतो हे भगवंत पहात आहे या कल्पनेने कर. म्हणजे त्यात चुका होणार नाहीत. काम जास्त पडले तरी त्रागा करू नकोस. तू तुझी कामाची भूक वाढव. कामामुळेच तुझी प्रगति होत राहील हे लक्षात ठेव. 'स्वे स्वे कर्मण्याभिरत: संसिद्धिं लभते नर: ।' हे गीतावचन ध्यानी बाळग. हळूहळू जास्त जबाबदारीची कामे पण अंगावर घे. त्यामुळे तुझा आत्मविश्वास वाढेल. जीवनांत या मनोबलाची अत्यंत जरूरी आहे. वरिष्ठांशी वागताना अगदी नम्रतेने वाग. त्याचबरोबर सहकाऱ्यांशी पण सलोख्याचे संबंध ठेव. कारण जीवनात माणसे जोडणे हे फार महत्त्वाचे आहे. शेवटची व अति महत्त्वाची गोष्ट म्हणजे गीतेच्या निष्काम कर्मयोगाचा संदेश (कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन) हृदयावर अगदी कोरून ठेव व कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नकोस. कारण हरामाचा पैसा मुळीच टिकत नाही. शिवाय लाचलुचपत भगवंताला मुळीच खपणारी नसल्यामुळे तो अशा माणसांच्या जवळपास पण रहात नाही. आणि तो जवळ नसला की जीवन संपलच म्हणून समज. लहानपणी शिकलेला 'कर्तव्यमेव कर्तव्यं प्राणै: कण्ठगतैरपि । अकर्तव्यं नैव कर्तव्यं प्राणै: कष्टगतैरपि ।' हा श्लोक सतत डोळ्यासमोर ठेव व त्याप्रमाणे तुझे काम करत जा.''

वडिलांनी योग्यवेळी केलेला हा उपदेश विष्णूने जीवाचे कान करून ऐकला व त्याने तो पूर्णपणे अंमलात आणण्याचे ठरविले. त्यामुळे त्याने थोड्याच दिवसात वरिष्ठांची मर्जी संपादन केली. सहकाऱ्यांना पण त्यांच्या कामात तो मदत करीत असल्यामुळे त्यांचाही तो आवडता बनला.

नोकरीमध्ये नुसतेच कारकून म्हणून न राहता खात्यातील बढतीची परीक्षा देण्याची विष्णूची जिद्द असल्यामुळे त्याने सात-आठ वर्षानंतर बढतीची परीक्षा पण दिली व त्यात तो चांगल्याप्रकारे उत्तीर्ण झाल्यामुळे त्याला हिशेब तपासनीसाची व बढतीची जागा पण मिळाली. ते पाहून त्याचे सहकारी पण आनंदित झाले व त्याच्या प्रामाणिक व मनापासूनच्या कामाचेच हे बक्षीस असे काही जणांनी बोलून पण दाखविले.

हिशेब तपासनीसाची जागा म्हणजे कार्यालयाचे आर्थिक व्यवहार व्यवस्थित व नियमाप्रमाणे होत आहेत किंवा नाही हे पहाण्याची जागा. तशी ही जागा खूप जबाबदारीची शिवाय मोहपण पाडणारी. पण विष्णूपंत पूर्वसंस्कारामुळे मनाने खंबीर असल्यामुळे पैशाच्या मोहास कधीच बळी पडले नाहीत. शिवाय त्यांना वडिलांनी हे पण सांगितले होते की काम होण्यासाठी लोक आपल्याला जास्तीचे जे पैसे देतात ते काही सुखासुखी देत नाहीत. देतात ते शिव्याशाप देऊनच, मग अशा माणसांचे शाप व तळतळाट लागल्यावर आपण सुखी व शांत जीवन कसे काय जगू शकू ? त्यामुळे विष्णूपंत नियमांचे उल्लंघन न करताच आपले काम चोखपणे करत असत.

आर्थिक व्यवहार नियमाप्रमाणे करणे व ते लक्षपूर्वक तपासणे म्हणजे थोडीफार कटुता आलीच. कारण अनेकांना आर्थिक व्यवहारावर नियंत्रण नकोच असते. कंत्राटदार ज्याप्रमाणे बिले करून देतील त्याप्रमाणे ती पास केली की कंत्राटदार खूष. पण विष्णूपंतांनी त्यांच्या खुशी नाखुशीकडे लक्ष न देता जे नियमाप्रमाणे करता येईल ते करूनच मग त्यांची बिले पास करत. वरिष्ठ अधिकारी जोपर्यंत त्यांच्या विचारसरणीचे होते तोपर्यंत त्यांच्या कामाबद्दलची तारीफच होत राहिली. पण हे असे नेहमी थोडेच चालते ? काही वर्षानंतर विष्णूपंतांचे ग्रह बदलले आणि त्यांच्या दुर्दैवाने त्यांना अगदीच निराळ्या विचारसरणीचा वरिष्ठ मिळाला. त्यामुळे त्याच्या हाताखाली काम करणे विष्णूपंतांना कठीण जाऊ लागले. पण विष्णूपंतांनी आपले काम करणे पूर्वीप्रमाणेच चालू ठेवले. त्यामुळे वरिष्ठ चिडले व विष्णूपंतांना म्हणाले, ''अहो फडके (विष्णूपंतांचे आडनाव फडके होते) तुम्ही कामे बरोबर करत नाही. अनेकवेळा तुम्ही नियमावर बोट ठेवता व शक (ऑब्जेक्शन) काढून बिले परत करता. अहो ! मला सांगा. नियम काम होण्यासाठी केले, का कामामध्ये अडचणी निर्माण करण्यासाठी ? शिवाय हे नियम आपणच केले ना ! मग या नियमांनी लोकांची कामे जर होत नसतील तर ते नियम काय कामाचे ? तुम्ही नेहमी नियमांचा विपरीत अर्थ काढता व बिलात चुका काढता व तो परत करता. तेव्हा हे तुमचे असले काम मला मुळीच पसंत नाही.'' त्यावर विष्णूपंत म्हणाले, ''साहेब ! मला नियमांचा अर्थ चांगला कळतो व

त्यातील अर्थ ओळखूनच मी बिले पास/नापास करतो. एखाद्या नियमाची आपल्याला अडचण होते म्हणून त्यातून आपल्यावर हवा असलेला अनुकूल अर्थ कसा काय काढायचा ? तसा तो लावावयाचा असेल तर त्याच्याबाबत आपण आपल्या वरिष्ठांचा सल्ला (मत) घ्यावयास नको कां ? शिवाय मी जर तसा अर्थ काढला व तो चुकीचा निघाला तर त्यावेळी मलाच त्याचा जाब द्यावा लागेल. त्यावेळी तुम्ही माझ्या पाठीशी उभे रहाणार नाही.'' यावर साहेब एकदम कडाडले. ते म्हणाले, ''फडके ! तुम्ही कुणाशी उर्मटपणे बोलताय ? त्याबद्दल शिस्तभंगाच्या नियमानुसार मी तुमच्यावर कारवाई करू शकतो हे ध्यानात ठेवा. तुम्ही मला नियमांचा अर्थ शिकविण्याची मुळीच जरूर नाही. अहो ! मी यापूर्वी मी जेथे जेथे कामे केली तेथे तेथे तुमच्याप्रमाणे कायद्याचा अगदी कीस काढणारे, नियमावर अगदी बोट ठेवणारे तुमच्यासारखे हिशेब तपासनीस नव्हते. तेव्हा लक्षात ठेवा तुम्ही तुमची कामाची पद्धत बदलली नाहीत तर मला तुमच्याकडे बघावे लागेल.''

नवीन साहेबाचे व विष्णूपंतांचे असे नेहमीचे खटके उडू लागले. त्यामुळे विष्णूपंतांना खूप मनस्ताप होऊ लागला व त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होऊ लागला. परिणामी त्यांना आजारीपणाच्या दीर्घ मुदती रजेवर जावे लागले व त्यामुळे कार्यालयात रान मोकळे झाले. विष्णूपंतांच्या आजारपणाचा फायदा तर त्यांच्या साहेबाने पुरेपूर उठवला. बरेच दिवस आजारी असल्यामुळे पुन: नोकरीवर रुजू होण्यास अयोग्य असे डॉक्टरकडून सर्टिफिकेट मिळवून त्यांनी विष्णूपंतांना मुदतीपूर्वी सेवानिवृत्त करून त्यांचे आर्थिक नुकसान करून आपल्या मार्गातील काटा दूर केला.


पण भगवंत सत्याचा वाली असल्यामुळे त्याने विष्णूपंतांवर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन केले. चोख व प्रामाणिक काम तसेच मोहाला कधीच बळी न पडणारा एक करारी माणूस असा विष्णूपंतांनी लौकिक मिळविलेला असल्यामुळे, प्रकृति चांगली सुधारल्यावर एका खाजगी कंपनीने त्यांना बोलावून घेऊन हिशेब तपासनीसाची नोकरी देऊ केली. शिवाय त्यांच्या निवृत्तिच्या वेळी असलेल्या पगारापेक्षा पन्नास रुपये जास्त पगार पण देऊ केला. सरकारी नोकरीपेक्षश ही बिलकूल मनस्ताप नसलेली व अधिक पगार असलेली नोकरी मिळाल्यावर त्यांना 'भगवान् जो कुछ करता है, वह अच्छे के लिये करता है' या वडिलांच्या वचनाची प्रचीति आली व त्यांनी सद्गदित होऊन त्याबद्दल भगवंताजवळ कृतज्ञता व्यक्त केली. या खाजगी कंपनीत पण विष्णूपंतांनी उत्तम कामगिरी करून वरिष्ठांकडून शाबासकी मिळवली. पुढे काही कारणाने ती खाजगी कंपनी बंद पडली व विष्णूपंतांना काही दिवस घरी बसावे लागले. पण भगवंत त्यांचा पाठिराखा असल्यामुळे व त्यांचे काम बोलके असल्यामुळे काही दिवसातच त्यांना एका निमसरकारी कार्यालयात त्याच पदाची नोकरी मिळाली. तेथे त्यांनी वयाच्या ६० वर्षांपर्यंत इमानेइतबारे काम केले व त्याचबरोबर आपल्याला नोकरीतून मुक्त करण्याची संचालकांना विनंति पण केली. तेव्हा संचालक म्हणाले, ''अहो फडके ! तुम्ही एवढ्यात निवृत्त कसे काय होता ? तुमचे काम पाहून आम्ही तुम्हाला दोन वर्षे मुदतवाढ दिली आहे. पण विष्णूपंत अगदी निराळ्या विचारसरणीचे असल्यामुळे त्यांनी ती मुदतवाढ सविनय नाकारली त्यामुळे त्यांच्या ऑफिसातील बरेच लोक नाराज पण झाले पण विष्णूपंतांचा निर्णय अगदी पक्का असल्यामुळे त्यांचा नाईलाज झाला.

नोकरी संपण्याच्या दिवशी विष्णूपंतांना जो निरोप देण्यात आला तो भव्य व हृद्य होता. त्या समारंभाच्या वेळी त्यांनी प्रगट केलेले विचार तर लाख मोलाचे होते. ते म्हणाले, ''मित्रहो ! या नोकरीत मला मुदतवाढ देण्यात आली होती तरी मी ती नाकारली हे ऐकून तुम्हाला असं वाटलं असेल की काय चमत्कारिक व कर्मदरिद्री माणूस आहे ! दैव ह्याला न मागता मुदतवाढ देतंय अन् हा ती चक्क नाकारतोय ! पण मित्रांनो ! माझी या बाबतीतील मते अगदी निराळीच आहेत.माझ्य मते आपली नोकरीची मुदत संपल्याबरोबर कोणत्याही परिस्थितीत आपण त्या खुर्चीला चिकटून रहाणे मुळीच बरोबर नाही. कारण आपण लोकांना जोपर्यंत हवेहवेसे वाटत आहोत तोपर्यंत आपण तेथून निघून जाणे इष्ट नाही कां ? शिवाय आपल्या स्वत:च्या बढतीच्या आड असाच एखादा मनुष्य आला असता तर आपल्याला काय वाटले असते याचे भान पण आपण ठेवावयास हवे. माणसाला पैसे कितीही मिळाला तरी तो पुरत नाही. त्यावर आपणच आपल्यावर बंधन घालून घेतले पाहिजे. कारण पैसा हा पुरवावयाचा असतो तो कधीच पुरत नसतो हे आपण लक्षात ठेवावयास हवे. तुम्ही सर्वांनी जे मला सहकार्य दिलेत व साहेबांनी मला जे सांभाळून घेतले त्याबद्दल मी आपणा सर्वांचा ऋणी आहे.'' कार्यालयातील सर्वजण विष्णूपंतांचे भाषण अगदी लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांचे वरील प्रकारचे उत्तुंग विचार ऐकल्यावर सर्वांचीच अंत:करणे हेलावून गेली. 'केवढ्या मोठ्या मनाचा माणूस' असे गौरवोद्गार पण अनेकांच्या तोंडातून बाहेर पडले.

आपल्याला सरकारी नोकरीतून आकसाने जरी लवकर निवृत्त केले तरी भगवत्कृपेने आपल्याला लगेच एकापाठोपाठ दोन नोकऱ्या मिळाल्या, त्यामुळे आपिले आर्थिक नुकसान तर मुळीच झाले नाही उलट चांगलाच फायदा झाला हे विष्णूपंतांच्या लक्षात आले. त्यावेळी त्यांना 'योगक्षेमं वहाम्यहम् ।' 'न मे भक्त: प्रणश्यति ।' ह्या वडिलांनी गीतेतील शिकवलेल्या वचनांची आठवण झाली व त्यांचा कंठ भगवत्प्रेमाने दाटून आला व आनंदाश्रूंनी त्यांचे हात नकळत जोडले गेले.

# नवविधा भक्तीचे स्वरूप

कृष्णा तेली
कुडाळ (सिधुंदूर्ग).



❖❖❖

**नवविधा भक्तीचे श्रीसाईबाबांनी वेळोवेळा भक्तांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष महत्व विशद केलेले आहे. मरणापूर्वी बाबांनी राधाक्कांना नऊ रूपये दिले. त्याचा अर्थही नवविधा भक्ताचे प्रतिपादन असाच घेतला जातो. 'श्रद्धा व सबुरी' हा बाबांचा संदेश समजण्यासाठी नवविधा भक्तीच्या नऊ पायऱ्या प्रत्येकाने समजून घेतल्या पाहिजेत. त्या अशा -**

❖❖❖

श्री समर्थांच्या दासबोधातील दशक चवथा नवविधा भक्तीचे स्वरूप विषद करतो. भजन म्हणजे रस घेण. स्वाद घेणे ईश्वराची भक्ती म्हणजे ईश्वराचा रस घेणे. भगवंताचा महिमा जाणून त्याच्या लिला ऐकाव्यात, त्याचे गुण व रूप पहावे. संतांच्या संगतीत प्रवचन, किर्तन गुणगायन करून भगवंताच्या स्मृतीला पुनपुन: मनांत घोळविणे म्हणजे भक्ती. दुसरा अर्थ असा की ईश्वराचा अंश होणे म्हणजे भक्ती. वास्तविक जीव ईश्वराचा अंश आहेच. फक्त तो अविद्येच्या आवरणाखाली आला आहे. स्वस्वरूपाच्या विस्मरणामुळे 'मी ईश्वराचा आहे' असे म्हणण्याऐवजी ''मी देहाचा, असे तो म्हणतो व वागतो. ईश्वराहून आपण वेगळे आहोत असे वाटल्यामुळे तो मायेने झपाटून दु:खे भोगतो. मी जगाचा नसून भगवंताचा आहे अशी खरी जाणीव होणे यांचे नाव भक्ती ! ईश्वराची भक्ती करणे म्हणजे आपल्या आनंदाच्या आड येणाऱ्या अविद्या, अहंता व वासना याना भगवंताच्या भक्तीने नाहीसे करणे. भगवंताला शरण जाताच विद्याशक्ती तात्काळ वश होते म्हणून आपल्या 'अहं'चा बळी देणे याचे नाव भक्ती.भगवंताला आपला स्वामी मानून त्याचा आश्रय घेणे, आपलेपणाने त्याचा स्वीकार करणे, त्याच्यावर सर्वस्वी भार टाकून जीवन जगणे हे ही भक्तीचेच लक्षण समजावे. तन, मन, धन, संपत्ती व ऐश्वर्य सारे काही भगवंताच्या मालकीचे आहे, आपण फक्त विश्वस्त आहोत या भावास भक्ती असे म्हणतात. सेवा करित जगत असताना अमुकच फळ मला मिळावे असा आग्रह न धरता जे फळ मिळेल त्यातच समाधान राखणे यातच भक्तीचे वर्म साठलेले आहे.

भक्तीमध्ये ज्ञान कसे आहे ते शोधणे जरूरीचे आहे.

मी 'त्यांचा' आहे हे ज्ञान झाल्यावरच आपण भगवंताच्या नादी लागतो.

२) भगवंताच्या आवडीमुळे जीव पुन:पुन: त्याचेच चिंतन करतो.

३) भक्तीमध्ये कर्म कसे आहे. भगवंतासाठी काही तरी केल्यावाचून जीवाला चैन पडत नाही म्हणून कर्म आहे.

४) भगवंताच्या अखंड चिंतनातून जीव आपोआप धारणा व ध्यान साधतो.

५) वरील भक्तीच्या सर्व खुणा दिसू लागताच भक्ताला सिद्धी विनासायास वश होतात.

अध्यात्माची सर्व अंगे अशारितीने भक्तीमध्ये रूजू होतात.

एकच ईश्वर प्रत्येक जीवाच्या अंत:करणात प्रतिबिंबित होतो. ईश्वर हा 'बिंब' तर जीव हा 'प्रतिबिंब'. जीव ईश्वराच्या ठिकाणी जो भाव, सामर्थ्य, ज्ञात किंवा महिमा प्रस्थापितो तीच सर्व शक्ती प्रतिबिंबीत होऊन जीवाच्या ठिकाणी उद्भवते. भक्तीमध्ये जीव ईश्वराच्या ठिकाणी संबंध जोडतो. जगामध्ये

संबंधशून्य व्यक्ती नाही. ज्याच्याशी संबंध जोडायचा त्याच्या अस्तित्वाबद्दल किंचितही संशय नसावा. म्हणूनच भगवंत सत्य आहे अशी भावना ठेऊनच भाव केंद्रीत करावा. या विश्वासामुळे भगवंताची अखंड स्मृती राहाते. अखंड स्मृतीने त्याचे सान्निध्य राहाते. त्यामुळे तदाकारता येते, तदाकारतेमुळे आत्मीयता लाभते, व ही आत्मीयता प्रीतीप्रयत्नाने अखंड, अमृत, व रसमय बनते. हे भक्तीचे स्वरूप समजावे. या भक्तीमुळे जीव प्राणीमात्रांशी एकरस बनून सहजावस्थेत स्वानंदात डुंबत राहातो.

बाह्य जगताशी त्याचा नाममात्र संबंध राहातो वृत्तीशी त्याचा संबंध उरत नाही. आपल्या हक्काचा आणि हाताशी असलेला 'स्वानंद' आपला जीव गमावून बसला त्याचे कारण त्याचे मन होय. अविद्येच्या अंमलाखाली वावरणारे मन जर ईश्वराच्या नादी लागले तर ते प्रपंचातून निवृत्त होईल. व पवित्र बनून भगवंताच्या प्रेमात मग्न होईल. भगवंताला आपलेसे करण्यासाठी हे मन वळविण्यास जे भक्तीचे मार्ग सांगितले आहेत तेच नवविधा भक्तीचे प्रकार होत. या भक्तीच्या प्रकारांतील कोणत्याही पायरीवरून भक्ताने भगवंताची सेवा केली तरी त्याचे काम साध्य होईल. फक्त आवश्यक आहे ती भगवंताबद्दल आत्मीयता किंवा आपलेपणा ! या भक्तीची परिणती शरणागतीमध्ये आहे व भगवंतापदी सर्वार्थाने लिन होणे हीच शरणागती समजावी. आपले छोटेसे व्यक्तीमत्व, आपले सामान्य व असामान्य गुण व दोष, आपली न्यूनता व निपुणता आपले सर्वस्व प्रभुच्या चरणी अर्पण करायला शिकावे म्हणजे दिव्य जीवन प्राप्त होते. ईश्वरावर सर्व भार टाकला म्हणजे मनाला निश्चिंतपणा येतो. त्याच्या स्वाधिन झाल्यामुळे जीव निर्भय बनतो. आणि 'तो खरा कर्ता' असल्याने जीवाची अहंता साफ विरून जाते. आता जीवाचे असे काहीच न उरल्याने भगवंताचे गुण, कर्म च स्वभाव जीवाच्या जीवनातून दिसून येतात. त्याचे वागणे भगवंताच्या संकल्पानुसार होऊ लागते. या सहजावस्थेत येणेसाठी नवविधा भक्ती अंगीकारावी. त्यातील कोणत्या एका ही भक्ती प्रकारातून आपण भगवंताचे होऊन राहू यात शंकाच नाही.

नवविधा भक्तीचे प्रकार असे -

१) श्रवणभक्ती २) कीर्तनभक्ती ३) नामस्मरणभक्ती ४) पादसेवनभक्ती ५) अर्चनभक्ती ६) वंदनभक्ती ७) दासभक्ती ८) सख्य भक्ती ९) आत्मनिवेदन भक्ती.

वरील भक्तीची थोडक्यात माहिती करून घेऊ.

## श्रवणभक्ती

आपल्या जीवनात भाषा हे क्रिया व प्रतिक्रिया याचे मोठे व महत्त्वाचे साधन आहे. माणसाचे व्यक्तित्व शब्दांनी बनते. आजच्या जीवनात आकाशवाणी, चित्रवाणी, सिनेमा, नाटके, वर्तमानपत्रे, ग्रंथ, शाळा, कॉलेजेस हे सर्व शब्दांच्या सामर्थ्यात वावरताना दिसतात. बोललेला शब्द श्रवण करण्याचे तंत्र माणसास ज्यावेळी आत्मसात करता आले. त्यावेळेपासून आजमितीस श्रवणास तेवढेच महत्त्व राहीले आहे. ग्रंथाचे वाचन हे एकप्रकारे श्रवणच समजावे. साधना चालू ठेऊन ग्रंथ वाचनमनन केल्यास ही श्रवणभक्ती सुरू राहाते व संशय फीटून भाव स्थीर बनतो व भगवंताचे प्रेम वृद्धींगत बनते.

## कीर्तनभक्ती

भक्तीच्या नऊ प्रकारात प्रत्येक प्रकार जरी स्वतंत्र असला तरी माणसाने पुष्कळ ऐकले व वाचले तर ते दुसऱ्याला सांगितल्यावाचून त्याला स्वस्थ बसवत नाही हा त्याचा स्वाभाविक गुण आहे. म्हणून भगवंताचे गुणगायन सांगणारा व ऐकणारा दोघेही आनंद लुटतात. व अशाप्रकारे अनेक लोक भगवंताकडे वळताना दिसतात. 'तो आहे व मी त्याचा आहे' असा भाव अंत:करणात स्थिर झाला की भक्ती आलीच म्हणून समजावे.

## नामस्मरणभक्ती

भगवंताचे नाम हे अविनाशी असून आकाशपाताळी नांदते. नाम म्हणजे वस्तूची खूण नसून वस्तुच्या अंतरंगात वावरणारी आदीसंकल्पाची म्हणजेच ईश्वराची शक्ती होय. नाम म्हणजे परमात्मशक्ती. म्हणून दृष्यातून अदृष्यात आणि अदृष्यातून द्यव्यक्रात जाण्यासाठी नामासारखी सहज व स्वत:च्या मालकीची दुसरी साधना नाही. आपण ज्याचे नाम घेतो तोच खरा आहे आणि त्याच्या सत्तेने सगळे घडते ही जाणीव राहणे याला नामस्मरण म्हणतात. प्रपंचात वावरताना भगवंताचा सारखा विसर पडतो. तो न पडू देण्यास नामासारखे दुसरे साधन नाही. म्हणून नामस्मरणातून भक्तीचा उदय अधिक प्रभावी होतो.

## पादसेवनभक्ती

आपल्या जीवनात ज्याच्या सान्निध्यात आपण राहातो, वावरतो त्यांच्या देहाचा व मनाचा परिणाम सूक्ष्मपणे आपल्या देहावर व मनावर होत राहातो असा अनुभव आपणास मिळतो. याच नियमावर भक्तीचा पादसेवन भक्ती प्रचार आधारलेला आहे. विवाहीत स्त्री आपल्या पतीला मनातून आपले मानून आपलेपणा ठेवते. सतत तसेच संताना सद्गुरू मानून आपण त्यांचेबद्दल आपलेपणाने प्रेम ठेवणे असा हा उदात्त प्रकार आहे. ज्याचा आचार, विचार, उच्चार भगवंताच्या प्रमाने भरून वाहातो तो संत होय. जागेपणी व झोपेत, सुखात व दु:खात, संपत्तीत व आपत्तीत, लोकांतात व एकांतात जो भगवंतापासून वेगळा राहातच नाही अशा दिव्य आनंदात असलेल्या संताची

सेवा करणे व मनापासून त्याने सांगितलेली सेवा आचरणे, निर्लेप-पणाने त्यांचे होऊन राहाणे, म्हणजेच पादसेवन भक्ती होय. सद्‌गुरूवर चिकाटीने श्रद्धा ठेऊन राहाणे ही एक मनाची मोठी शक्ती आहे.

## अर्चनभक्ती

भगवंताची पूजा करणे, सुरेख मूर्ती प्रस्थापीत करून स्नान घालून, सुगंधी फुले वाहाणे तीला साष्टांग नमस्कार घालणे, तीच्याकडे प्रेमदृष्टीने पाहाणे, या भक्तीला अर्चनभक्ती म्हणतात. माणूस कल्पनेच्या विलक्षण शक्तीने मनातून या भगवंताला हृदयात साठवून मानसपूजा करू शकतो. यामुळे मनास मोठी प्रसन्नता लाभते. परमात्म्याला आपलासा करण्यासाठी माणसाला स्वत:मधील माणूसपणाच्या पलीकडे उडी मारावी लागते. असे पलीकडे जाण्याचे प्रकार दोन-एक माणूसपणा नाहीसा करून परमात्म्याला झोंबणे हे ज्ञानमार्ग व योगमार्ग झाले. व दुसरा-माणूसपणाला परमात्माकडे सर्वस्वी वळवीणे हा मार्ग हा अर्चन भक्तीचा मार्ग आहे. ज्याच्यावर आपले प्रेम असणे त्याचा सत्कार, पूजा केल्याशिवाय आपणाला चैन पडत नाही. या मध्ये अर्चनभक्तीचे मूळ सापडते.

## वंदनभक्ती

वंदन म्हणजे नमस्कार करून लिन होणे शरण जाणे. देहाचा अभिमान मारण्यासाठी परमार्थाची सर्व साधने करायची असतात. अंगात नम्रता आली की अभिमान क्षीण होतो. साष्टांग नमस्कार घालण्याचा अभ्यास केला तर अंगी नम्रता येते. ज्याच्या जीवाशी आपला संबंध येईल त्या त्या जीवाच्या अवगुणाकडे दुर्लक्ष करून त्याच्या गुणानाच तेवढे पाहाण्याची कला आपल्याला शिकली पाहिजे. ही कला साध्य झाली की, त्या गुणांचे अधिष्ठान असणारा भगवंत आपोआप मनाला भासू लागतो. यामुळे देहाभिमान गणित होऊन तो सर्वांशी अगदी लिनपणाने, समरसपणाने वागतो. वंदनभक्ती ज्याला साधली त्यांच्या जीवनात एवढा मोठा चमत्कार घडून येतो.

## दास्यभक्ती

दास्यभक्ती म्हणजे अनन्यभक्ती. प्रभुरामचंद्रावर भक्तीरूपाने श्री मारूती रायाने जे प्रेम केले ते दास्यभक्तीचे उत्तम उदाहरण आहे. श्रीसमर्थ ''श्रीरामाचा दास'' म्हणूनच अखेरपर्यंत जगले. त्यांच्या नावातच त्यानी दास्यभक्तीचा चमत्कार दाखविला 'रामदासस्वामी' याचा अर्थ असा की मी रामाचा दास बनलो पण त्यामुळे जगाचा स्वामी बनून अकिंचन असून समर्थपणे मिरविलो, भगवंताचे किंवा सद्‌गुरूचे दास्यत्त्व अंगीकारल्याशिवास भक्तीची पूर्णता होत नाही. तो म्हणजे भगवंत माझा आहे व मी सर्वस्वी त्याचा आहे. या शुद्ध भावनेपायी स्वामीच्या सेवेशिवाय भक्ताला जीवनात दुसरा काहीही स्वार्थ उरत नाही. आपल्या सेवेचे फळ काय मिळते, मिळाले किंवा मिळेल याचा विचार देखील भक्ताला मनात येत नाही. भगवंताचा दास जसजसा सेवामग्न होत जातो. तसतसा त्याचा स्वामी (परमात्मा) चराचर व्यापूनआहे अशी प्रतीती त्याला येते. दास्यभक्तीतून अद्वैत जन्माला येते.

## सख्यभक्ती

सख्य भक्ती व दास्यभक्तीची पुढील पायरी ओळखावी. भगवंताचे निरंतर नामस्मरण, चिंतन, पादसेवन, अर्चन, वंदन करत राहील्याने भक्ताचे मन भगवंताला सोडून अन्यत्र जाण्यास असमर्थ होते. दोघेजण वेगळे होत नाहीत. साहजिकच या परिचयामुळे भगवंत आपला सखा, मित्र बनतो. दोघे एकमेकाचे सखे होतात. दास्याचा विकास झाली की दास आपले दासपण विसरत नाही परंतु भगवंत आपले स्वामीपण विसरतो व दासाला मित्रत्वाने पाहातो. दासाला न संकोच, न भिती उरते. तर भगवंताला न परकेपणा व मोठेपणा उरतो. जन्मभर ज्याचे रुप आठविले, त्याचे अनुसंधान साधले त्याचा मंगलमय मधुर संगम भक्तीमध्ये घडून येतो.

## आत्मनिवेदन भक्ती

ज्ञान व भक्ती मुक्तीचे मार्गे जातात या संताच्या अनुभवाची आत्मनिवेदनात प्रत्यय येतो. आपले सर्व अज्ञान दूर सारून 'मी तोच आहे' हा विलक्षण साक्षात्कार होऊन ज्ञानी आनंदसागरात बूडून जातो. अज्ञान नाहीसे होऊन ज्ञान जाले की तेहीपुढे नाहीसे होते. परंतु भक्तीने ब्रह्मज्ञान प्राप्त होते पण भक्ती संपत नाही, ती थांबत नाही समर्थांची अद्वैतभक्ती म्हणतात ती हीच होय.

या भक्तीने उपासना करता करता अभिमान संपूर्णपणे गळीत होऊन भगवंताशी तदाकार होऊन जातो ही 'सायुज्यमुक्ती' होय. भक्तीचा प्रेम हा भक्तीचा प्राण आहे. प्रेमवस्तुशी संपूर्ण एकरुप होऊन जाणे हा प्रेमाचा परमोत्कर्ष समजतात. भगवंतावर प्रेम करता करता भक्त भगवत्स्वरुप बनतो. भक्तीमध्ये मोठे माधुर्य असते, यात शंकाच नाही. परंतु ज्ञानाची पार्श्वभूमी असल्याशिवाय या जगात भक्तीचे कार्य व्हावयास पाहिजे तितके होत नाही. हे ओळखून महाराष्ट्रीय संतांनी बुद्धीप्रधान भक्ती मार्गाचा प्रसार केला. आपले स्वस्वरुप ज्ञानमय आहे. म्हणून भक्तीची कास धरून अज्ञानाचा नाश करून भक्ताने ज्ञानरुपी स्वरुपाचा शोध घ्यावयाचा आहे. ज्याच्या हृदयात ज्ञान विलसते तो सर्व प्रकारच्या बंधनातून मोकळा होतो व आत्मसाक्षात्कराचा धनी होतो.

# 'अन्नपूर्णा स्तोत्र' महात्म्य

कै. स. कृ. देवधर



❖❖❖

**अन्नदानास महादान म्हटले जाते. श्री साईबाबा स्वतःच्या हाताने अन्न शिजवून भक्तांना व भुकेलेल्यांना वाटत. आपल्या संस्कृतीने अन्नास पूर्णब्रह्म म्हणजे साक्षात देव मानलेले आहे. अशा या पूर्णब्रह्म अन्नावर श्रीमद् शंकराचार्यांनी 'अन्नपूर्णास्तोत्र' लिहिले असून त्या अल्पाक्षरब्रह्म स्तोत्रांची माहिती सांगताहेत वेदमूर्ती कै. स. कृ. देवधर, कै. देवधर यांनी निधनापूर्वी हा लेख 'श्रीसाईलीला'कडे पाठविलेला आहे.**

❖❖❖

भगवत् पूज्यपाद श्रीमद् आद्य शंकराचार्य यांचे सर्व आयुष्य जगाच्या कल्याणासाठी होते. त्यांच्या जीवन चरित्रात अनाकलनीय अशा अनेक गोष्टी आपोआप घडल्या. लोक त्याला चमत्कार म्हणतात पण तो चमत्कार आचार्यांच्या जीवनांतील सहजता होती. त्याचे अस्तित्व निसर्गाला सुद्धा गौरव वाटावे इतके त्यांचे ज़ीवन पारमार्थिक समृद्धीने परिप्लुत झालेले होते. त्यांनी अद्वैत वेदान्ताचा प्रचार करण्याच्या निमित्ताने ज्याप्रमाणे विपुल वाङ्मय लेखन केले त्याप्रमाणे आपल्या लेखनांतून उत्तमोत्तम पारमार्थिक अनुभवांचे देखील स्पष्टीकरण केले. या निमित्ताने त्यानी अनेक देवतांची स्तोत्रे लिहून सामान्य लोकांना ईशानुगामी केले. संसारिक जीवनांत सुविधा निर्माण झाल्या म्हणजे शहाणा मनुष्य स्वतःच्या बळावर हे घडून आले असें न म्हणता ज्या शक्तीच्या प्रभावाने हें घडले त्या शक्तीचा विचार करतो आणि त्याप्रमाणे आचार करतो. परंतु मूढ मनुष्य मात्र यशाचे श्रेय स्वतःकडे घेवून त्या पेक्षा विपरीत असलेल्या अवस्थेला परमेश्वराला दोषी ठरवतो. अशा दोन्ही प्रकारच्या लोकांना आपल्या वाक्स्पर्शाने ईशानुगामी करण्याचे श्रेय केवळ आचार्यांचे आहे. विविध स्तोत्रांच्या माध्यमातून आणि आपल्या निरपेक्ष आचारातून त्यांनी जगावर फार मोठे उपकार केले आहेत.

अशा स्तोत्रांपैकी अन्नपूर्णा नावाचे एक स्तोत्र आहे. हे स्तोत्र केवळ अन्नपूर्णा देवीच्या प्रसादासाठी आहे. याच्या पाठीमागे अशी एक कथा सांगितली जाते की आचार्य भिक्षाटण करीत असतां एका गावांत आले. एका घराच्या समोर ते आले. घराचा दरवाजा उघडा होता. आंत माणसांची चाहूल फारशी नव्हती. तरीपण आपल्या प्रथेप्रमाणे आचार्यांनी ॐभवति भिक्षान्देहि। अशी वाणी उच्चारली. घराची स्वामिनी भगवंतापुढे बसून आपल्या क्षुधाशांतीसाठी प्रार्थना करीत होती. तेवढ्यांत ही अतिथीची हाक कानावर आली. ती चटकन उठली. दरवाज्यापर्यंत गेली. पाहिले तो एक तेजोवान बालसंन्यासी दारासमोर उभा आहे. दाराची फळी किंचित पुढे करून आपले तोंड लपवीत ती साध्वी रूद्ध कंठाने म्हणाली, अतिथी महाराज गेले तीन दिवस माझ्या घरांत चूल पेटलेली नाही. कणसं काढून शिल्लक राहिलेली कणशून्य कणसे पाण्यांत उकळून आम्ही क्षुधा शमविण्याचा प्रयत्न केला. मी तुम्हाला काय देऊ. मला क्षमा करा. तेवढ्यांत आचार्य म्हणाले, कणशून्य कणसे देखील मला चालतील. त्या साध्वीने ती कणसे आणली. तिने ती कणसे आचार्यांच्या झोळींत टाकली. तिचा कंपित हात पाहून आचार्यांना तिची दया आली. त्यांनी डोळे मिटून हात जोडले आणि अन्नपूर्णा देवीची प्रार्थना करण्यास प्रारंभ केला. ती साध्वी त्या बाल संन्याशाचे प्रसन्न मुख न्याहाळीत तेथेच उभी राहिली होती. या अतिथीचे सामर्थ्य तिला माहीत नव्हते. काही क्षण गेले. एकदम प्रकाश पसरला. आचार्यांनी पुन्हा नमस्कार केला आणि ते त्या देवतेला म्हणाले माते या घरांत तू सतत वास कर आणि मी पुन्हा भिक्षेला येईन त्यावेळी मला याच ठिकाणी तुझे पवित्र दर्शन घडेल असेक काहीतरी कर आचार्यांनी नमस्कार केला. दाराआड लपलेल्या त्या साध्वीला नमस्कार करून आचार्य पुढे चालू लागले. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीला

साश्रू नयनांनी नमस्कार करून ती घरांत वळली. पूर्वी रिकाम्या मुखानी इतस्तत: पसरलेली मडकी विविध धान्यांनी भरून गेली होती. त्यांतील एका घटांतील तांदूळ हाती घेवून ती देवांजवळ आली. आश्चर्याला सीमा नव्हती. आपला पती परत येण्यापूर्वी तिने उत्तम स्वयंपाक केला. झालेली कथा त्या साध्वीने आपल्या पतीला कथन केली. त्यालाही आश्चर्य वाटले. तयार झालेल्या अन्नाचा नैवेद्य भगवंतांना समर्पण करून त्यांनी भोजन केले. संध्याकाळी ती पुन्हा त्या घराजवळ आली. तिने पाहिले तो तो घट पूर्वीप्रमाणेच भरलेला होता. त्यानंतर त्या घरांतील अन्न कधीच संपले नाही.

असा समृद्ध परिणाम असणारे आचार्यांचे हे स्तोत्र अन्नपूर्णा स्तोत्र या नावाने ख्यात असून सर्वांत लहान म्हणजे केवळ चार श्लोकांचेच आहे परंतु त्याचा परिणाम आजही अनुभवाला आला आहे.

**भगवति भवरोगात्पीडितं दुष्कृतोत्थात् ।**
**सुतदुहितृकलत्रोपद्रवेणानुयातम् ॥**
**विलसदमृतदृष्ट्या वीक्ष्य विभ्रान्तचित्तम् ।**
**सकलभुवनमातस्त्राहि मां ॐ नमस्ते ॥१॥**

अर्थ :- ॐ ने जिचें स्वरूप आणि तेज प्रतीत होते अशा (अन्नपूर्णमाते) माते, तूं या तीनहि लोकांची माता आहेस (गतजन्मींच्या) दुष्कृतीमुळें मी भवरोगाने अत्यंत पीडित झालो आहे. कन्या, पुत्र, पत्नी यांचा मोठा त्रास मला जाणवतो. माझे चित्त भ्रममय झाले आहे. अशावेळी अमृतमय दृष्टीने तू माझ्याकडे पहा आणि माझे रक्षण कर.

**माहेश्वरीमाश्रितकल्पवल्ली–**
**महंभवोच्छेदकरी भवानीम् ।**
**क्षुधार्तजायातनयाद्युपेत –**
**स्वात्मन्नपूर्णे शरणं प्रपद्ये ॥२॥**

अर्थ : महादेवांची अर्धांगिनी असणाऱ्या महान शक्तिमती, तुला अनन्य भावानें शरण आलेल्यांचे सर्व प्रकारचे मनोरभ पूर्ण करणारी तूं प्रत्यक्ष कल्पवल्ली आहेस भुकेने व्याकूळ झालेल्या माझी पत्नी आणि मुले यांनी युक्त असलेला मी, हे अन्नपूर्णा माते तुला शरण आलो आहे.

**दारिद्र्यदावानलदह्यमानम् ।**
**पाह्यन्नपूर्णे गिरिराजकन्ये ॥**
**कृपाम्बुधौ मज्जय मां त्वदीये ।**
**त्वत्पादपद्मार्पितचित्तवृत्तिम ॥३॥**

अर्थ : हे गिरिनाथदुहिते (हिमालय कन्या) सर्वत्र पसरलेल्या दारिद्र्याच्या वणव्याने मी होरपळून निघत आहे. मी माझ्या चित्तवृत्ति तुझ्या पदकमली अर्पण केल्या आहेत. तूं तुझ्या कृपासागरांत मला बुडवून टाक.

**इत्यन्नपूर्णास्तुतिरत्नमेतद् ।**
**श्लोकत्रयं य: पठतीह भक्त्या ॥**
**तस्मै ददात्यन्नसमृद्धिमम्बा ।**
**श्रियं च विद्या च यशश्च मुक्तिम् ॥४॥**

अर्थ : हें अन्नपूर्ण स्तोत्र म्हणजे एक महान रत्न आहे. उपरोक्त तीन श्लोकांचे भक्तिभावाने जो पठण करतो त्याला ही जगन्माता अन्नसमृद्धि, संपत्ती, यश, ज्ञान प्रदान करते आणि अखेर मुक्तीप्रत घेवून जाते.

ह्या स्तोत्राचा प्रयोग करण्याची एक पद्धती आहे. प्रत्येक व्यक्तीने भोजनाच्या वेळी जेवणाचे सर्व पदार्थ पानांत वाढून झाले की त्यापैंकी मुख्य अन्नावर (भात पोळी किंवा भाकरी) आपला उजवा हात उपडा ठेऊन या स्तोत्रातील पहिले तीन श्लोक म्हणावेत. अन्नपूर्णा देवीला नमस्कार करावा. करंगळी जवळची दोन बोटे आणि अंगठा यांच्या चिमटींत मुख्यान्नाचा अल्पसा भाग घेवून तो पानाच्या समोरच्या बाजूस ताटातच ठेवावा. मग जेवण करावें. यायोगे अन्नसमृद्धि तर लाभतेच पण त्याबरोबर क्षुधा-शांतीचें समाधानही लाभते.

एकदा मी आणि आमच्या काही मित्रानी सहकुटुंब आळंदीस जाऊन माउलींची पूजा-प्रसाद करण्याचे ठरविले. त्यावेळी फक्त वीस माणसे होती. परंतु ही वार्ता प्रसृत झाली आणि संख्या वाढू लागली. ज्यावेळी आळंदीस पोहोचलो तेव्हां बेचाळीस माणसे झाली. प्रत्यक्ष पूजा करतांना सहा माणसांचा एक समूह या प्रमाणे बारा पूजा झाल्या. भोजन प्रसाद घेण्यासाठीं सर्वजण मुक्कामाच्या ठिकाणी आले. तेव्हा माझ्या एका मित्रांच्या पत्नी मला म्हणाल्या माणसे खूप वाढली आहेत. आतां कसं करायचं तेव्हां त्यांना मी सांगितलं नैवेद्याची दोन पाने वाढा. माझे दोन ज्येष्ठ मित्र दोन्ही नैवेद्य घेवून माऊलीच्या मंदिरात गेले. त्यानंतर उपरोक्त श्लोकांचा पाठ करीत मी सर्व अन्नपदार्थांवर प्रोक्षण केले. तेवढ्यांत एक नैवेद्य घेवून माझे मित्र परतले. त्यांना मी सांगितले या ताटातील प्रत्येक पदार्थ त्या त्या पदार्थाच्या पातेल्यांत टाका. त्याप्रमाणे त्यांनी केले. सर्व भगिनींनी वाढण्यास मदत केली. पुरूषांची जेवणे झाल्यावर सर्व भगिनींचीही जेवणे झाली जाण्याच्या अगोदर धर्मशाळेची भांडी घासून परत करावयाची होती. त्यावेळी माझ्या मित्रांच्या पत्नीच्या लक्षात आले की थोडी भाजी आणि सहा पोळ्या शिल्लक आहेत. तिला आश्चर्याचा धक्का बसला. तिने ही गोष्ट सर्वांना सांगितली. सर्वांनाच आश्चर्य वाटले. तेव्हा मी त्या पोळ्या आणि भाजी वारकऱ्यांना देण्यास सांगितली.

या अन्नपूर्णा स्तोत्राच्या पठणाचा चांगला अनुभव मला आला. त्यावर अधिक विचार करता असे लक्षांत आले की जो गायत्री-उपासक आहे, त्याच्या पठणाने हा परिणाम प्रत्ययाला येतो. थोडक्यात या अत्यल्प स्तोत्राचे परिणाम महान आहेत. यावर चर्चा करीत न बसतां प्रत्यक्ष अनुभवाने समृद्ध व्हावे हेच सुयोग्य होय.

# साई भक्तांचे अनुभव



## मी तुमचिया हृदयीच तिष्ठे

**भेटीलागी जीवा लागलीसे आस,**
**पाहे रात्रंदिवस वाट तुझी रे....**

लता मंगेशकरांच्या कंठातून उमटलेल्या संत तुकोबांच्या अभंगाच्या या आर्त ओळी ऐकता ऐकता मन शिरडीत बाबांपाशी केव्हा जाऊन पोहोचले कळलेच नाही.

या मनाचे हे असेच आहे. शिरडीतून मुंबईस येऊन जेमतेम काही दिवस लोटले की पुन्हा शिरडीच्या भेटीचे वेध लागू लागता. नजरेसमोर मंदिराचा गाभारा, द्वारकामाई, गुरुपादुका, लेंडीबाग ही पुण्यस्थळे तरळू लागतात. साईवास्तव्यामुळे पावन झालेल्या त्या पवित्र भूमीतील वातावरणात भरून राहिलेला निरनिराळ्या फुलांचा, अगरबत्यांचा, ऊदधूपाचा सुगंध मनातून दरवळू लागतो. असंख्य भक्तगणांचे रंगीबेरंगी थवे व त्यांची सदैव साईदर्शनासाठी होणारी लगबग आठवू लागते आणि मग द्वारकामाईत बसलेल्या गुरुमाऊलीच्या दर्शनासाठी हे मन अधीर होऊ लागते.

दैनंदिन व्यवहार उरकत असता शिरडीला जायचे विचार मनात सतत घोळत असतात. कसे जमवायचे सगळे? मुलांची कॉलेजे, त्यांच्या परिक्षा, यजमानांचे ऑफिस ही सगळी अडथळ्यांची शर्यत कशी काय पार करायची? पण मग मन विचार करू लागते की हे सगळे जमवून आणणे आपल्या हाती थोडेच आहे? कारण

**''मी न आणिता कोणी न येती'' ।**
**ऐसी वंदती बाबांची**
**''माझी इच्छा झालियावीण ।**
**दारवंठा त्यागील कवण ।**
**कोणा स्वेच्छे होईल दर्शन ।**
**घडेल आगमन शिरडीचे ॥''** (साईसच्चरित अध्याय ३५ वा)

पण मनाची ओढ जर अंत:करणापासून असेल तर मात्र

**जैसी जयाची दर्शनोत्कंठा ।**
**जैसा भाव जैसी निष्ठा ।**
**सानंदानुभव पराकाष्ठा ।**
**भक्तश्रेष्ठा लाधते ॥** (साईसच्चरित अध्याय ३० वा)

दर्शनासाठी होत असलेली मनाची तगमग माऊली ओळखते आणि जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे एक एक प्रश्नचिन्हे सुटू लागतात. या तृप्त लेकीला माय समाधानाने, कौतुकाने न्याहाळत असते. पाठीमागून गर्दीचे धक्के बसतात आणि साईदर्शनाच्या अमृताचे आकंठ प्राशन करणारे मन भानावर येते. माऊलीची इतर लेकरेही दूरदूरहून आलेली असतात. प्रत्येक लेकराला वाटतं की, आपणच आईचे लाडके, पण आईचा मात्र प्रत्येक लेकरावर सारखाच जीव-

**''साई निजभक्त विश्राम धाम ।**
**भक्तास परम सुखदायी ॥**
**चंद्रा चकोर अपरिमित ।**
**चकोरा एकचि नक्षत्रनाथ ॥**
**तैसे तिजला सुत जरी बहुत ।**
**माता ती अवघ्यास एकचि ॥**
**दिनकर कुमुदिनी अपार ।**
**परी कुमुदिनीस एकाची दिनकर ॥**
**भक्ता तुझिया नाही पार ।**
**पिता तू गुरुवर एकलाचि ॥**

मेघा आतुर चातक कैक।
मेघ तेथूनि चातका एक॥
तैसे त्याचे भक्त अनेक।
जननी जनक तो एक॥ (साईसचरित अध्याय ५१ वा)

मुक्कामाचे ३-४ दिवस म्हणजे साईदर्शनाची पर्वणीच असते. पहाटे काकड आरतीपासून शेजारतीपर्यंत साईनामाच्या जयघोषाने काम तृप्त होत असतात. या साऱ्या सोहळ्यापुढे स्वर्गसुख ते काय असणार!

पाहता पाहता घरी परतण्याची वेळ येऊन ठेपते. गेले तीन दिवस थुई थुई नाचणारे उत्साहाचे कारंजे मिटू लागते. मन उदास होऊ लागते.

भाकरतुकडा खाल्याखेरीज जायचे नाही ही माऊलीची ताकीद ध्यानात असते. जेवण उरकून माऊलीचा निरोप घ्यायला सारेजण द्वारकामाईत येतो. माऊलीकडे पाहता पाहता पुन्हा पुन्हा डोळे भरून येऊ लागतात. ''पुन्हा केव्हा आणणार आहेस दर्शनाला?'' मन आक्रंदत असते. पण आता मात्र नवरा, मुले चलण्याची घाई करीत असतात. आशीर्वाद व उदीप्रसाद घेऊन पावले पुढे पडत असतात, पण मन मात्र माऊलीच्या चरणांपासून दूर जायलाच तयार नसतं.

कन्या सासुरासी जाये, मागे परतुनी पाहे।

या तुकोबांच्या अभंगाप्रमाणे मनाची अवस्था झालेली असते. द्वारकामाईच्या दारात पाऊले थबकतातच. समोरच्या अफाट गर्दीतूनही माऊलीचे पुन्हा एकदा दर्शन व्हावे अशी प्रबळ इच्छा होते आणि ती पूर्णही होते.

नेहमीच्या प्रसन्न मुद्रेने इतक्या दुरुनही आमच्याकडे पाहत असलेल्या माऊलीच्या तेजस्वी नजरेला नजर मिळता क्षणीच मनाची किंकर्तव्यमूढ अवस्था नाहीशी होते. वाटतं, अरे! माऊली तर या मनाच्या खोल गाभाऱ्यातच बसली आहे. तिचा विरह कसा काय होणं शक्य आहे? माऊलीची उक्ती आठवू लागते,

''म्हणाल आता मी आहे कोठे?
आता मी तुम्हा कैसा भेटे।
तरी मी तुमचिया हृदयीच तिष्ठे।
विना कष्टे सन्निकट॥ (साईसचरित अध्याय ४४)

हा भाव दृढ होताच आतापर्यंत तळमळणारे उदास मन शांत, तृप्त होते. समाधानाने मुंबईच्या बसच्या दिशेने पाऊले पडू लागतात.

**सौ. उषा गजानन गोडेकर**
९, पद्मरेखा, जयप्रकाशनगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई.

## ...तरी मी धावेन भक्तांसाठी !

माझी मानलेली भाची ही कोल्हापूर येथे राहते. ती बुधवार, दिनांक १६/१०/९६ रोजी सायंकाळी कोल्हापुरहून बसने मुंबईला निघाली. ती गुरुवारी सकाळी ठिक ५.४० वाजता माझ्याकडे मालाड येथे पोहोचली. दर गुरुवार, शुक्रवार सकाळी ठिक ७ वाजता सदर प्रसंगी आम्ही बाबांची आरती सर्व मंडळी मिळून करतो. आरती झाल्यावर भक्त मंडळी बाबांना नमस्कार करून आपले प्रश्न विचारतात.

भाचीची श्री साईबाबांवर अपार भक्ती आहे, श्रद्धा आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्ट बाबांना विचारल्याशिवाय करीत नाही.

सोमवार, दिनांक २१/१०/९६ रोजी दसरा होता. (विजया दशमी) त्या दिवशी तिच्या लहान भावाचे लग्न होते. त्या निमित्ताने ती कोल्हापूरहून मालाड येथे आली होती. तिच्या प्रश्नाला बाबांनी दृष्टांत उत्तर देऊन तिला त्वरित घरी कोल्हापूर येथे जाण्यास सांगितले. म्हणजे लग्न झाले की, लगेच तू निघ. कारण तुझी मुलगी कोल्हापूर येथे आजारी आहे. म्हणून तू येथे थांबू नकोस.

बाबांची दृष्टांत आज्ञा झाल्यावर लागलीच. सायंकाळी ६ वाजता ती बस स्थानकाकडे निघाली. तिला बसस्थानकाकडे पोहोचण्यास पंधरा मिनिटे उशीर झाला. ती बस बरोबर ६ वाजता निघून गेली. चौकशी केली, परंतु उपयोग काय? बस तर निघून गेली होती. तिला फार वाईट वाटले. ती भांबावून गेली. तिचा मोठा भाऊ नरेश मालाडहून तिच्यासोबत तिला सोडण्यास आला होता. त्याने बस स्थानकावर चौकशी केली तर त्याला सांगण्यात आले की, आपणा तिकिटाचे पैसे परत घ्या. त्यासाठी एक अर्ज फॉर्म भरण्यास दिला. नाइलाजाने फॉर्म भरून पैसे परत घेऊन त्यानंतर खाजगी बसने तिला रवाना करू या विचाराने त्याने तो फॉर्म भरून दिला. क्लार्कने तो निमूटपणे पाहून घेतला व तिकिटाचे काही टक्के रक्कम कमी करून बाकी पैसे परत करीत होता. ते पैसे घेण्यास नरेशने हात पुढे केला. इतक्यात कोल्हापूर बसचा कंडक्टर धावत धावत तिथे आला व त्या क्लार्कला विचारू लागला की, ६ च्या गाडीने कोल्हापूरला जाणारे प्रवासी कुठे आहेत. ते तर राहूनच गेले. (सौ. हेमा सोबत तिचे दोन ७ वर्षांचे जुळे मुलगे होते.) त्यांना घेण्यास मी सायन स्थानकावरून पुन्हा येथे बस घेऊन परत येथे आलो आहे. हे ऐकून सौ. हेमाला मनस्वी आनंद झाला. म्हणाली माझे बाबा मला कधीच अडचणीत आणत नाही. मनातल्या मनात तिने बाबांना आळविले. ह्या प्रसंगाने ती धन्य झाली. बस पुन्हा कोल्हापूरकडे जाण्यास रवान झाली. सायनपर्यंत गेलेली बस पुन्हा तिला घेण्यास मुंबई सेन्ट्रल बस स्थानकात आली. म्हणूनच बाबांचे वचन आठवतात.

''जरी हे शरीर गेलो मी टाकून, तरी मी धावेन भक्तांसाठी.''


**एक साईभक्त**

## साई-दर्शन

मी एका साईमंडळाची सभासद असून घरातील सर्वजण साईभक्त आहोत. बाबा बद्दलची भक्ती, प्रेम, श्रद्धा-सबुरी यांची पावलोपावली येणारी प्रचिती, बाबांचे अनुभव जितके वर्णावे, लिहावे तितके कमीच आहे. असा एक सुखद अनुभव नुकताच आला आणि तो मी लेखाद्वारे वाचकांसाठी देत आहे.

मी एका ऑफिसमध्ये टायपिस्ट म्हणून काम करते, २५ ऑक्टोबर ९६ रोजी मी एकटीच संपूर्ण दिवस ऑफिसात होते, रिकामा वेळ मी बाबांचे नामस्मरण लिहिण्यात किंवा बाबांचे मासिक वाचण्यात घालवते, त्या दिवशी बुधवार होता. अचानक माझ्या मनात बाबाबद्दलचे विचार आले, शिर्डीला जाऊन दर्शन घेण्याची मनामध्ये उत्कंठा चालू झाली. आणि सहजच तोंडातून शब्द बाहेर पडले, बाबा तुम्ही माझे लाडकेबाबा आहात, तेव्हा तुम्ही मला एकदा तरी दर्शन द्या. एवढी प्रार्थना मी सहज बोलून गेले, ऑफिस मधून मी आठ वाजता घरी आले, त्यानंतर नऊ वाजता आम्ही सर्व जेवायला बसलो, जेवणे होईपर्यंत साडेनऊ वाजले, तेवढ्यात माझ्या छोट्या बहिणीला आठवण झाली आणि अचानक मला म्हणाली, ताई भांडी लवकर घास आज टी. व्ही. वर साईबाबांची मालिका आहे, ''सबका मालिक एक'' प्रथम माझा विश्वास बसला नाही, कारण टी. व्ही. वर कोणतीही मालिका सुरू होण्याआधी दोन-तीन दिवस अगोदर सूचना देतात. झोपेतून जाग व्हावं तशीच ही बातमी होती. मी पटापट सर्व काम आटोपलं. टी. व्ही चालूच होता. घड्याळाचा काटा पुढे सरकत होता. तशी मनातील चलबिचल वाढत होती. आणि बहिणीने सांगितल्याप्रमाणे ''सबका मालिक एक'' ही मालिका सुरू झाली. बाबांच्या ह्या रूपाने मनातील कल्पना साकार झाली. बघता बघता मालिका केव्हा संपली हे सुद्धा समजले नाही. मी शेजारी विचारले तेव्हा आम्हाला काही माहित नाही. असे उद्गार आले. काहीना अर्धवट पहायला मिळाली तर काहीना माहित नसल्याने मिळालीच नाही. त्याच वेळी मी समजले दर्शन देण्याकरताच हा योगायोग आला असावा. टी. व्ही. वर का होईना दर्शन देऊन बाबांनी माझी इच्छा सफल केली. ''धन्य ती शिर्डी धन्य ते साईबाबा'' माझे लाडके साईबाबा यांना माझा कोटी-कोटी प्रणाम.

**निरुपमा आ. मोरजे**
**खातुनअप्पा चाळ, अंबिका नगर,**
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई.**




## सत्याचा पाठीराखा साई सखा

एप्रिल १९९६ च्या टी. वाय बीकॉमच्या परिक्षेला मी बसले होते. परिक्षेची तयारी चालूच होती. ह्यावर्षी मी दुसऱ्यांदा परीक्षा देत होते. त्यामुळे अभ्यासाच्या तयारीमध्येही मध्ये मध्ये गतवर्षीच्या अपयशाची बोच सतत होत होती. पण साईबाबांचे स्मरण करून पुन्हा अभ्यासाचा उत्साह यायचा.

गेल्या वर्षी आणि १९९६चे तीन महिने अभ्यास सुरू होता. जसजशी परिक्षा जवळ येऊ लागली. तसतसं टेंशन वाढत होतं. त्यात माझी लहान बहिणसुद्धा ह्यावर्षी माझ्या बरोबर परीक्षेला होती. माझ्या पुढल्याच बेंचवर तिचा नंबर होता. आमच्या एकूण सात विषयांपैकी सहा पेपरस झाले होते. एकच शेवटचा पेपर राहिला होता. आणि तिथेच माझ्यावर खऱ्या परिक्षेची वेळ आली. पेपरसच्या वेळी काहीही न आठवणं वगैरे गोष्टी मी ऐकून होते.

माझ्या हातात प्रश्नपत्रिका आली आणि मला आपोआप रडायला येऊ लागलं. कारण सर्व प्रश्न माहित होते पण काहीच आठवेना. साईनाथांचा धावा प्रत्येक क्षणी चालला होता. कसं बसं करून मी स्मरणशक्तीवर जोर देऊन थोडाफार पेपर

सोडवला. पण 'व्याख्या' हा प्रश्न ३० ते ४० मार्कांचा होता तो मला आठवेच ना. साईबाबांना मी म्हणत होते बाबा मला वाचवा. थोडं लिहून डोक वर केलं तर पुढील बेंचवरील माझ्या बहिणीने सर्व व्याख्यांच्या पुरवण्या डाव्या हाताला कंपॉसखाली ठेवल्या होत्या. तो क्षण बाबांनी माझ्यासाठी परिक्षेचाच क्षण म्हणून आणला होता. मी माझ्या हातातील बाबांच्या आंगठीकडे पाहिलं आणि मनात बाबांना म्हटलं बाबा तुम्हीच मला ह्या मोहाच्या क्षणातून वाचवा. आणि अशी प्रार्थना करताच आपोआप माझी मान परत माझ्या पेपरकडे गेली आणि हळूहळू मला व्याख्या आठवल्या. बाबा खरच तुमची लीला अगाध आहे.

दोन महिन्यानंतर माझा रिझल्ट होता. रिझल्टच्या दिवसापर्यत मला शेवटचा कठीण गेलेला पेपर आठवून बेचैन व्हायचं. पण एकीकडे असा धीर मिळत होता की, 'सत्याचा पाठीराखा साईसखा' असताना घाबरण्याचे काय कारण आणि काय सांगू नोटीस बोर्डावर पास झालेल्यांच्या यादीत माझा नंबर दिसताच, बाबांच्या अगाध लीलेची प्रचिती आली. ते सर्व आठवताना डोळ्यात आनंदाश्रू तरळतात आणि मन सतत म्हणंत 'जय साईनाथ'.

**प्रिती सुधाकर आर्यमाने**
**११, मालकंस अपार्टमेंट, डॉ. लाइजरस रोड, चरई, ठाणे.**

## मागे जे जे त्यास ते ते लाभे

'नित्य मी जिवंत' हे शब्द श्रीसाई सत्य करू दाखवतात व आपली प्रचिती श्रद्धावानांना देतात. श्रद्धावानांना अनुभव आला नाही असे होत नाही.

यावर्षी नेहमी पेक्षा उशीरा आमचं कॉलेज सुरू झाले. मी मुलुंडच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. आमच्या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेण्यासाठी टक्केवारी देखील चांगली लागते. यावर्षी ८३ टक्क्यांना ॲडमिशन बंद झालं होतं. म्हणजे चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच आमच्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळतो.

अकरावीच वर्ष असल्यामुळे मी सुरुवातीपासूनच अभ्यासाकडे दुर्लक्ष केलं. अभ्यास झाला नसल्यामुळे मी पहिली परीक्षा दिली नाही. दुसऱ्या परीक्षेतसुद्धा मी अजिबात अभ्यास केला नाही. हळूहळू वार्षिक परीक्षा जवळ येऊन ठेपली तरीही माझा एकही विषयाचा अभ्यास झाला नव्हता तरीही मी बिनधास्त होते. शेवटी परीक्षा अगदी दोन दिवसांवर येऊन ठेपली आणि मला खूप भिती वाटू लागली. पेपर कसेबसे लिहिले. पेपर तर मला फारच कठीण गेले होते. मी घरच्यांना सांगून टाकलं की यावर्षी मी पास होणं शक्य नाही. मी पास होऊन अशी आशाही करू नका. पण आमच्या घरात आम्हा भांवडांपैकी कोणी अजूनपर्यंत नापास झालं नव्हतं आणि माझा पहिली ते दहावीपर्यंतचा निकाल बघता मी शाळेतील हुशार विद्यार्थ्यांत गणली जात होते. आणि आता मी नापास झाले तर...

मी साईबाबांची अगोदरपासून भक्त होती मला यापूर्वीही अनेकदा बाबांचे अनुभव आले होते. माझा बाबांवर पूर्ण विश्वास तरीही मनात शंकेची पाल चुकचुकत होती. मी बाबांना मनापासून विनवीत होती. यावर्षी मी कशीही पास होऊ दे'यापुढे अभ्यासाच्या बाबतीत मी कधीही हलगर्जीपणा करणार नाही.

मी पेपर कसे लिहिले हे केवळ मला व पेपर तपासणीसालाच माहित ! आणखीही एका दिव्य विभूतीला हे ठाऊक होते. जी संकटकाळी आपल्या भक्ताला तारून नेते. त्याच दयाघनाने 'न भुतो न भविष्यति' घडवून दाखविले आणि मला उत्तीर्ण केले. ही महा शक्ती कोण ? हे साईभक्तांनी ओळखले असेलच अर्थातच ते आहेत श्री साईनाथ महाराज ज्यांची कृपादृष्टी आपल्या भक्तांवर सदोदित असते.

**ज्योती फणसेकर**
**यशोधन नगर, ठाणे (प.).**

## साई पाठीराखा

मी सरकारी खात्यात इंजिनियर म्हणून काम करीत आहे. साईबाबांचा एक साधारण भक्त आहे. कोणत्याही संकटात बाबांचा पाठिंबाच मला धैर्य देऊन त्या संकटातून मुक्त करीत असतो हा माझा अनुभव आहे. असलाच एक अनुभव मी येथे सांगत आहे.

१९९४ च्या फेब्रुवारीत अचानक माझ्या हातून चूक झाल्याने मला कामावरून निलंबीत केलं गेलं होतं व तसेच माझ्याविरुद्ध प्रकरण न्यायलयात दाखल झालेलं होतं. त्यावेळी माझ मन फारच अशांत झालं आणि मी तात्काळ शिर्डीस जाण्यास तयार झालो. पण घरच्यांनी आणि माझ्या मित्रमंडळींनी मला त्यावेळेस शिर्डीस जाऊ नको व सध्या चाललेले न्यायलयातील प्रकरण संपल्यावर जाऊन दर्शन घे म्हणाले म्हणून मी शिर्डीस न जाता येथेच थांबलो.

न्यायलयात वरचेवर पेशी होऊनसुद्धा प्रकरणाचा निकाल लागण्याचा काही अंदाज लागत नव्हता. दोन वर्षे गेली. यावर्षी (जून ९६) आमच्या घरच्यानी पुण्यानजीक असलेल्या

आमच्या कुलदैवताला जाण्याचे ठरवून आम्ही सगळे निघालो. कुलदैवत म्हणजे इंदापूर तालुक्यातील नीरा नरसिव्हपूर होय. तेथील दर्शन पूजा संपल्यावर सर्वजण तेथून शिर्डीस जाण्याचे ठरविले. पण माझ्या मनात ते नव्हते. कारण मी साईबाबांना घातलेल्या साकड्यानुसार न्यायालातील प्रकरण संपल्यावरच शिर्डीस जाऊन बाबांचे दर्शन घ्यावे असे होते. पण सर्वांच्या मनात असल्याने मी त्यांच्या सोबत शिर्डीस आलो. श्रींच्या समाधीचे दर्शन घेऊन मनात बाबांना परत एकदा माझ्या कामाबाबत सांगून व काम झाल्यावर परत एकदा दर्शनाला येईन म्हणून प्रार्थना करून, प्रसाद घेऊन परत बिदरला आलो.

'बिदर'ला परतल्याच्या दुसऱ्याच दिवशी आश्चर्याची बातमी मिळाली ती न्यायलयात काम करणाऱ्या माझ्या मित्राकडून त्याने सांगितले की सर्वोच न्यायलयाच्या एका विशेष आदेशानुसार माझ प्रकरण बिदरच्या न्यायाधिशानी संपूर्णपणे निकालात लावून ताबडतोब बंद केलेले आहे व आता यापुढे या मला न्यायलयात येण्याची काहीच गरज नाही. हे ऐकताच मी बाबांच्यावर असलेल्या श्रद्धेने डोळे मिटले आणि बाबांची आकृती डोळ्यासमोर येऊन मला आशीर्वाद देत आहेत. असे वाटले.

वरील अनुभवाचे मी एक ठाम निर्णयाला आलो ते म्हणजे बाबांना भक्तांनी साकडे घातल्यानेच बाबा कृपा करतात हे चुकीचे आहे. बाबांना आपल्या भक्तांची चिंता सतत असतेच. भक्तानी कोणताही नवस किंवा साकडे न घालता श्रद्धापूर्वक बाबांचे नामस्मरण करावं व जेव्हा जेव्हा शिर्डीस जाण्याचा योग येतो तेव्हा त्वरीत गतीने जाऊन बाबांचे दर्शन घ्याव. आमची संकटे दूर करण्याचे काम बाबा स्वतःच करत असतात. त्यासाठी कोणतेही नवस बोलण्याची गरज नाही हे माझ्या प्रकरणात सिद्ध झाले आहे. मी निश्चय केला आहे की बाबांना या पुढे साकडे घालणार नाही आणि ज्या ज्या वेळी माझ्या मनात बाबांचे दर्शन घेण्याची इच्छा येईल त्या त्या वेळी विना विलंब शिर्डीस जाऊन दर्शन घेईन.


**प्रभाकर अग्रहारेकर**

**उस्मान गंज, बिदर.**

***

## ... आणि बाबांचे प्रत्यक्ष दर्शन घडले

**श्री** साईलीला जुलै-ऑगस्ट ९६ चा अंक मिळाला त्यात ''श्री बाबांचे प्रत्यक्ष दर्शन'' हा लेख वाचला. ''श्री साईबाबांचे दर्शन मलासुद्धा प्रत्यक्ष झाले'' आहे. तो अनुभव असा-




श्रीसाईलीलाचा अंक नेहमीप्रमाणे वाचत होतो तो दिवस रविवारचा रात्री आठ वाजताच्या सुमारास अंक वाचण्यास सुरुवात केली. लेख वाचल्यानंतर असेच माझ्या मनातसुद्धा आले की श्री बाबांचे दर्शन कधी तरी प्रत्यक्षआपणासही घडेल काय ? हा विचार करीत असताना श्रीबाबांची पुढील वचने आठवली.

**शरण मज आला आणी वाया गेला ।**
**दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥**
**जो जो मज भजे जैशा जैशा भावे ।**
**तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥**

आणि त्याचप्रमाणे विचार करीत करीत त्याच दिवशी रात्री झोपते वेळी वरील दोन्ही ओळी मनात म्हटल्या आणि ॐ श्री साईनाथाय नमः हा जप अकरा वेळा करीत झोपी गेलो.

दुसरा दिवस सोमवार उजळला परत रात्रीप्रमाणे तोच विचार माझ्या मनात सुरू होताच सोमवार म्हणजे मी गेल्या सात-आठ वर्षापासून शिवशंकराचा उपवास करीते असतो. सकाळी सर्व आटपून फॅक्टरीत जाण्यास निघालो जाताना स्कूटर चालू केली तेव्हापासून तर फॅक्ट्रीच्या ऑफिस पर्यंत हाच जप चालू होता. मी एका खाजगी कारखान्यात व्यवस्थापक म्हणून

नोकरीला आहे. माझ्या टेबलाच्या काचेच्या खाली श्री. साईबाबांचे सुंदर व रंगीत छोटा फोटो आहे त्याला नमस्कार करून खुर्चीवर बसलो पण मनात सारखा तोच प्रश्न यायचा थोडा वेळे गेला आणि खरोखरच एक भगवे कपडे घालून आणि भगवा फेटा (पगडीप्रमाणे) बांधून एक साधू बाबा आले आणि माझ्या टेबलासमोरच्या खुर्चीत बसले त्यांना पाहून फोटोकडे बघून म्हटले, बाबा तुमची लीला खरोखरच अपरंपार आहे. साधू बाबा आले आणि त्यांनी स्वतःच्या झोळीमधून श्री साईबाबांचा रंगीत फोटो काढून माझ्या समोर केला आणि त्यांनी म्हटले की, बाबांचे दर्शन घेण्याची मनात इच्छा होती ना मी नाशिक वरून आलो आणि पुरीला जात आहे. मी कधी त्या साधू बाबांकडे आणि कधी माझ्या समोर केलेल्या फोटोकडे पाहत राहिलो माझ्या मनाप्रमाणे प्रत्यक्ष बाबाच माझ्यासमोर बसले काही वेळ मला असे वाटले की मी काही तर स्वप्न वगैरे तर पाहत नाही आहे. आमच्या ऑफिस स्टॉफनी त्या साधु बाबांना बरेच काही विचारणा केली पण त्यांनी कोणाला काहीच सांगितले नाही. फक्त मलाच बोलत राहिले. त्यावेळेस माझ्या मते बाबाच प्रत्यक्ष माझ्यासमोर होते. 'माझे बाबा तुम्ही असे माझ्या तोंडून एकदम निघाले. आणि त्यांनी तथास्तुः असे म्हणून मला विचारले शिरडीला केव्हा जाणार! मी त्यांना सांगितले की दिवाळीच्या नंतर बाबांच्या दर्शनास अवश्य जाईन. त्यांनी एकदमच म्हटले की बाबांचा आशीर्वाद आहे तुझ्यावर मनातली सर्व इच्छा श्री साई जरूर पूर्ण करेल म्हणत त्यांनी माझ्या हातावर एक खडा ठेवला. बाबा हे काय ? ते म्हणाले हा साईचा प्रसाद आहे याचा चांदीच्या अंगठीत घडव आणि नेहमी बोटात ठेव साई तुझ रक्षण करेल. आणि ते लगेच सोनाराकडे जाऊन विचारले की हे काय आहे, त्या सोनाराने विचारले. हे कोणी दिले मी त्यांना सर्व घडलेले सांगितले त्याआधीच त्यांनी मला सांगितले की ही वस्तू फार कमी मिळते. ऐवढे सांगून तो साधुबाबा मला जाताना फक्त मेन (मुख्य) दाराकडे जाताना नंतर ते कोणत्या दिशेला वळले हे कळलेच नाही मी लेगच मुख्य दारावरच्या सुरक्षा गार्डला विचारले की ते बाबा कुठे गेले त्यांनी मला सांगितले मी फक्त त्यांना दाराच्या बाहेर जाताना पाहिले नंतर ते कुठे गले ते पुन्हा दिसले नाही. या सर्व प्रत्यक्ष दर्शनास काय म्हणावे?

**अशोक चरडे**

**नागपूर.**

## साईच आम्हा रक्षणकर्ता

**आ**पण मे-जून १९९६ ला ''श्री साईलीला'' तिर्थक्षे-विशेषांक प्रसिद्ध केला. अंक वाचून भारतदर्शनाचा अभुतपूर्व आनंद झाला. त्या अंकातील श्री अमरनाथजीच्या यात्रेसबंधित वाचून जणूकाही श्री साईभगवानने यात्रेकरिता प्रेरित करून श्री अमरनाथ यात्रेस प्रवृत्त केले व व कोणत्याही विचार न करता श्री साईभगवानाचा आदेश समजून तयारी केली. १९ ऑगस्ट ९६ ला नागपूरवरून सकाळी ३.४५ ला हिमसागर एक्सप्रेसने प्रवास सुरू केला. व श्रीअमरनाथच्या यात्रेच्या पहिल्या टप्प्यापासून दुसऱ्या टप्प्यापर्यंत म्हणजेच शेषनाग पर्यंत साईकृपेने सुरक्षित पोहचलो. परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे परिस्थिती इतकी बिगडली गेली की आमचे अमरनाथजींच्या दर्शनार्थ जाणे शक्य झाले नाही. त्या परिस्थितीत आम्हाला शेषनागवरून पहेलगाव (जम्मू) करिता परतावे लागले. वरून वरूण देवतेचा प्रकोप, थंडी, वादळ अशा परिस्थितीत आम्हाला शेषनाग सोडावे लागले. मुखी साईनामाचा जप करता करता आम्ही खाली आलो. त्या परिस्थितीचे वर्णन म्हणजे मृत्यूचे प्रत्यक्ष दर्शनच म्हणावे लागेल. आणि या परिस्थितून आम्ही साईकृपेमुळे सुखरुप नागपूरला परतू शकलो.

ह्या संकटापासून प्रत्यक्ष साईबाबांचे आम्हाला संकटातून मुक्त केले असे वाटते. अन्यथा त्या जीवघेण्या परिस्थितीत सुटका नव्हती.

**डी. एस. बोबडे**

**''साईधाम'' १५१ फ्रेन्डस कॉलनी रोड,**

**नागपूर.**

## अपघातातून बाबांनी वाचविले

**ही** गोष्ट आहे १९९३ची. आम्ही २२ सप्टेंबर १९९३ रोजी साईदर्शनासाठी शिर्डीला गेलो. पहाटे आंघोळ करून आम्ही दर्शनाला गेलो. साईबाबांची आंघोळ, अभिषेकाचे व बाबांच्या परमपूज्य पादुकाचे दर्शन घेतले. मी बाबांकडे एक टक पाहात राहिले आणि मनात बाबांना म्हणाले, बाबा ! गणपती, विठ्ठल या देवतांविषयी माझ्या मनात फार श्रद्धा आहे. तुमच्याविषयीही अशीच श्रद्धा माझ्या मनात ठसू दे. मला प्रचिती द्या. कारण यापूर्वी मी बाबांना नमस्कार करायची पण बाबांच्या लीलांची अस्तित्वाची तशी जाणीव नव्हती. माझं मन प्रसन्न झालं. आम्ही दर्शन घेऊन शिर्डीवरून वणीला गेलो. वणीला देवीचं दर्शन घेऊन दुपारनंतर घरी यायला निघालो. आमच्या जीपमध्ये ३ लहान मुले व ११ मोठी अशी १४ जणं होतो.


गणपतीचा पाचवा दिवस होता. आमची जीप नाशिकला आली आणि एक गाढव रस्ता ओलांडत असताना त्याला थोडा धक्का बसला व ते पडले. तेव्हाच ड्रायव्हरला आम्ही सावध केले. त्याने आपल्या वेगाने व्यवस्थित गाडी आणली. भिवंडीजवळ पडघा येथे आम्ही आलो. बाहेर रिमझिम पाऊस पडत होता. रस्त्याच्या बाजूने गणपतीविसर्जनासाठी लोक चालले होते. पुढे बऱ्याच अंतरापर्यंत रस्ता मोकळा होता.

आणि काय झाले ते कळायच्या आतच आमची जीप ६ ते ७ फूड खोल शेतात जाऊन उभी राहिली चाके रुतली. पण आमच्यापैकी एकालाही थोडीसुद्धा इजा झाली नाही की गाडीलाही खरचटलं नाही. आम्ही सर्वजण हळूहळू रस्त्यावर आलो. रस्त्यावर बरीच गर्दी जमली. मागून आलेल्या गाड्या उभ्या राहिल्या. त्यातील एका जीपने आमच्या काही माणसांना व छोट्या मुलांना कल्याणला सोडलं. मागून एक जीप आली. त्यात मुसलमान चाचा होते. त्यांनी भिवंडीत सोडतो असं सांगून जीपमध्ये बसण्याचा आग्रह केला. संध्याकाळी ७ ची वेळ व त्यावेळी हिंदू-मुसलमान दंगलीचा काळ यामुळे आम्ही प्रथम थोडे घाबरलोच. पण त्यांच्या आग्रहामुळे बाबांचे नाव घेऊन गाडीत बसलो. आम्हा अज्ञानांना बाबांच्या सामर्थ्याची काय कल्पना ! माझे पती, एक पुतण्या व ड्रायव्हर गाडी काढण्यासाठी तेथेच राहिले त्या मुसलमान चाचांनी आम्हाला सुखरुपपणे आणून भिवंडीत उतरले. स्वतः एक रिक्षा बोलावून त्याला घडलेल्या प्रसंगाची कल्पना देऊन आम्हाला कल्याणला सोडायला सांगितले. पुढे कल्याणला आमची पुढची माणसं भेटली. आम्ही सर्वजण सुखरुपपणे घरी पोहचलो. तिथल्या लोकांनी मदत करून गाडी वर काढली व माझे पती रात्री ११ वाजता घरी आले.

जेव्हा आम्ही गाडीत बसलो तिथून भिवंडीत उतरेपर्यंत त्या माणसांने बाबांबद्दल जे सांगितलं आणि आम्हाला जी प्रेमाची वागणूक दिली ते पाहून ते दुसरे तिसरे कोणी नसून बाबाच होते. बाबांनी मला आपली प्रचिती दाखवली. मी तेव्हा खूपच घाबरले होते. त्यामुळे सर्वच आठवत नाही. पण त्या प्रसंगाची व त्या देवमाणसाची आजही आठवण झाली की माझा कंठ दाटून येतो. डोळ्यात पाणी येतं. कोणालाही काही इजा न देता साईमाऊलीने आपली प्रचिती दाखवून दिली त्या दिवसापासून बाबांवरील माझी श्रद्धा आणखीनच दृढ झाली.

त्यानंतर गेल्यावर्षी याच महिन्यात माझे पती सिरीअस होते. एकदा ९ दिवस व एकदा दोन दिवस असे दोन वेळा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते. आमच्या बाजूच्या बाबांच्या मंदिरात मी यांच्याहस्ते बाबांना अभिषेक केला. त्यांना ताप होता पण अभिषेक करताना दीड तास त्यांना काहीही त्रास झाला नाही. नंतर घरी आल्यावर पुन्हा ताप चढला. रक्ताला रिपोर्टमध्ये मलेरिया व टायफॉईड या दोन्ही तापाचे निदान होऊन डॉक्टरनी लगेच ॲडमिट करायला सांगितले. ॲडमिट करताच रिपोर्ट बघून डॉक्टरही थोडे घाबरलेच. यांना तपासलं, सलाईन लावलं.

माझा बाबांचा धावा चालूच होता. त्यांच्या उशाशी बाबांची उदी होतीच. मी रोज त्यांना उदी लावून तीर्थ द्यायची. आणि



ॲडमिट केलं त्या रात्रीच त्यांचा ताप निघाला तो पुन्हा आलाच नाही. मी ९ दिवस यांच्याबरोबर होते तेव्हा मला जमेल तसे बाबांचे स्मरण करत होते. त्यांच्या लिला वाचत होते. मी खूप घाबरले होते. समोरच बाबांची छोटीशी मूर्ती होती. बाबांकडे पाहिले की मला का कोण जाणे खूप धीर यायचा. जणू बाबा मला सांगायचे. धीर धर, घाबरू नकोस, सर्व ठीक होईल. पुन्हा काही दिवसांनी यांचा मलेरिया उलटला पुन्हा दोन दिवस ॲडमिट केले. औषधोपचार व बाबांचा धावा चालूच होता. बाबांनी माझी प्रार्थना ऐकली. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होऊन ते पूर्ण बरे झाले. कामावर जायला लागले. पुढे मी बोलल्याप्रमाणे त्यांना घेऊन शिर्डीला बाबांचे दर्शन घेऊन आले. बाबा तुमच्या मुळेच माझे सौभाग्य मला परत मिळाले. असेच माझ्या पाठीशी सदैव उभे राहिलात तसे सर्वांच्या रहा, माझे सौभाग्य कायम ठेवा हिच बाबांच्या चरणी प्रार्थना.

आज बाबांच्या कृपेने आम्ही सर्व सुखात आहोत. अशा या कृपावंत बाबांना माझे कोटी कोटी प्रणाम !

**सौ. निलम नारायण नाईक**
बी/१०४ अमृतबाग,
मनिषा नगर,
कळवा, ठाणे.

## साईकृपा

आम्ही सर्व म्हणजेच मी, माझे आई-वडिल व बहिणी श्री साईबाबांचे भक्त आहोत. साईकृपेमुळेच माझ्या खूप मनोकामना पूर्ण झाल्या आहेत. आजपर्यंत जे जे मी श्रीसाईबाबांकडे मागत आले आहे त्याची प्राप्ती मला झाली आहे.

माझ्या एम. ए. प्रथम वर्ष परिक्षेच्यावेळी अचानक आई आजारी पडली व तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले. मला काय करावे ते सुचेनासे झाले. अभ्याससुद्धा मनासारखा झाला नव्हता. परीक्षेला न बसण्याची पाळी माझ्यावर आली होती. एका बाजूने आईची चिंता व दुसऱ्या बाजूने एक वर्ष वाया जाण्यीची भिती. पण श्रीसाईबाबांवर माझा पूर्ण विश्वास होता. मी साईबाबांवर विश्वास ठेवून परिक्षेला सामोरे गेले. म्हणजे मी पास झाले व वर्ष वाया जाण्याच संकट टळलं.

माझ्या बहिणीला बाळंतपणाच्या वेळी खूप त्रास व्हायला लागले पण साईबाबंच्या कृपेने ती सुखरुप बाळंत होऊन पुत्रलाभ झाला. साईबाबांच्या कृपेनेच दोन्ही बहिणींना चांगल्या नोकऱ्या मिळाल्या. माझी आई अधुन-मधून आजारी असते पण साईबाबांच्या कृपेने तिला आराम मिळत असतो.

**कु. रेषा गांवकर**

## शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥

मला नाही वाटत असा कोणी तरी भक्त असेल की जो बाबांना मनापासून शरण गेला असेल, मनापासून ज्याने बाबांना आळविले असेल त्यांना बाबांनी रिक्त हस्ते परत पाठविले असणार.

बाबांचा महिमा अगाध आहे. त्यांच्या एकेक चमत्कारांनी मी तर अवाक् झाले आहे. असाच एक चमत्कार मला मनापासून सांगावासा वाटतो.

एकदा मी माझ्या मोठ्या आत्यांकडे गेले होते. त्यांच्याकडे बाबांचे सुंदर कॅलेंडर होते. ते पाहताच मी आत्यांना म्हटले, किती सुंदर फोटो आहे बाबांचा. आणि क्षणभरच मला असा भास झाला की, ते माझ्याशी काहीतरी बोलतात. मी हात जोडून त्या फोटोसमोर उभी राहिले. इतक्यात आत्या म्हणाल्या, तुला पाहिजे तर घे. हे शब्द ऐकताच लहान मूल जसे खाऊ पाहिल्यावर त्यावर झडप घालते त्याप्रमाणे मी ते कॅलेंडर हस्तगत केले. आणि ते कॅलेंडर घेता घेता मी आत्यांना म्हटले. जेव्हा बाबा मला माझे हक्काचे घर देतील (कारण त्यावेळी आम्ही कंपनीच्या ब्लॉकमध्ये राहत होतो.) तेव्हाच ह्याची फ्रेम करून प्रथम बाबांना घेऊन गृहप्रवेश करीन.

घरी आल्यावर मी ते कॅलेंडर गुंडाळी करून नमस्कार करून कपाटात ठेवले. त्यानंतर मी ते कॅलेंडर विसरून गेले. आणि आश्चर्य म्हणजे कितीतरी वेळा मी ते कपाट साफ केले परंतु ते कॅलेंडर हाताला लागले नाही. पुढे अचानक आम्हाला नवीन जागेचा योग आला. तरीसुद्धा मला त्या कॅलेंडरची आठवण झाली नाही. नवीन घरात जाण्याचा मुहूर्त वगैरे काढला आणि सामानाची बांधाबांध करू लागलो. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता निघायचे ठरले तेव्हा कपाट रिकामे करण्यास बसले आणि काय आश्चर्य ते कॅलेंडर पटकन माझ्या मांडीवर पडले. तरीसुद्धा ते उघडून पाहीपर्यंत माझ्या अजिबात लक्षात येईना जेव्हा ते उघडले आणि बाबांचा फोटो पाहिला तेव्हा मला सर्व आठवले. तशीच सर्व सामान टाकून उठले आणि मिस्टरांना अर्जंट फ्रेम करून आणावयास सांगितले. सकाळी दहा वाजता निघायचे होते. त्या बिचाऱ्या दुकानवाल्यानेसुद्धा सकाळी नऊ वाजता ती फ्रेम तयार करून ठेवली होती. ती घेऊन आले आणि ठरल्याप्रमाणे व बोलल्याप्रमाणे मी बाबांना घेऊन नवीन घरात गृहप्रवेश केला आजही त्या फोटोकडे पाहून मी बाबांकडे माझी गाऱ्हाणी सांगते. कोणतेही संकट आले तर त्यांना सांगते आणि त्यातून माझी नेहमीच सुटका करतात. मला मार्ग दाखवतात.

बाबांना माझी एकच प्रार्थना आहे बाबा तुमची माझ्यावर जशी कृपा आहे. तशीच इतर भक्तांवरसुद्धा असू द्या. बाबा तुम्हाला आमचे लाख लाख प्रणाम !

**सौ. अनघा अ. बंगाळे**
**फ/९, न्यू त्रिशूल सोसा.,**
**भवानीनगर, मुंबई.**

## साई कृपाळु

साई कृपा होताक्षणी सुखी यशवंत होती
तैसे नाम जपतांना ब्रह्मआनंद साई देती ॥१॥
साईकृपा ख्याती थोर धावत्याला शक्ती देती
संकटात भक्तजना तारण्यास साई येती ॥२॥
साईकृपा भाग्यवंता मार्गदीप तेच एक
भिन्न नाम रूप स्थळी भेट देती नित्य एक ॥३॥

**■ प्र. अ. पुराणिक**

# पाही बा कृपादृष्टी साई

गोविंद कृष्णा कोठावडे
कोल्हापूर.

— ❖ ❖ ❖ —

**संतांनी परमेश्वराला माऊली म्हटले आहे तसेच साईभक्त श्रीसाईंस साईमाऊली म्हणतात. आई बालकाचे सर्व दोष पोटात घालून त्यावर प्रेमाचा वर्षाव करते. तद्वतच साईमाऊली सर्व साईभक्त बालकांवर प्रेमाचा वर्षाव करीत आहे. या प्रेमाची शेकडी प्रचिती आजही हजारो भक्तांना येते म्हणूनच शिर्डीला साईदरबारात भक्तांची साईकृपादृष्टीसाठी रांग लागलेली असते.**

— ❖ ❖ ❖ —

निर्गुण परमात्म्याचे सगुण रुप घेऊन शिरडीत वास केलेल्या साई सद्गुरू माऊलीच्या प्रातःकाळचे उपासनेतील भूपाळीत भक्तगण आर्ततेने विनवतो की, ''**उघडूनी नेत्रकमळा दीन बंधू रमाकांता। पाहिं बा कृपादृष्टी बालका जशी माता।....**'' लेकराने आईला हाक देऊन, मला जवळ घे म्हणून सांगण्याची मूलतः गरज नाही. माऊलीची स्नेहाळ नजर बालकावर सदोदित असते आणि लक्षावधी लेकरांची माता असलेल्या या साईमाऊलीला तर केवळ उपचार म्हणून भूपाळीने जागे करायचे, कारण ती निद्रिस्त नाहीये व कुणाला दृष्टीआडही ठेवत नाही. संसार तापाने त्रस्त झालेल्या भक्ताने लेकराच्या मायेने हाक दिली तर वात्सल्याच्या पान्हा आणखी फुटेल. साईसद्गुरुच्या मातृहृदयात करुणेचा फार मोठा पाझर आहे. याची प्रचिती समाधीमंदिरातील लोभस आणि सर्वांगसुंदर मूर्तीच्या डोळ्यांकडे पाहिले की येते, नयनात दाटलेल्या असीम कारुण्य भावनेने भक्त सुखावतो.

लौकिक अर्थाने साईमहाराज देह त्यागून गेले असले तरी त्यांनी भक्तांना आश्वासन दिल्याप्रमाणे त्याचे वास्तव्य शिरडीत आहे याचा अनुभव दृष्टांतातून भक्तांना येतो. त्यासाठी बाबांच्या भक्तीचा मार्ग आपण स्वीकारला पाहिजे.

तेराव्या शतकात यादव काळात महाराष्ट्र देशी सर्व तऱ्हेची भरभराट होती. कलाकुसरीची वस्त्र प्रावरणे, अलंकार निर्मिती व हिऱ्यांना पैलू पाडण्याचे कसब याद्वारे उत्तम व्यवसाय चालायचे. खरोखरीचा सुवर्णकाळ होता तो! परंतु जाती-धर्मात सांप्रदायिक सख्य नव्हते. विशेषत: वैदिक परंपरा मलूल होऊन जनतेच्या अंत:करणातील भक्ति लोप पावत चालली होती. जनमानसातील भक्तिप्रेमाचा ओलावा नाहीसा होत चालला होता. श्रद्धेच्या ठिकाणी ढोंग आले होते. सुख समृद्धीमुळे शासनकर्ते ऐषआरामी बनले होते. परिणामत: सामान्य जनतेच्या पदरी दु:ख आले होते. यातून सुयोग्य परिवर्तन घडण्यासाठी संभ्रमीत जनतेला मार्गदर्शनाची गरज होती. ही काळजी जगन्नियंत्याला होतीच. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणून भगवंताने ज्ञानेश्वरांचा अवतार घेतला व धर्माचे पुनरुज्जीवन, समाजात नैतिकता, भक्तिभाव, इत्यादी गोष्टी प्रस्थापित करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली व त्यास बळकटी आली. भागवत धर्माचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला. त्यानंतरच्या संतावतारांनी या कार्याची धुरा वाहिली व महाराष्ट्रदेशी खऱ्या अर्थाने भगवद्भक्तीची पताका फडकू लागली.

प्राचिन काळातील संतांचे कार्य अर्वाचिन काळातही जोपासण्याची गरज होती, त्यास अनुसरून अलिकडील काळात हे कार्य पुढे चालण्यासाठी संत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, निळोबाराय, चोखामेळा, गोरोबा कुंभार इत्यादि संतांच्या रांगेत अक्कलकोटचे स्वामी समर्थ, शेगावीचे गजानन महाराज, **शिरडीचे साईबाबा** या सद्गुरू संतांचे अवतार झाले.

### साईबाबांचा ठसा

सद्गुरू साईनाथांनी 'सर्वधर्म समभाव' हा मूल मंत्र अंगीकारून कार्य सुरु केले. विज्ञान युगातही आपल्या कार्याचा ठसा जनमानसावर उमटविला.

खेळांत रमलेल्या बाळाला दूध भाताचा घास भरविताना मातेला कोण कष्ट होतात. कारण बाळाचे लक्ष खेळात असते

अशा वेळी त्याच्या आवडीच्या गोष्टीचा आधार घेवून जसे 'हा चिऊचा, हा काऊचा' असे म्हणून त्याच्या पोटी घास उतरवावा लागतो. नेमके हेच तंत्र साईमाऊलीने आपल्या असंख्य बालकांना, रंजल्या गांजल्या, अशिक्षित, अंधश्रद्धाळू, पीडित, जाती भेदभावाने अंकित समाजास सारे भेद मोडून एकत्र आणले व मातेच्या हळूवार चित्ताने त्यांना नितीचा, सदाचाराचा, सर्वधर्म समभावाचा, घास गळी उतरवला. अज्ञानी जनतेला विश्वव्यापक भावनेचा साक्षात्कार घडवून भक्तीची बाळगुटी पाजली व बाळगुटीने समाजाला बाळसे येऊ लागले.

**साईबाबांच्या शिकवणीने जनतेच्या मानसात सद्‌गुरू व परमात्मा यांच्याबद्दल आपार श्रद्धा उगम पावली. भगवंतापर्यंत पोहोचण्यास सद्‌गुरू हा वाटाड्या असून त्याच्या कृपेने काम, क्रोध, मद, मत्सर नष्ट होतात व सद्‌गुरूवर निष्ठा ठेवून सेवा केली तर परमेश्वर प्राप्तीला वेळ लागत नाही याची समज लोकांना आली. गाय वासराला दूध देते तसा सद्‌गुरू भक्ताला उपदेश देतो व त्यानुसार सद्‌गुरूंकडून अनुग्रह प्राप्ती होते याचा भक्तांना साक्षात्कार झाला व**

**''सद्‌गुरूंशी सत्संग करूनी।**
**मंथुन काढावे समाधान लोणी।**
**चंचल मनाचा स्वभाव झणीं।**
**सद्‌गुरुचरणी समर्पावा ॥**

अशी अनुभूति प्राप्त झाली की व भक्तीचा परिपोष होऊन भक्तांचे अंगी सत्वगुणांचे बीज अंकुरते.

बाबांचे अध्यात्मिक व योग सामर्थ्य श्रेष्ठ दर्जाचे होते. साईबाबा मूलत: दत्तात्रयांचे अवतार असा विश्वास आहे. कालानुरूप आवश्यक असलेल्या **समाज शिक्षणाचे कार्यकरीत असताना त्या अंतर्गत उपचार म्हणून भक्तांना भावणारे चमत्कारही त्यांनी केले. योगसामर्थ्याने श्रीरामाचे, भिवरेकाठीच्या सावळ्या पांडुरंगाचे दर्शन बाबांनी शिरडीत घडविले,** मानवतेचा अखंड आंतरिक सौहार्दाचा जिव्हाळा असणाऱ्या या सिद्ध व साक्षात्कारी महापुरुषाने चमत्कार करून ईश्वरी अस्तित्वाची खूण भक्तांना पटविली. आपल्या नवनीतासारख्या मृदु-मधुर वाणीने नीतीशास्त्राचे निरुपण करून जगाचे सत्यस्वरूप दाखविले. पारमार्थिक मार्गाचे प्रबोधन करताना बंधुत्वभाव, किडा मुंगी, श्वान सुकर यांच्याविषयी सहानुभूतीचे संवर्धन आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. गरीबांविषयी आर्तकणव ठेवावी. कारण सर्वांचे ठायी परमेश्वराचा वास आहे याची शिकवण दिली. दिसायला फकीर परंतु प्रत्यक्षात कुबेराहून श्रीमंत अशा रूपात, संसाराच्या ओझ्याने दबलेल्या भ्रांत-श्रांत जीवांच्या सांसारिक इच्छा आकांक्षा पूर्ण करून त्यांची दुरितावस्था दूर केली. **श्रद्धा व सबुरी या दोन श्रेष्ठ तत्वांचा अवलंब करून संसार सागर तरुन जाण्यासाठीचे मार्गदर्शन लोकांना केले.**

बाबांच्या भक्त परिवारात अशिक्षित अज्ञान लोकांचा जसा समावेश होता तसाच सुविद्य, उच्चविभूषित मान्यवरांचाही समावेश होता. या साईसद्‌गुरुचरणी त्यांचा भाव जडला व बाबांची चरणधूळ मस्तकी धारण करण्यात त्यांना कृतार्थ वाटले. बाबांच्या द्वारकामाईतील धुनीतून प्राप्त उदीने अनेकांचे असाह्य रोग - व्याधि बऱ्या झाल्या व त्यांना दिर्घायू लाभले. अनेकांना जीवन सुसह्य झाले. ही संत-सत्संगाची फलप्राप्ति होय. संतश्रेष्ठ दासगणू महाराजांनी या संदर्भात केलेले वर्णन यथार्थ आहे.

**संत सूर्यनारायण। कृपा त्यांची प्रकाशपूर्ण ॥**
**संत सुखद रोहिणी रमण। कौमुदी ती तत्कृपा ॥**
**संत कस्तुरी सोज्वळ। कृपा त्यांची परिमळ ॥**
**संत इक्षु रसाळ। रसनव्हाळी तत्कृपा ॥**

सद्‌गुरू साईबाबा हे जसे संतशिरोमणि होते तसेच अर्वाचिन काळातील समाजसुधारक होते. या दोन्ही गोष्टींचा संगम करून दयाधन इश्वराने साईबाबांच्या रुपाने अवतार घेऊन आपल्या कृपेची ओंजळ समाजावर रिती केली व बाबांच्या रुपाने भक्तांवर अपार प्रेम केले. यास अनुसरून संत-मुकुटमणि-ज्ञानेश्वर महाराजांनी वर्णिलेले रुपक उद्‌बोधक आहे.

**नित्यता पूर्णिमा हृदयी चंद्रमा।**
**आलिंगण मेघश्यामा देतु आहे ॥**

श्री हरिरुप असा हा चंद्रमा भक्तांच्या हृदयात नित्य पौर्णिमेप्रमाणे प्रकाशत असतो. या मेघ:श्यामाला अलिंगन देण्याच्या हेतूने अंत:करणाच्या वृत्ती सागराप्रमाणे उचंबळून येतात.

भगवंताच्या निर्गुण रूपाचे सगुण रुप असलेल्या साईने भक्तांना प्रसन्नतेच्या चित्त संतोषाचा प्रसाद बहाल केला व त्यामुळे भक्त धन्य झाला.

**आता उभयस्नेहे स्नेहाळा।**
**वाढविसी मजबाळा।**
**परि नित्यनवा सोहळा।**
**संभ्रम आगळा निजबोधाचा ॥**
अशी प्रचिती आली.

साईबाबांच्या कृपेने भक्तांना श्रद्धा, भक्ति, उपासना तसेच समाज व्यवस्थेला सांप्रदायिक सद्‌भाव व एकात्मता यांचा लाभ झाला. संताच्या पूर्वपिढ्यांनी योजिलेल्या कार्यात साईबाबांचाही सहभाग मोठा आहे. आज देश-विदेशात साईभक्तीचा प्रसार झाला आहे. बाबांनी आपल्या अकरा

वचनांतून दिलेल्या आश्वासनांची आज पूर्तता होत असल्याचा अनुभव असंख्य भक्त घेत आहेत. साई उपासनेद्वारा बाबांचा घरीदारी सहवास लाभत आहे. तरीही शिरडीतील समाधी मंदिरात, द्वारकामाईत बाबांच्या दर्शनाला रिघ लागत आहे. तेथे साईभक्तीची गोदामाई खळाळत आहे. बाबांच्या दर्शनाने संसार तापाचे क्षालन होते, सांसारिक अडिअडचणीत बाबा मार्गदर्शन करतात या आंतरिक श्रद्धने भक्त बाबांच्या पायी धाव घेत आहे. आपला प्राण व देह या दोन पादुका बाबांचे पायी चढवून त्यांची कृपादृष्टी लाभली की भवसागर तरुण जाणे सहज-सोपे आहे अशी भक्तांची निष्ठा आहे. त्यासाठी बाबांच्या कारुण्यमूर्तीकडे मागणे आहे **'पाहिंअंतरबा कृपादृष्टी बालका जशी माता'**.

# तू सुखकर्ता, तू दुःखहर्ता

मी माझ्या जीवनातील दोन अती महत्त्वाचे अनुभव आपणांस सांगणार आहे. जेणेकरून माझ्याप्रमाणेच आपला पण बाबांवरील विश्वास वाढणार आहे.

लग्नानंतर चार महिन्याने मला दिवस गेल्याचं कळलं. डॉक्टरने तपासणी करून दीड महिना झाला असल्याचं सांगितलं. मला फार आनंद झाला. पण दुसऱ्या दिवशीच थोडा रक्तस्त्राव सुरू झाला. मी तर रडायलाच लागले. कारण ते गर्भपाताच लक्षण समजलं जातं व मला तर मुलांची फार आवड. डॉक्टरकडे गेले तर डॉक्टरने १५ दिवस बेड रेस्ट घेण्यास सांगितलं आणि गोळ्या चालू केल्या. गोळ्या घेऊनसुद्धा थोडा रक्तस्त्राव चालूच होता. डॉक्टर रिस्क घेण्यास तयार नव्हते. त्यांना पुन्हा गोळ्या चालू ठेवून बेडरेस्ट घेण्यास सांगितले. यात १५ दिवस गेले, पण मला मनात फार भीती वाटत होती. दोन महिने पूर्ण होऊन गेले होते व डॉक्टरने चार ते पाच महिने पूर्ण होईपर्यंत फार काळजी घेण्यास सांगितलं होतं. गोळ्या चालूच होत्या मी बाबांना साकडं घातलं की माझा रक्तस्त्राव बंद होऊ दे. गर्भपात होऊ देऊ नको व नऊ महिने पूर्ण होईपर्यंत पुन्हा असा त्रास नको होऊ दे. निरोगी व सशक्त मुल जन्माला येऊ दे. मग ते मुलगा असो की मुलगी. मला काहीही चालेल. त्याला घेऊन मी शिर्डीला तुझ्या दर्शनाला येईन असं म्हणून बाबांवर विश्वास ठेवून काळजी करायचं सोडून दिलं. बाबांना म्हटलं आता माझी काळजी तुलाच. मला मुल तर हवय. पण आता जे काही होईल त्याला जबाबदार तूच. आणि आश्यर्च म्हणजे थोड्या वेळाने माझा रक्तस्त्राव पूर्णपणे बंद झाला. डॉक्टरने गोळ्या बंद केल्या व त्यानंतर बाळंतपणापर्यंत पुन्हा असा काही त्रास झाला नाही. मी एका निरोगी व सुदृढ बालकाला जन्म दिला. मला मुलगा झाला. बाबांनी माझी प्रार्थना ऐकली होती.


आता दुसरा अनुभव सांगते बाळाला दवाखान्यातून घरी घेऊन आल्यानंतर भूक लागली म्हणून दुधाला लावलं. तर बाळ जास्तच रडायला लागलं. मला कळेना बाळ का रडतयं. नंतर लक्षात आलं की मला दूध येत नव्हतं. मला बाळंतपणाचा जास्त त्रास झाल्यामुळे दवाखान्यात बाळाला माझ्याकडे न देता बाटलीने दूध पाजत होते. त्यामुळे तिकडे माझ्या लक्षात आलं नाही. मला दूध नाही म्हटल्यावर माझ्यासहित घरातले सगळेच घाबरले व मला दूध येण्यासाठी सगळे घरगुती उपाय सुरू झाले. चोळून, पिळून बघितलं. दूध ओढायचा पंप लावून बघितलं. ज्याने दूध येण्याची शक्यता आहे असे सर्व पदार्थ खाऊन बघितले. तरी काही उपयोग होईना. त्यात दोन दिवस गेले ते माझ्या आयुष्यातील फार वाईट दिवस होते. बाळ रडून रडून हैराण झालं होतं. बाळाचं दुधासाठी रडण बघून मी पण रडायला लागायची. वाटायचं आई होऊन आपला काय उपयोग. साधं स्वतःच दूध आपण बाळाला देऊ शकत नाही. पावडरच किंवा बाहेरचं दूध हवं तितक देण्याची ऐपत होती. आर्थिक परिस्थिती चांगली होती. पण आईच्या दुधाची सर पावडरच्या आणि बाहेरच्या दुधाला काय येणार आणि बाळाच्या आरोग्याच्या दृष्टीने पुढील आयुष्यासाठी आईचं दूध मिळणं फार महत्त्वाच होतं. तरीसुद्धा एक दिवस त्याला पावडरच दूध पाजलं. त्याला पावडरच्या दुधाचा त्रास होऊ नये म्हणून दुसऱ्या दिवशी ते न देता माझ्या मोठ्या बहिणीने स्वतःच्या बाळाला बाजूला करून माझ्या बाळाला दूध पाजलं. यात पूर्ण एक दिवस एक रात्र गेली. रात्रीसुद्धा बहिणीने उठून त्याला दूध दिलं. दुसऱ्या दिवशी पुन्हा तोच प्रकार सुरू होता. बहिणच त्याला पाजत होती व मी सर्व अगतिक होऊन बघत होते. मनात फार वाईट वाटत होतं. वाटलं आता बहिण जवळ आहे म्हणून ती त्याला दूध पाजते आहे. पण नंतर काय. प्रश्न एक दिवसाचा नव्हता. बाहेरच्या दुधाशिवाय मला दुसरा पर्याय दिसत नव्हता. सर्व विचार करून मला फार रडायला यायला लागलं. रडतारडता मनात म्हटलं साईबाबा तू माझी मागणी पूर्ण केलीस, मला मूल दिलंस. पण त्याची उपासमार का होतेय. माझ्या मुलासाठी दूध दे. त्याला रडायाला लावू नकोस. बाबांचं नाव घेऊन दूध ओढायचा पंप छातीला लावला आणि मनात म्हटलं हा माझा आता शेवटचा प्रयत्न. आता दूध येऊ दे आणि काय आश्चर्य दुधाच्या धारा येण्यास सुरुवात झाली. आणि माझ्या डोळ्यात पाणी आलं. पण ते आनंदाचे अश्रू होते. बाबांनी माझ्या बाळासाठी दूध दिलं होतं. बाळ आता चार महिन्यांचा झाला आहे. त्याला कधीही आईच्या दुधाची कमतरता भासलेली नाही व मलाही मानसिक समाधान मिळालं आहे.

आतापर्यंतच्या माझ्या आयुष्यात असे खूप अनुभव आले. जेव्हा जेव्हा मला प्रयत्नाची पराकाष्ठा करूनही अपयश आलं आहे आणि निराश व्हायची वेळ आलेली आहे. अशाचवेळी मी बाबांना साद घातलेली आहे व बाबा माझ्या मदतीला धावले आहेत. आणि मला हवं ते दिलं आहे व माझ्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. माझ्याप्रमाणेच आपल्याही जीवनात साईकृपेने आनंदीआनंद होऊ दे. हीच साईचरणी प्रार्थना.

**सौ. रोहिणी निरभावने**
मुंबई.

# झालो आता पोरके। ज्ञानाविण ॥

राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
ठाणे.



— ❖ ❖ ❖ —

**श्री साईबाबांचा समाधी सोहळा अश्विन महिन्यात तर संत ज्ञानदेवांचा समाधी सोहळा कार्तिक महिन्यात. समाधी सोहळा म्हणजे करूण व भव्योदात्त यात्राच. ही अनंताची यात्रा कवीमनाला नेहमीच मोहीत करत आलेली आहे. अशाच एका भावकवीने ज्ञानदेव समाधी सोहळ्याचे केलेले अक्षरस्मरण.**

— ❖ ❖ ❖ —

कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१२ या तिथीला महाराष्ट्रात आळंदीक्षेत्री भर दुपारी एक अशी घटना घडली की, ती पाहताना भरमाध्यान्ही तळपणारा सूर्यसुद्धा क्षणभर म्लान झाला. इन्द्रायणीचे पाणीही निमिषभर स्तब्ध झाले. त्या घटनेचे जे साक्षीदार होते. त्यांना तर शोकावेग आवरत नव्हता. सगळे चराचर सुन्न झाले होते. ज्याच्या वियोगाच्या कल्पनेने सगळे व्याकुळ होऊन दु:खसागरात लोटले गेले होते. तो २२ वर्षांचा तरुण मुलगा, एक महायोगी ऐहिकाचा त्याग करून चिरंतनाच्या प्रवासाला निघाला होता. या तरुण महायोगींच्या हिशेबी हा इहलोक, तो परलोक असे कांही नव्हतेच. सगळे जग, सर्वकाळ त्याच्या वेखी सारखेच होते. डोळ्यांना जे दिसते ते, आणि जे डोळ्यांना दिसू शकत नाहीं ते, असे दोन्हीही त्याच्या नजरेला समानच होते. **'विशेषी लोकी इथे, दृष्टादृष्ट विजयें।'** अशा शब्दयोजना तो सहज करू शकत होता. भगवद्‌गीतेवर अजरामर टीका करणारा हा महायोगी केवळ श्रेष्ठ भाष्यकार नव्हता, तो असामान्य प्रतिभेचे वरदान लाभलेला एक महाकवी होता. भूत, भविष्य आणि वर्तमान या त्रिकालांनाही आरपार भेदून जाऊ शकेल अशी दिव्यदृष्टि लाभलेला तो श्रेष्ठ तत्त्वज्ञ होता. या नश्वर जगात सत्य काय आणि असत्य काय, चिरकालिक काय आणि क्षणभंगुर काय ? ते अवघड ज्ञान त्याने वयाच्या २२व्या वर्षीच मिळविले होते. त्याच्या दृष्टिने मृत्यु ही गोष्ट अगदी स्वाभाविक होती, एखाद्या घटात दिवा ठेवावा आणि तो दिवा ज्या सहजपणे शांत व्हावा तसेच या लोकीचे जीवन अनंतात विलीन व्हावे अशी जणु त्याची धारणा होती.

**''कां झांकलिये घटीचा दिवा। नेणिजे काय जाहला केव्हां।
या रीति जो पांडवा। देह ठेवी॥''**

हे वर्णन जणुकाही त्याच्याच या समाधीला उद्देशूनच त्यांनी लिहिले. पण माझ्या दिव्यदृष्टिला सातशे वर्षांपूर्वीचा तो अपूर्व सोहळा कसा दिसला ? त्याचे जे स्फुरण माझ्या मनात झाले ते असे -

**ज्ञानराज ब्रह्मपूर्ण। समाधी निधान। संजीवनीं॥
ज्ञानियांचा राजा। ज्ञानराजपूर्ण।
समाधिनिधान। संजीवनीं॥१॥
परब्रह्म पूर्ण। भूवरी प्रकटले।
भक्तास दिसले। आळंदीत॥२॥
झाली वर्षे पूर्ण। सप्तशताब्दी।
सोहळा समाधी। आळंदीत॥३॥
सातशे वर्षांमागे। गेले माझे मन।
झाले ते उन्मन। पाहोनिया॥४॥
घेतसे समाधि। ज्ञानोबा माऊली।
सुखाची सावली। अंतरंगी॥५॥
हळहळले मन। पाण्याविना मीन।
झालो आम्ही दीन। जगामधीं॥६॥
'निवृत्ती' हे गुरु। 'प्रवृत्तीत' रडले।
सोपाना धरिले। हृदयासी॥७॥
मुक्त ती मुक्ताई। सगळ्यांची आई।
कशी उतराई। उपकारांची ?॥८॥
सोहळा अपूर्व। डोळां पाहवेना।
येई पांडुरंगा। प्रत्यक्षही॥९॥
गहिंवरे अंतर। आली वेळ सत्वर।
झाले ज्ञानेश्वर। समाधिस्थ॥१०॥
जड अंत:करणीं। लाविता ती शिळा।
अपूर्व सोहळा। झाला पूर्ण॥११॥
बांध ते फुटले। अंतरी हुंदके।
झालो अता पोरके। ज्ञानाविण॥१२॥**